जानेवारी–फेब्रुवारी २०२५/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## उत्सव अभिजात मराठीचा

### अखिल भारतीय
### मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
### २०२५

Scanned with OKEN Scanner

# मायभाषेच्या क्षमतेवर विश्वास हवा

**श्री. वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. वि. स. खांडेकरांनंतर मराठी साहित्याला ज्ञानपीठ पुरस्कार मिळवून देणारे ते दुसरे महान साहित्यिक. त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून त्यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून शासनातर्फे साजरा करण्यात येतो.**

भाषा बंदीखान्यात वाढत नाही. आजही जी मराठी प्रचलित आहे, तीही अनेक भाषांतील शब्दांचे आणि व्यावहारिक संज्ञांचे नजराणे घेऊनच संपन्न झाली आहे. कोणत्याही जिवंत समाजाची भाषा तळ्यासारखी साचीव नसते, तर कालमानानं निर्माण होणाऱ्या नव्या ज्ञानाचे, विचारांचे, जाणिवांचे पाझर आत्मसात करत पुढे जाणाऱ्या नदीसारखी प्रवाही असते. इतर प्रगत भाषांशी संपर्क ठेवूनच ती प्रगती करू शकते. शुद्धतेच्या कर्मकांडात रुतलेल्या आणि त्यामुळेच प्रगतीला पराङ्मुख झालेल्या भाषा मृत या सदरात कशा जमा होतात, हे इतिहासानं दाखवलेलं आहे; हे भान मराठीनं आपल्या १५ शतकांच्या प्रवासात राखलेलं आहे आणि म्हणूनच नव्या युगाची आव्हानं पेलण्याचं सामर्थ्य तिच्या ठिकाणी आलं आहे. भाषा समर्थ आहे; पण तिच्या सामर्थ्यासंबंधी साशंक असलेली आम्ही तिची अपत्ये मात्र दुबळी आहोत. तेव्हा आमचं वैर कोणत्याही भाषेशी नाही आणि मावशीच्या मायेनं आमचं पालन करणाऱ्या इंग्रजीशी तर नाहीच नाही. मावशीबाईनं आता आमच्या आईच्या घराचा कब्जा पुन्हा आईकडे द्यावा, एवढीच आमची मागणी आहे. म्हणून आपल्यासमोर प्रश्न आहे तो इंग्रजीच्या बहिष्काराचा नाही, तर मराठीच्या संरक्षणाचा आणि संवर्धनाचा. भाषा म्हणजे शब्दांचं संकलन नव्हे. समाजाचं वैचारिक आणि जाणिवात्मक संचित काळातून पुढे नेणारी आणि परिणामतः समाजाच्या बदलत्या जीवनाला अखंडता, आकार आणि आशय देणारी भाषा ही एक महाशक्ती असते. सूत्रात ओवलेल्या मण्यांप्रमाणे समाजजीवनाच्या साऱ्या धारणा आणि विकासाच्या प्रेरणा तिच्यात ओवलेल्या असतात. म्हणून मराठीवरील संकट हे तिच्या शब्दकोशावरील वा साहित्यावरील संकट नाही, ते महाराष्ट्राच्या अस्मितेवरील, मराठीपणावरील आणि येथील लोकांच्या भवितव्यावरीलही संकट आहे.



समाजाची प्रगती वा क्रांती स्वभाषेच्या किनाऱ्यावरच पेरता येते असे क्रांतिकारकांच्या प्रणेत्यानं म्हटलेलं आहे. संस्कृत भाषा देवे केली! प्राकृत काय चोरापासून झाली? असा संतप्त प्रश्न संत एकनाथांनी विचारला होता. आज तोच प्रश्न इंग्रजीच्या संबंधात विचारता येईल. संस्कृतचं स्तोम माजवून तेव्हाचा पुरोहितवर्ग आपली सत्ता समाजावर गाजवीत होता. आज त्या पुरोहितवर्गाची जागा इंग्रजीत पारंगत असलेल्या चार पाच टक्के लोकांनी घेतली आहे. या पाच टक्केवाल्यांच्या प्रस्थापित हितसंबंधांसाठी आठ कोटी लोकांचं भवितव्य धोक्यात लोटायचं का, याचा विचार गंभीरपणानं व्हायला हवा. अनेक विख्यात शास्त्रज्ञांनी आणि डॉक्टरांनी जरूर तेथे इंग्रजी परिभाषिक संज्ञांचा स्वीकार करून, सर्व विषय, सर्व स्तरावर, मातृभाषेत शिकवणंच श्रेयस्कर असतं असं वारंवार सांगितलं आहे. म्हणून स्वभाषारक्षणाचा प्रश्न मंत्रालयाचा वा एखाद्या शासकीय विभागाचा नाही; तो सर्व समाजाचा प्रश्न आहे हे ध्यानात घेऊन शासनानं सर्वांचं सहकार्य घेतलं, तर या संकटावर मात करणं कठीण आहे, असं मला वाटत नाही. जगातील सर्व प्रगल्भ भाषांना जे साधलं ते मराठीलाही साधता येईल. फक्त आपला विश्वास हवा, अमृताशीही पैजा जिंकणाऱ्या आपल्या मायभाषेच्या क्षमतेवर!

***(१२, १३ ऑगस्ट १९८९ रोजी मुंबई येथे भरलेल्या जागतिक मराठी परिषदेतील कवी कुसुमाग्रज ऊर्फ श्री. वि.वा. शिरवाडकर यांच्या अध्यक्षीय भाषणातून)***

(लोकराज्य फेब्रुवारी २०१४ मधून पुनर्मुद्रित)

Scanned with OKEN Scanner

## १४ प्रबोधनाची दिशा

दिल्लीत होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे. २१ ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत नवी दिल्ली येथे हे संमेलन होणार आहे. प्रा. डॉ. तारा भवाळकर हे नाव मराठी साहित्य, लोकसाहित्य आणि रंगभूमीच्या अभ्यासात प्रसिद्ध आहे. ताराबाई सुरुवातीपासून शिक्षिका आहेत, तशाच लोकशिक्षिका म्हणूनसुद्धा त्यांची ख्याती आहे. त्यांच्या व्याख्यानात नेहमीच प्रबोधनाची दिशा आणि नवी माहिती असते. या निमित्त डॉ. भवाळकर यांच्याशी साधलेला संवाद..

## १७ अभिव्यक्तीचे माध्यम मराठी गझल...

गझल मराठी भाषेत आता अशी सामावून गेलेली आहे की, मराठी मनाचे ती एक अंग झाली आहे. तंत्रशुद्ध आशयघन आणि गझलियतने ओतप्रोत अशी गझल सुरेश भटांनी मराठी साहित्याला दिली. हे सगळे खरे असले तरी, भरभरून आपण उचंबळून दाद देऊन गझलला आणि पर्यायाने आम्हा सर्वांनाच तारले ते कद्रदान रसिकांनी... गजलसाठी आता पोषक वातावरण आहे.. सर्वत्र गझलचा बोलबाला आहे.. गझल... आणि मराठीत? असा प्रश्न आता कोणी विचारत नाही... हद्दपार झालाय तो !

## २३ साहित्य संमेलनाच्या देशा!

संमेलने आवश्यक असतात वाङ्मयीन पर्यावरणासाठी. साहित्याचे वाचक कुठल्याही गावात, शहरात मर्यादितच असतात. वाचनालयाचे सदस्य आणि साहित्याचे वाचक हे पुन्हा वेगवेगळे वर्ग आहेत. जे वाचनालयाचे सदस्य असतात आणि नियमित वाचत असतात त्यांना एकूण साहित्य व्यवहाराविषयी आस्था असतेच असे नाही. त्याशिवाय ज्यांचा साहित्याशी काही संबंध येत नाही, अशी वेगवेगळ्या क्षेत्रातली मंडळी मोठ्या संख्येने असतात.

## ३० पहिली माझी ववी गं...

घरासमोर सडा-रांगोळी झाली की, जात्यावरच्या ओव्या कानावर पडायच्या. सांस्कृतिक मूल्यांची रेलचेल असलेली ही पहाट आयुष्यभराचा संस्कार देऊन जायची. यात समाज घडवण्याचे अद्‌भुत सामर्थ्य असायचे. नात्यांचा जिव्हाळा, त्यांच्या भल्याची कामना करणारे मन या ओव्यांमधून डोकावायचं. कामाची धांदल असायची तरी आपल्या माणसांसाठी आवर्जून वेळ काढण्याची वृत्तीही असायची.

सरहद, पुणे आयोजित
अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे
९८ वे
अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

## ४० मराठी अभिजात कशी ?

मराठी भाषा सल्लागार समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्याचा शासन प्रयत्न करणार असल्याची घोषणा केली. त्याबाबतच्या चर्चेत या संदर्भातील पुढील निकषांकडे लक्ष वेधले गेले.

## ४६ कवी आणि कविता

केशवसुतांची 'कवी' म्हणून निश्चित आणि स्पष्ट अशी भूमिका आहे. ती आधीच्या कालखंडातील संतांच्या, पंडितांच्या व शाहिरांच्या भूमिकांहून निराळी आहे. ही भूमिका त्यांच्या सर्वच कवितांमधून व्यक्त होते. केशवसुतांच्या कवितेचे प्रेमकविता, सामाजिक कविता, गूढगुंजनपर कविता, निसर्गविषयक कविता असे विभाजन केले, तरी त्यांच्या कवितांमागची भूमिका एकसंध आहे.

## ५३ रोजगार निर्मितीला चालना

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी २० ते २४ जानेवारी २०२५ या चार दिवसांमध्ये विक्रमी गुंतवणुकीचे ६१ सामंजस्य करार केलेले आहेत. यामुळे राज्याच्या विकासाबरोबर होत असलेल्या रोजगार निर्मितीमुळे तरूणांमध्ये नवउमेद निर्माण होईल.


| | |
|---|---|
| शुभेच्छा | ६ |
| संमेलनाचे वर्ष, ठिकाण आणि अध्यक्ष | ८ |
| संमेलनाध्यक्ष... | ९ |
| प्रबोधनाची दिशा | १४ |
| अभिव्यक्तीचे माध्यम मराठी गझल... | १७ |
| व्याख्यानव्रती : लक्ष्मणशास्त्री जोशी | २० |
| साहित्य संमेलनाच्या देशा! | २३ |
| संमेलन सर्वव्यापी व्हावे... | २६ |
| मराठी भाषेचा उगम | २८ |
| पहिली माझी ववी गं... | ३० |
| प्राचीन मराठी भाषेचे वैभव | ३४ |
| मराठी अभिजातच | ३७ |
| मराठी अभिजात कशी ? | ४० |
| संत साहित्य | ४४ |
| कवी आणि कविता | ४६ |
| संस्कृतीचे मूर्तिमंत दर्शन... बोली भाषा | ५० |
| रोजगार निर्मितीला चालना | ५३ |
| कल्याणकारी निर्णय | ५७ |




Scanned with OKEN Scanner

वर्ष ७६ वे | अंक २ | जानेवारी–फेब्रुवारी २०२५

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**


- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- व्यवस्थापकीय संपादक — हेमराज बागुल
- संपादक — दयानंद कांबळे
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट, मुद्रितशोधन, मुद्रण — मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा.लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन.एम.जोशी मार्ग, मुंबई – ४०००११.


माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# पद्म पुरस्कार

देशातील सर्वोच्च नागरी पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. महाराष्ट्रातून माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी व गजल गायक पंकज उधास यांना मरणोत्तर; तसेच ज्येष्ठ दिग्दर्शक शेखर कपूर यांना पद्मभूषण, तर ११ मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाले आहेत.

केंद्रीय गृहमंत्रालयाच्या वतीने दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संध्येला देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात येते. गृह मंत्रालयाकडून या मानाच्या पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. सार्वजनिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी दिवंगत माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी व दिवंगत गजल गायक पंकज उधास आणि चित्रपट दिग्दर्शक शेखर कपूर यांना पद्म भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

## ११ मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार

कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी महाराष्ट्रातील सहा मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाले आहेत. यात सुलेखनकार अच्युत पालव, मराठी चित्रपसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, शास्त्रीय गायक अश्विनी भिडे-देशपांडे, पार्श्व गायिका जस्पिंदर नरुला, ज्येष्ठ बासरी वादक रानेंद्र भानू मजुमदार, ज्येष्ठ चित्रकार वासुदेव कामत यांना जाहीर झाले आहेत.








व्यापार व उद्योग क्षेत्रात वेगळा ठसा उमटविणाऱ्या अरूंधती भट्टाचार्य यांना, तर पर्यावरण आणि वनसंवर्धन करणारे चैत्राम पवार सामाजिक क्षेत्रातील कार्यासाठी पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यासाठी महाराष्ट्राचे अरण्य ऋषी वन्यजीव अभ्यासक मारोती चीतमपल्ली यांना, तर कृषी क्षेत्रात भरीव कामगिरीसाठी सुभाष शर्मा आणि वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम कार्यासाठी विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाले आहेत.

या वर्षी एकूण १३९ पद्म पुरस्कार जाहीर झाले. यामध्ये ०७ पद्म विभूषण, १९ पद्म भूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कार सामील आहेत. यांसह २३ महिला, तर १० परदेशी नागरिक आहेत. १३ मान्यवरांना मरणोत्तर पद्म पुरस्कार जाहीर झाले आहेत.

Scanned with OKEN Scanner

# राजधानीत सन्मान माय मराठीचा

*संत कृपा झाली । इमारत फळा आली ।।*
*ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।*
*नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।।*
*जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।*
*तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।*
*बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरूपणा केले वोजा ।।*

अशा संतसाहित्याने पावन झालेल्या अनेक शतकांचा इतिहास लाभलेल्या आपल्या मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे, ही आपल्या सर्वांसाठीच अभिमानाची गोष्ट आहे. वि. स. खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्याला ज्ञानपीठ पुरस्कार मिळवून देणारे वि. वा. शिरवाडकर उर्फ कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस २७ फेब्रुवारी 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून आपण साजरा करत असतो. याच महिन्यात शतक महोत्सवाकडे वाटचाल सुरू असलेले ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान राजधानी दिल्ली येथे आयोजित करण्यात आले आहे. मराठी भाषा गौरव दिन आणि ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने लोकराज्य मासिकाचा साहित्य संमेलन विशेषांक प्रकाशित करण्यात येत आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे महाराष्ट्राचा प्रमुख सांस्कृतिक सोहळा म्हणून ओळखले जाते. १९५४ साली दिल्लीत ३७वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी त्या संमेलनाचे अध्यक्ष होते. काकासाहेब गाडगीळ स्वागताध्यक्ष, तर प्रधानमंत्री पंडित नेहरू उद्घाटक होते. त्यानंतर जवळपास सात दशकांनंतर दिल्लीत मराठी साहित्य संमेलन होत आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत संमेलन होते आहे, हेही विशेष औचित्यपूर्ण म्हणावे लागेल. या निमित्ताने राजधानीत मराठी भाषेचा आणि साहित्याचा जागर होणार आहे. मराठी भाषिकांसाठी निश्चितच ही अभिमानाची बाब असून साहित्य रसिकांसाठी ही पर्वणीच असणार आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला १४० वर्षांची परंपरा असून आजवर ९७ संमेलने पार पडली आहेत. या ९७ मराठी साहित्य संमेलनांत कुसुमावती देशपांडे, दुर्गा भागवत, शांता शेळके, विजया राज्याध्यक्ष, अरुणा ढेरे या महिला साहित्यिकांनी संमेलनाचे अध्यक्षपद भूषवले होते. यावर्षी लोकसंस्कृतीच्या अभ्यासक प्रा. डॉ. तारा भवाळकर यांना संमेलनाध्यक्षपदाचा सन्मान मिळाला आहे.



'लोकराज्य' मासिकाच्या या विशेषांकामध्ये मराठी भाषा आणि साहित्याचा विविधांगांनी वेध घेणारे अनेक नामवंत साहित्यिक आणि अभ्यासकांचे लेख या अंकात समाविष्ट आहेत. संत साहित्यापासून आधुनिक साहित्यापर्यंत विविध टप्पे आणि प्रवाहांचा वेध घेण्यात आला आहे. आधुनिक कवितेचे जनक केशवसुतांपासून बालकवी, मर्ढेकर, नारायण सुर्वे अशी कवितेची सशक्त परंपरा मराठीत निर्माण झाली. नेमाडे, चित्रे, कोल्हटकर, नामदेव ढसाळ यांनी भारतीय पातळीवर आपल्या कवितेची मुद्रा उमटवली. १९९० नंतर कवींची एक नवी पिढी पुढे आली. मराठी कवितेच्या परंपरेचा ऊहापोह या अंकात केला आहे. माधव ज्युलियन यांनी वृत्त, काव्य व गायन प्रकाराने समृद्ध असलेली मराठी गझल चळवळ सुरू केली. या मराठी गझलचे सौंदर्य वाढवले ते सुरेश भटांनी, याविषयी अभिव्यक्तीचे माध्यम मराठी गझल...यातून गझलेच्या परंपरेची लोकप्रियता भीमराव पांचाळे यांनी उलगडून दाखवली आहे. यासोबतच 'विश्वास हवा मायभाषेच्या क्षमतेवर हे वि. वा. शिरवाडकर यांच्या जागतिक मराठी परिषदेतील अध्यक्षीय भाषण, प्रा. हरी नरके यांचा 'मराठी अभिजात कशी?' आणि वसंत आबाजी डहाके यांच्या 'कवी आणि कविता' या लेखांचे 'लोकराज्य'च्या मागील विशेषांकातून पुनर्मुद्रण करण्यात आले आहे.

'व्याख्यानव्रती : लक्ष्मणशास्त्री जोशी', 'साहित्य संमेलनाच्या देशा', 'माझी पहिली ववी गं....', 'प्राचीन मराठी भाषेचे वैभव' आणि 'मराठी साहित्य संमेलन सांस्कृतिक महोत्सव' अशा विविध विषयांवरील लेखांनी सजलेला 'लोकराज्य'चा हा विशेषांक वाचकांना निश्चित आवडेल. हा अंक वाचनीय तर ठरेलच, शिवाय संदर्भमूल्य असलेला अंक म्हणून संग्राह्य ठरेल असा विश्वास वाटतो.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)



Scanned with OKEN Scanner

# साहित्यातून अभिरुची, रसास्वादाची अनुभूती



साहित्य संमेलन संज्ञेला अन्य कुठल्याही भाषेत नसेल, असा दिमाख मराठी भाषा आणि साहित्य चळवळीने मिळवून दिला आहे. साहित्य संमेलनांनी मराठी भाषेची, संस्कृतीची पताका नेहमीच उंच फडकवत ठेवली आहे. याच मालिकेतील ९८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे आयोजित करण्यात आले आहे. आपल्या मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे आणि त्यानंतर लगेचच पहिलेच संमेलन देशाच्या राजधानीत दिल्लीत संपन्न होणे हा अपूर्व योग आहे. या निमित्ताने मराठी भाषा, साहित्य, संस्कृती यांचे देशभरातील रसिकांना, आस्वादकांना दर्शन घडणार आहे, ही आनंदाची बाब आहे. एका अर्थाने दिल्लीत मायमराठीचा जागर घातला जाणार आहे. नवी दिल्लीतील तालकटोरा स्टेडियम येथे छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत लोकोत्सवच साजरा होणार आहे. या संमेलनाच्या निमित्ताने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे 'लोकराज्य'चा विशेषांक प्रकाशित होत आहे, याचा विशेष आनंद आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी आम्ही गेली कित्येक वर्षे सातत्याने प्रयत्नशील होतो. आमच्या या प्रयत्नांना केंद्र सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला. यामुळे मराठीजनांमध्ये आनंदाचे भरते आले. मराठी भाषेने, साहित्य प्रकारांनी, प्रवाहांनी परंपरा जपतानाच सातत्याने नव्याचा स्वीकार केला. या वाटचालीतच मराठी भाषेच्या अभिजाततेचे आणि समृद्धतेचे गमक आहे.

आमचा मराठी भाषा विभाग हा सक्षमपणे, स्वतंत्रपणे कार्यरत आहे. या विभागाच्या माध्यमातून भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृती, मराठी कला या सर्व विषयांशी संबंधित पुस्तक निवड समिती असे भाषाविषयक व्यापक कार्य सुरू आहे. या सर्व संस्थात्मक प्रयत्नात अनेकविध संस्था-संघटनांनाही सामावून घेतले जाते. याच भूमिकेतून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ व सरहद, पुणे या संस्थांच्या पुढाकारातून नवी दिल्लीतील या संमेलनास सर्वतोपरी पाठबळ देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोकपरंपरा आणि लोककला या विषयांच्या गाढ्या अभ्यासिका, ज्येष्ठ लेखिका डॉ. तारा भवाळकर यांची निवडदेखील या संमेलनाचे वैशिष्ट्य आहे. डॉ. भवाळकर यांनी मराठी लोकपरंपरेला साहित्याच्या मुख्य प्रवाहात आणून त्याला प्रतिष्ठा प्रदान करण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे.

हे संमेलन मराठीजनांसाठी, मराठीप्रेमींसह जगभरातील साहित्य चळवळीसाठी, भाषा अभ्यासक-संशोधकांसाठी पर्वणी ठरेल, हा विश्वास आहे. संमेलनाच्या आयोजनात महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग सदैव पुढे राहील. या संमेलनाच्या निमित्ताने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने प्रकाशित करण्यात येणारा 'लोकराज्य'चा विशेषांक माहितीपूर्ण, संग्राह्य राहील, त्यातूनही हे संमेलन संस्मरणीय ठरेल, असा विश्वास व्यक्त करतो. पुन्हा एकदा या सर्व संस्थांना आणि ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला आणि 'लोकराज्य'च्या विशेषांकास मनापासून शुभेच्छा!

**- देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

# महाराष्ट्रीय संस्कृतीला प्रोत्साहन



९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'लोकराज्य' मासिकाच्या विशेषांकास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

मराठी साहित्याचा गौरवशाली वारसा आणि समृद्ध परंपरा पुढे नेणाऱ्या या संमेलनाचं आयोजन देशाची राजधानी नवी दिल्ली येथे होतंय, ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, या पार्श्वभूमीवर दिल्लीतील या संमेलनास वेगळंच महत्त्व आहे असं मला वाटतं.

राज्यात गेल्या अडीच वर्षांपासून मराठी भाषेच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत. अद्ययावत अशा मराठी भाषा भवनाच्या उभारणीला वेग, शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करणे, प्रशासनातदेखील मराठी बोलणे आणि लिहिणे अनिवार्य करणे, मराठी विश्व संमेलनाचे आयोजन या व अशा काही उपक्रमांमधून मराठी भाषेला आणि पर्यायाने महाराष्ट्रीय संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचे काम होत आहे. मराठी साहित्य हे केवळ आपल्या भाषा-संस्कृतीचे प्रतिबिंब नसून ते सामाजिक जागृती, विचारमंथन आणि नव्या दिशेने वाटचाल करण्याचे प्रेरणास्थान राहिले आहे. संमेलनाच्या माध्यमातून साहित्य, काव्य, कथा, कादंबऱ्या, लोकसाहित्य, तसेच नव्या माध्यमांतील लेखनाची देवाणघेवाण होत असते. नव्या लेखकांना दिशा मिळते आणि साहित्य क्षेत्रात नवे विचार रुजवले जातात.

दिल्ली ही देशाची राजधानी आहे आणि या बहुरंगी, बहुभाषिक आणि विविधतेने नटलेल्या ठिकाणी हे संमेलन होत आहे, यामुळे मराठी भाषेचा आणि साहित्याचा जागर देशाच्या कानाकोपऱ्यात होणार आहे. मराठी भाषा आणि संस्कृती देशाच्या राजधानीत गुंजणार, याचा निश्चितच सार्थ अभिमान वाटतो.

'लोकराज्य' विशेषांकाच्या माध्यमातून, महाराष्ट्र शासनाच्या वतीने या संमेलनाला हार्दिक शुभेच्छा देतो. संमेलन यशस्वी होवो, नव्या लेखनप्रवृत्तीला बळ मिळो; तसेच मराठी भाषेचे संवर्धन आणि जतन नव्या पिढीकडून होवो ही सदिच्छा व्यक्त करतो.

**- एकनाथ संभाजी शिंदे**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.



Scanned with OKEN Scanner

## मराठी साहित्याच्या मौलिकतेचा जागर



राजधानी दिल्ली येथे आयोजित होत असलेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे औचित्य साधून व मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या ऐतिहासिक घटनेच्या पार्श्वभूमीवर 'लोकराज्य' मासिकाचा विशेषांक प्रकाशित होत आहे, ही अत्यंत गौरवाची बाब आहे. या विशेषांकासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

मराठी साहित्य संमेलने ही केवळ साहित्यिकांच्या अभिव्यक्तीचे व्यासपीठ नसून, ती मराठी संस्कृतीच्या वैभवशाली परंपरेचा वारसा आणि वैचारिक सर्जनशीलतेचे प्रतीक आहे. साहित्य संमेलनांमधून सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक परिवर्तनाला नवी दिशा मिळते. यंदाचे संमेलन ज्येष्ठ साहित्यिका आणि विचारवंत डॉ. तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली होत असल्याने संमेलनाला अधिक व्यापकतेचा आणि सर्जनशीलतेचा आयाम मिळेल, असा विश्वास आहे.

दिल्लीसारख्या ऐतिहासिक नगरीत होणारे हे संमेलन मराठी साहित्याला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख आणि मान्यता प्राप्त करून देईल. विशेषतः या निमित्ताने भाषा, संस्कृती, मानवता यांचा मिलाफ देशविदेशातील साहित्यरसिकांना अनुभवास मिळेल. या संमेलनातून मराठी साहित्याच्या मौलिकतेचा जागर होईल आणि नव्या लेखक, कवी, वाचक व विचारवंतांना प्रेरणा मिळेल..

'लोकराज्य' मासिकाचा हा विशेषांक मराठी साहित्याच्या गौरवशाली परंपरेला उजाळा देईल. या अंकासाठी योगदान देणाऱ्या सर्व मान्यवरांचे व लेखन करणाऱ्या साहित्यिकांचे मनःपूर्वक अभिनंदन. मराठी साहित्याच्या प्रगतीचा वारसा पुढे नेत, यशाची नवीन शिखरे गाठण्यासाठी आपण सर्वजण सामूहिक प्रयत्न करू या!

सरहद, पुणे आयोजित
अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे
९८ वे
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

**- अजित पवार**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

## साहित्य आणि संस्कृतीचे जतन



मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने तिच्या जागतिक प्रतिष्ठेत मोठी भर पडली आहे. मराठी ही केवळ संवादाची भाषा नाही, तर ज्ञानाची, विचारांची आणि परिवर्तनाची भाषा आहे. अभिजाततेच्या सन्मानासोबत आता तिच्या अधिक व्यापक प्रसाराची जबाबदारी आपल्यावर आहे, महाराष्ट्र शासनाच्या लोकप्रिय मराठी 'लोकराज्य' या मासिकातून आपल्या स्तरावर मराठीच्या संवर्धनासाठी सातत्याने लिखाण होत आहे, हा अतिशय कौतुकास्पद आणि स्तुत्य असा उपक्रम आहे.

देशाच्या राजधानीत मायमराठीचा हा जागर दिनांक २१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी, तालकटोरा स्टेडियम, नवी दिल्ली येथे होत आहे. या निमित्ताने 'लोकराज्य' या शासकीय मासिकाच्या जानेवारी-फेब्रुवारी २०२५ च्या अंकाच्या प्रकाशनामध्ये विविध विषयांवर ज्येष्ठ साहित्यिक, अभ्यासक, पत्रकार आदी मान्यवरांचे लेख म्हणजे दुग्धशर्करा योग म्हणायचा.

मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या जतन व संवर्धनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यंदा दिल्लीच्या मातीत संपन्न होत आहे, ही संपूर्ण मराठी समाजासाठी अभिमानाची आणि ऐतिहासिक घटना आहे. तब्बल ७० वर्षानंतर देशाच्या राजधानीत मराठी साहित्यिकांचा हा महामेळा भरतो आहे, याचा प्रत्येक मराठी माणसाला निश्चितच आनंद आहे.

महाराष्ट्र हे मराठी भाषकांचे राज्य आहे आणि मराठी ही ह्या राज्याच्या राजभाषापदी विराजमान आहे. ह्या राजभाषेचा राज्यात, देशात आणि विश्वात मान राखण्यासाठी लोकांनी निवडलेले शासन सदैव तत्परच राहील. ह्या संमेलनानिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या या मासिकाकरिता माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

**- उदय सामंत**
मराठी भाषा विभाग मंत्री



Scanned with OKEN Scanner

# संमेलनाचे वर्ष, ठिकाण आणि अध्यक्ष

| | वर्ष | ठिकाण | अध्यक्ष |
|---|---|---|---|
| १ | १८७८ | पुणे | न्या. महादेव गोविंद रानडे |
| २ | १८८५ | पुणे | कृष्णशास्त्री राजवाडे |
| ३ | १९०५ | सातारा | रघुनाथ पांडुरंग करंदीकर |
| ४ | १९०६ | पुणे | वासुदेव गोविंद कानिटकर |
| ५ | १९०७ | पुणे | विष्णू मोरेश्वर महाजनी |
| ६ | १९०८ | पुणे | चिंतामण विनायक वैद्य |
| ७ | १९०९ | बडोदे | कान्होबा रामछोडदास कीर्तिकर |
| ८ | १९१२ | अकोला | हरी नारायण आपटे |
| ९ | १९१५ | मुंबई | गंगाधर पटवर्धन |
| १० | १९१७ | इंदूर | गणेश जनार्दन आगाशे |
| ११ | १९२१ | बडोदे | नरसिंह चिंतामण केळकर |
| १२ | १९२६ | मुंबई | माधव विनायक किबे |
| १३ | १९२७ | पुणे | श्रीपाद कृष्ण कोल्हटकर |
| १४ | १९२८ | ग्वाल्हेर | माधव श्रीहरी अणे |
| १५ | १९२९ | बेळगाव | शिवराम महादेव परांजपे |
| १६ | १९३० | मडगाव | वामन मल्हार जोशी |
| १७ | १९३१ | हैदराबाद | श्रीधर वेंकटेश केतकर |
| १८ | १९३२ | कोल्हापूर | सयाजीराव गायकवाड |
| १९ | १९३३ | नागपूर | कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर |
| २० | १९३४ | बडोदे | नारायण गोविंद चापेकर |
| २१ | १९३५ | इंदूर | भवानराव श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी |
| २२ | १९३६ | जळगाव | माधव जुलियन |
| २३ | १९३८ | मुंबई | विनायक दामोदर सावरकर |
| २४ | १९३९ | अहमदनगर | दत्तो वामन पोतदार |
| २५ | १९४० | रत्नागिरी | नारायण सीताराम फडके |
| २६ | १९४१ | सोलापूर | विष्णू सखाराम खांडेकर |
| २७ | १९४२ | नाशिक | प्रल्हाद केशव अत्रे |
| २८ | १९४३ | सांगली | श्रीपाद महादेव माटे |
| २९ | १९४४ | धुळे | भार्गवराम विठ्ठल वरेरकर |
| ३० | १९४६ | बेळगाव | गजानन त्र्यंबक माडखोलकर |
| ३१ | १९४७ | हैदराबाद | नरहर रघुनाथ फाटक |
| ३२ | १९४९ | पुणे | शंकर दत्तात्रय जावडेकर |
| ३३ | १९५० | मुंबई | यशवंत दिनकर पेंढारकर |
| ३४ | १९५१ | कारवार | अनंत काकबा प्रियोळकर |
| ३५ | १९५२ | अमळनेर | कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी |
| ३६ | १९५३ | अहमदाबाद | विठ्ठल दत्तात्रय घाटे |
| ३७ | १९५४ | दिल्ली | लक्ष्मणशास्त्री बाळाजी जोशी |
| ३८ | १९५५ | पंढरपूर | शंकर दामोदर पेंडसे |
| ३९ | १९५७ | औरंगाबाद | अनंत काणेकर |
| ४० | १९५८ | मालवण | अनिल |
| ४१ | १९५९ | मिरज | श्रीकृष्ण केशव क्षीरसागर |
| ४२ | १९६० | ठाणे | रामचंद्र श्रीपाद जोग |
| ४३ | १९६१ | ग्वाल्हेर | कुसुमावती देशपांडे |
| ४४ | १९६२ | सातारा | नरहर विष्णू गाडगीळ |
| ४५ | १९६४ | मडगाव | वि. वा. शिरवाडकर |
| ४६ | १९६५ | सातारा | वामन लक्ष्मण कुलकर्णी |
| ४७ | १९६७ | भोपाळ | विष्णू भिकाजी कोलते |
| ४८ | १९६९ | वर्धा | पु. शि. रेगे |
| ४९ | १९७३ | यवतमाळ | गजानन दिगंबर माडगूळकर |
| ५० | १९७४ | इचलकरंजी | पु. ल. देशपांडे |
| ५१ | १९७५ | कराड | दुर्गा भागवत |
| ५२ | १९७७ | पुणे | पु. भा. भावे |
| ५३ | १९७९ | चंद्रपूर | वामन कृष्ण चोरघडे |
| ५४ | १९८० | बार्शी | गं. बा. सरदार |
| ५५ | फेब्रु.१९८१ | अकोला | गो. नी. दांडेकर |
| ५६ | डिसें.१९८१ | रायपूर | गंगाधर गाडगीळ |
| ५७ | १९८३ | अंबेजोगाई | व्यंकटेश दिगंबर माडगूळकर |
| ५८ | १९८४ | जळगाव | शंकर रामचंद्र खरात |
| ५९ | १९८५ | नांदेड | शंकर बाबाजी पाटील |
| ६० | १९८८ | मुंबई | विश्राम बेडेकर |
| ६१ | १९८८ | ठाणे | वसंत कानेटकर |
| ६२ | १९८९ | अमरावती | केशव जगन्नाथ पुरोहित |
| ६३ | जाने.१९९० | पुणे | यु. म. पठाण |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| ६४ | डिसें.१९९० | रत्नागिरी | मधू मंगेश कर्णिक |
| ६५ | १९९२ | कोल्हापूर | रमेश मंत्री |
| ६६ | १९९३ | सातारा | विद्याधर गोखले |
| ६७ | १९९४ | पणजी | राम शेवाळकर |
| ६८ | १९९५ | परभणी | नारायण सुर्वे |
| ६९ | १९९६ | आळंदी | शांता शेळके |
| ७० | १९९७ | अहमदनगर | ना. स. इनामदार |
| ७१ | १९९८ | परळी-वैजनाथ | द. मा. मिरासदार |
| ७२ | १९९९ | मुंबई | वसंत बापट |
| ७३ | २००० | बेळगाव | य. दि. फडके |
| ७४ | २००१ | इंदूर | विजया राजाध्यक्ष |
| ७५ | २००२ | पुणे | राजेन्द्र बनहट्टी |
| ७६ | २००३ | कराड | सुभाष भेंडे |
| ७७ | २००४ | औरंगाबाद | रा. ग. जाधव |
| ७८ | २००५ | नाशिक | केशव मेश्राम |
| ७९ | २००६ | सोलापूर | मारुती चितमपल्ली |
| ८० | २००७ | नागपूर | अरुण साधू |
| ८१ | २००८ | सांगली | म. द. हातकणंगलेकर |
| ८२ | २००९ | महाबळेश्वर | आनंद यादव |
| ८३ | २०१० | पुणे | द. भि. कुलकर्णी |
| ८४ | २०११ | ठाणे | उत्तम कांबळे |
| ८५ | २०१२ | चंद्रपूर | वसंत आबाजी डहाके |
| ८६ | २०१३ | चिपळूण | नागनाथ कोत्तापल्ले |
| ८७ | २०१४ | सासवड | फ. मुं. शिंदे |
| ८८ | २०१५ | घुमान (पंजाब) | सदानंद मोरे |
| ८९ | २०१६ | पिंपरी-चिंचवड | श्रीपाल सबनीस |
| ९० | २०१७ | डोंबिवली | अक्षयकुमार काळे |
| ९१ | २०१८ | बडोदे | लक्ष्मीकांत देशमुख |
| ९२ | २०१९ | यवतमाळ | अरुणा ढेरे |
| ९३ | २०२० | उस्मानाबाद | फादर फ्रान्सिस दिब्रिटो |
| ९४ | २०२१ | नाशिक | जयंत नारळीकर |
| ९५ | २०२२ | उदगीर | भारत सासणे |
| ९६ | २०२३ | वर्धा | नरेंद्र चपळगावकर |
| ९७ | २०२४ | अमळनेर | रवींद्र शोभणे |
| ९८ | २०२५ | दिल्ली | डॉ. तारा भवाळकर |

# संमेलनाध्यक्ष...


न्या. महादेव गोविंद रानडे
१८७८, पुणे


कृष्णशास्त्री राजवाडे
१८८५, पुणे


रघुनाथ पांडुरंग करंदीकर
१९०५, सातारा


वासुदेव गोविंद कानिटकर
१९०६, पुणे


विष्णू मोरेश्वर महाजनी
१९०७, पुणे


चिंतामण विनायक वैद्य
१९०८, पुणे


कान्होबा कीर्तिकर
१९०९, बडोदे


हरी नारायण आपटे
१९१२, अकोला


गंगाधर पटवर्धन
१९१५, मुंबई


गणेश जनार्दन आगाशे
१९१७, इंदूर


नरसिंह चिंतामण केळकर
१९२१, बडोदे




Scanned with OKEN Scanner



माधव विनायक किबे
१९२६, मुंबई


श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
१९२७, पुणे


माधव श्रीहरी अणे
१९२८, ग्वाल्हेर


शिवराम महादेव परांजपे
१९२९, बेळगाव


वामन मल्हार जोशी
१९३०, मडगाव


श्रीधर वेंकटेश केतकर
१९३१, हैदराबाद


सयाजीराव गायकवाड
१९३२, कोल्हापूर


कृष्णाजी खाडिलकर
१९३३, नागपूर


नारायण गोविंद चापेकर
१९३४, बडोदे



भवानराव पंतप्रतिनिधी
१९३५, इंदूर


माधव जुलियन
१९३६, जळगाव



विनायक दामोदर सावरकर
१९३८, मुंबई



दत्तो वामन पोतदार
१९३९, अहमदनगर



नारायण सीताराम फडके
१९४०, रत्नागिरी


विष्णू सखाराम खांडेकर
१९४१, सोलापूर



प्रल्हाद केशव अत्रे
१९४२, नाशिक


श्रीपाद महादेव माटे
१९४३, सांगली



भार्गवराम विठ्ठल वरेरकर
१९४४, धुळे



गजानन त्र्यंबक माडखोलकर
१९४६, बेळगाव


नरहर रघुनाथ फाटक
१९४७, हैदराबाद


शंकर दत्तात्रेय जावडेकर
१९४९, पुणे


यशवंत दिनकर पेंढारकर
१९५० मुंबई


अनंत काकबा प्रियोळकर
१९५१, कारवार


कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी
१९५२, अमळनेर



Scanned with OKEN Scanner



विठ्ठल दत्तात्रय घाटे
१९५३, अहमदाबाद


लक्ष्मणशास्त्री जोशी
१९५४, दिल्ली


शंकर दामोदर पेंडसे
१९५५, पंढरपूर



अनंत काणेकर
१९५७, औरंगाबाद


आ. रा. देशपांडे
१९५८, मालवण



श्रीकृष्ण केशव क्षीरसागर
१९५९, मिरज



रामचंद्र श्रीपाद जोग
१९६०, ठाणे


कुसुमावती देशपांडे
१९६१, ग्वाल्हेर


नरहर विष्णू गाडगीळ
१९६२, सातारा


वि. वा. शिरवाडकर
१९६४, मडगाव


वामन लक्ष्मण कुलकर्णी
१९६५, सातारा


विष्णू भिकाजी कोलते
१९६७, भोपाळ



पु. शि. रेगे
१९६९, वर्धा


गजानन दिगंबळ माडगूळकर
१९७३, यवतमाळ


पु. ल. देशपांडे
१९७४, इचलकरंजी


दुर्गा भागवत
१९७५, कराड


पु. भा. भावे
१९७७, पुणे


वामन कृष्ण चोरघडे
१९७९, चंद्रपूर


गं. बा. सरदार
१९८०, बार्शी


गो. नी. दांडेकर
१९८१ फेब्रुवारी, अकोला


गंगाधर गाडगीळ
१९८१ डिसेंबर, रायपूर



व्यंकटेश दिगंबर माडगूळकर
१९८३, अंबेजोगाई


शंकर रामचंद्र खरात
१९८४, जळगाव



शंकर बाबाजी पाटील
१९८५, नांदेड



Scanned with OKEN Scanner


विश्राम बेडेकर
१९८८, मुंबई



वसंत कानेटकर
१९८८, ठाणे


केशव जगन्नाथ पुरोहित
१९८९, अमरावती


यु. म. पठाण
१९९० (जानेवारी), पुणे


मधू मंगेश कर्णिक
१९९०, रत्नागिरी


रमेश मंत्री
१९९२, कोल्हापूर


विद्याधर गोखले
१९९३, सातारा



राम शेवाळकर
१९९४, पणजी


नारायण सुर्वे
१९९५, परभणी


शांता शेळके
१९९६, आळंदी


नागनाथ इनामदार
१९९७, अहमदनगर


द. मा. मिरासदार
१९९८, परळी–वैजनाथ



वसंत बापट
१९९९, मुंबई



य. दि. फडके
२०००, बेळगाव



विजया राजाध्यक्ष
२००१, इंदूर



राजेंद्र बनहट्टी
२००२, पुणे



सुभाष भेंडे
२००३, कराड



रा. ग. जाधव
२००४, औरंगाबाद


केशव मेश्राम
२००५, नाशिक


मारूती चितमपल्ली
२००६, सोलापूर


अरुण साधू
२००७, नागपूर


मधुकर हातकणंगलेकर
२००८, सांगली


आनंद यादव
२००९, महाबळेश्वर



द. भि. कुलकर्णी
२०१०, पुणे



Scanned with OKEN Scanner




उत्तम कांबळे
२०११, ठाणे



वसंत आबाजी डहाके
२०१२, चंद्रपूर



नागनाथ कोत्तापल्ले
२०१३, चिपळूण



फ. मुं. शिंदे
२०१४, सासवड



सदानंद मोरे
२०१५, घुमान (पंजाब)



श्रीपाल सबनीस
२०१६, पिंपरी-चिंचवड



अक्षयकुमार काळे
२०१७, डोंबिवली



लक्ष्मीकांत देशमुख
२०१८, बडोदे



अरुणा ढेरे
२०१९, यवतमाळ



फादर फ्रान्सिस दिब्रिटो
२०२०, उस्मानाबाद



जयंत नारळीकर
२०२१, नाशिक



भारत सासणे
२०२२, उदगीर



नरेंद्र चपळगावकर
२०२३, वर्धा



रवींद्र शोभणे
२०२४, अमळनेर



डॉ. तारा भवाळकर
२०२५, दिल्ली

सरहद, पुणे आयोजित
अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे

९८ वे

**अखिल भारतीय**
**मराठी साहित्य संमेलन, दिल्ली**
२०२५

# वाङ्मयाची प्रेरणा

लोकहितवादी गोपाळराव देशमुख व जोतिराव फुले हे दोघे धार्मिक व सामाजिक सुधारणेचा विचार करणारे ह्या नवयुगाचे पहिले पुरुष होत. लोकहितवादींचा विचार व फुले यांचा आचार सामर्थ्यशाली होता. अवनत व दलितवर्गाची प्रक्षुब्ध जाणीव व मूलगामी सामाजिक परिवर्तनाची आकांक्षा यांचे भारतातील पहिले प्रतीक फुले होत. मध्यमवर्गीय सुधारणेची चळवळ लोकहितवादींच्या वैचारिक लेखनापासून सुरू झाली. धार्मिक व सामाजिक विचारांचा विकास ब्रह्मसमाजाच्या महाराष्ट्रातील शाखेने केला. न्या. रानडे, डॉ. भांडारकर इत्यादिकांच्या प्रयत्नांनी या चळवळीला रूप आले. या चळवळीमुळे ज्या क्रिया व प्रतिक्रिया उत्पन्न झाल्या त्यातच महाराष्ट्रातील आधुनिक वाङ्मयाची चळवळ वाढीस लागली.

**- लक्ष्मणशास्त्री जोशी**
(दिल्ली - १९५४, अध्यक्षीय भाषणातून)



Scanned with OKEN Scanner

दिल्लीत होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे. २१ ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत नवी दिल्ली येथे हे संमेलन होणार आहे. प्रा. डॉ. तारा भवाळकर हे नाव मराठी साहित्य, लोकसाहित्य आणि रंगभूमीच्या अभ्यासात प्रसिद्ध आहे. ताराबाई सुरुवातीपासून शिक्षिका आहेत, तशाच लोकशिक्षिका म्हणूनसुद्धा त्यांची ख्याती आहे. त्यांच्या व्याख्यानात नेहमीच प्रबोधनाची दिशा आणि नवी माहिती असते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने डॉ. भवाळकर यांच्याशी साधलेला संवाद..

# प्रबोधनाची दिशा

**९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आपण अध्यक्ष आहात. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आता शतकपूर्तीच्या दिशेने वाटचाल करत आहे. याबद्दल आपल्याला काय वाटते?**

साहित्यिकदृष्ट्या ग्रामीण भागातील सामान्य माणूस जागा होत आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर माणसं लिहायला लागली आहेत. ज्यांच्या घरात पूर्वी लेखन, वाचन नव्हते, अशी मुलं, मुली लिहू लागली आहेत. व्हॉट्सअॅप, फेसबुक आणि इन्स्टाग्राम या समाजमाध्यमातून प्रत्येकजण आपल्या परीने अभिव्यक्त होताना दिसत आहे. त्यांची साहित्य संमेलने छोट्या स्वरूपात का होईना; पण होत असतात. वेळेच्या मर्यादिमुळे राष्ट्रीय स्तरावरील साहित्य संमेलनात साहित्यिकांना कमी वाव मिळणे स्वाभाविक आहे. अशा वेळी सांगलीसारख्या छोट्या जिल्ह्यामध्ये वर्षाला दहा ते पंधरा संमेलने होतात. त्यामुळे मराठी साहित्याचा मंच अनेक लोकांना उपलब्ध होत आहे. यामुळे स्थानिक लोकांना त्याचा लाभ मिळत आहे. लिहिणाऱ्यांना त्यातून प्रोत्साहन मिळत असते आणि त्यातूनच नवीन लेखक पुढे येत असतात. लोकल टू ग्लोबल म्हणजेच स्थानिक ते जागतिक पातळीवर पोहोचण्यासाठीच्या प्रवासाची ही सुरुवात आहे, असे माझे निरीक्षण आहे.

**अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेला नवीन ऊर्जा मिळाली का?**

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा म्हणून शासकीय मान्यता मिळाल्यानंतर एक मराठी व्यक्ती म्हणून समाधान वाटले. केवळ सरकारी शिक्कामोर्तब झाले म्हणून भाषेचा दर्जा एकदम वाढत नाही. त्यातून आर्थिक फायदे मिळण्याची शक्यता आहे. शासनाकडून मराठी भाषक, संस्था, विद्यापीठ, नवलेखक आणि संशोधकांना आर्थिक साहाय्य होऊ शकेल. त्यातून प्रकाशन संस्था निघू शकतील आणि त्या निघाव्यात, त्यासाठी मराठी जाणकार भाषकांनी अधिक प्रयत्न करायला हवेत. केवळ अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून स्वस्थ बसून चालणार नाही तर तो वाढवणं आणि टिकवणं हे मराठी भाषकांच्या हातात आहे. एकीकडे मराठी भाषेचा अभिमान बाळगत असतानाच त्या अभिमानाच्या अंमलबजावणीसाठी मराठी भाषक, मराठी माणसे काय करतात, याचे आत्मपरीक्षण होणे गरजेचे आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी मराठी लोकांना तिच्याबद्दल आपुलकी असणे गरजेचे आहे. मराठी भाषक आणि मराठी लोकांनी त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत.



### अभिजात भाषेचा दर्जा मिळालेली मराठी भाषा आता ज्ञानभाषा कशी करता येईल?

यासाठी सर्व समाजानेच प्रयत्न करायला हवेत. शिक्षण संस्थांनीसुद्धा त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. मुख्य म्हणजे मराठी बोलणाऱ्यांनी प्रयत्न करायला हवेत. मराठीचा अभिमान बाळगायला हवा. मनातील स्वभाषेविषयीच्या न्यूनगंडातून सर्वप्रथम बाहेर काढले पाहिजे. त्यानंतरच ती ज्ञानभाषा करण्यासाठी प्रयत्न होतील. ज्ञान याचा अर्थ नव्याने एखाद्या गोष्टीचे भान येणे आणि ते आपल्या भाषेतून व्यक्त करणे. हिंदी किंवा इंग्रजीमधून सांगितले की जगाच्या पाठीवर ते पसरेल, असा समज आहे. ज्ञान तुमच्याजवळ असेल तर ते घेण्यासाठी तुमची भाषा आपणहून शिकण्यासाठी इतर ठिकाणहून लोक यायला पाहिजेत. दुसऱ्या महायुद्धानंतर जपान, जर्मनीसारख्या अन्य देशांची उदाहरणे पाहता त्यांच्याकडील अद्ययावत तंत्रज्ञान, यंत्रज्ञान त्यांनी त्यांच्या भाषेतच उपलब्ध करून दिले. त्यामुळे ते तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी आधी त्यांची भाषा अवगत करणे अपरिहार्य असते. त्याचप्रमाणे मराठीमध्येही तसे ज्ञान, तंत्रज्ञान, यंत्रज्ञान, अभियांत्रिकी, तत्त्वज्ञान, वैद्यकशास्त्र असेल तर मराठी भाषा अन्य लोक स्वतःहून शिकतील. त्या दर्जाचे संशोधन, लेखन करणारी मराठीतील आत्माभिमानी नवी पिढी निर्माण व्हायला पाहिजे.

### भाषा आणि लिपी यांच्यातील अनुबंधाकडे आपण कसे पाहता?

भाषा आणि लिपी यांच्यात अनुबंध आहे, तो शिक्षितांनाही माहिती नसतो. मी तंजावरला व्यंकोजीराजे भोसलेराजे यांनी केलेल्या कार्याचा आणि साहित्यसंग्रहाचा अभ्यास केला. त्या ठिकाणी अनेक नाटकांची हस्तलिखिते सापडली आहेत. त्यातील गंमत अशी की, त्या नाटकांची भाषा मराठी लिपी तमिळ, तेलगु किंवा कन्नड आहे. भाषा कन्नड लिपी देवनागरी आहे. गुजराती लोकसंस्कृतीचा अभ्यास करणाऱ्या माझ्या परिचयातील एका व्यक्तीने गुजराती भाषेत पुस्तक लिहिले आहे, पण ते देवनागरी लिपीत छापले. त्याचा परिणाम असा झाला ज्यांना गुजराती येत नाही; पण देवनागरी येते त्यांनी ते वाचले तर त्यांना त्यातील ७० ते ८० टक्के आशय सहज समजतो. गोव्यामध्ये कोकणी तसेच मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये लिहिणारे, वाचणारे, संशोधन करणारे आहेत. त्यातील एक लेखिका कोकणी भाषेत लिहिते, मात्र ती लेखनासाठी देवनागरी लिपी वापरते. त्यामुळे लिहिलेलं साहित्य आपल्याला ७० ते ८० टक्के समजते. त्या भाषांमध्ये उच्चारांचा थोडासा फरक वगळला तर बऱ्याच गोष्टी समान असतात आणि लिपीमुळे आपल्याला त्या उलगडतात.



### भाषेतील साहित्य वाढीला राज्यांची सीमाबंधने आहेत, असे वाटते का?

माझ्या मते कोणत्याही सीमा प्रदेशातील सर्वसामान्य माणसाच्या मनामध्ये सीमा बंधने नाहीत. असली तर ती फार पुसट आहेत. भौगोलिक सीमा प्रदेशांमध्ये राहणारी मंडळी उभयभाषक आहेत. माझ्या मते सीमा प्रदेशातील लोक विशेषतः शाळा, महाविद्यालयात शिकणारी मुलं ही भाषेच्या समृद्धीमुळे जास्त श्रीमंत आहेत. कारण ते उभय भाषांमध्ये व्यवहार करतात. तसेच सीमा भागात मोठ्या प्रमाणावर साहित्य संमेलन होत असतात. सीमा भागांमध्ये दोन्ही भाषांमध्ये आदान-प्रदान करणाऱ्या संस्था आहेत. तिथे अनुवादकांचा सत्कार केला जातो. साहित्यानं तो ऋणानुबंध आजही टिकवून ठेवला आहे. भाषिक सीमा राजकारणामुळे दुभंगल्या असल्या तरी चाली, रीती, रूढी, परंपरा, लोकसंस्कृती, श्रद्धा, खाद्यपदार्थ यांचं आदानप्रदान सीमाप्रदेशात झालं आहे आणि आजही ते सुरू आहे.

सरहद, पुणे आयोजित
अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे
९८ वे
अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

### मराठी भाषा संवर्धनात अन्य भाषक किंवा ब्रिटिश राज्यकर्त्यांची भूमिका कोणती होती?

आपल्याकडे जेव्हा इंग्रज प्रथम आले, त्यावेळी त्यांना आपल्याकडील प्रत्येक गोष्टींबद्दल उत्सुकता होती. संस्कृतमधील नाटकं, वेद उपनिषदे यासारखे ग्रंथ यामध्ये काय आहे हे समजण्यासाठी इथं आलेले ब्रिटिश लोक प्रथम संस्कृत शिकले. त्यांनी संस्कृतची अक्षरशः संथा घेतली. मॅक्समुल्लरसारख्या विद्वानांना ज्ञानाची ओढ होती. युरोपमधून व्यापारासाठी लोक आले, राज्य करण्यासाठी आले. त्यांनी ज्या प्रांतामध्ये धर्म, व्यापाराचा प्रसार करायचा असेल, त्या त्या प्रांतातील भाषांचे प्रथम शिक्षण घेतले. पोर्तुगालमधील लोक गोव्यात आल्यानंतर मराठी, कोकणी भाषा शिकले. मराठीतील पहिलं व्याकरण युरोपियन माणसाने लिहिलं. विरामचिन्हं इंग्रजांनी दिली. मराठीतील पहिले पुस्तक छापलं ते कोलकत्याजवळील मिशनच्या एका छापखान्यात. त्यांच्या हेतूसाठी का होईना इंग्रज आपली भाषा शिकले. आम्ही त्यांची भाषा शिकायला लागलो. सांगलीसारख्या छोट्या संस्थानात इंग्रजी बुक वाचणारा कोणी आला तर त्याचे कौतुक वाटे; पण मराठी शिकणारा कोणी आला तर त्याचे फारसे कौतुक वाटले नाही. ते काम ख्रिश्चन धर्मगुरू फादर स्टिफनसनने गोव्यामध्ये केलं. मराठीचं कौतुक जसं ज्ञानेश्वरांनी केलं तसं सातासमुद्रापारहून



Scanned with OKEN Scanner

आलेल्या फादर स्टीफनसनने मराठी भाषा शिकून मराठी भाषेची स्तुती केली. 'जैसी पुष्पामाजी पुष्प मोगरी, परिमळामाजी कस्तुरी, तैशी भाषा माझी साजरी, भाषा मराठी' या शब्दांत फादर स्टीफनसनने मराठी भाषेचं कौतुक केलं.

### मराठी माध्यमातून शिकलेली मुलं स्पर्धेच्या सर्व क्षेत्रात कमी पडतात असे वाटते का?

अलीकडच्या काळात इंग्रजी भाषेत शिकलं तर त्याला प्रतिष्ठा. जुन्या काळात जसं संस्कृतमधून बोललं की पांडित्य होतं, तसं सध्याचं पांडित्य इंग्रजीत आहे. अगदी ग्रामीण भागातील पालकांचाही आपल्या मुलांनी इंग्रजीत शिकावं, असा आग्रह असतो. इंग्रजीला प्रतिष्ठा आहे, हा शहरी लोकांचा अपसमज आहे आणि तो ग्रामीण भागापर्यंत रुजवला जातोय; पण मराठी माध्यमातून शिकलेली मुलं कोणत्याही क्षेत्रात कमी पडत नाहीत. याची अनेक यशस्वी उदाहरणे देता येतील.

### मराठी भाषकांमधील हा न्यूनगंड दूर करण्यासाठी काय उपाय आहे?

वास्तविक आपल्या देशाची संस्कृती प्राचीन आहे, तत्त्वज्ञान मोठं आहे. मग देशातील उच्चवर्णीय, उच्चशिक्षित पालकांमध्ये असुरक्षिततेची भावना का असावी? माझा मुलगा परदेशात नाही गेला तर दुसरा मार्गच मिळणार नाही, असे त्यांना का वाटते, असा मला प्रश्न पडतो. जपानसारखा दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेला देश राखेतून ताठ मानाने उभा राहिला. आमची भाषा शिकल्याशिवाय तुम्हाला आमचे तंत्रज्ञान मिळणार नाही, असे म्हणतो. मराठी जनांनी आपल्या मुलांना आग्रहाने मराठी शिकवले पाहिजे आणि त्यांना प्रवृत्त केले पाहिजे की, तुम्ही साहित्यांचा अभ्यास संशोधन करा व मराठी भाषेमध्ये मांडा त्यामुळे ते तंत्रज्ञान शिकण्यासाठी लोक तुमच्याकडे आले पाहिजेत. अशा शिक्षणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न सर्वच स्तरातून केले पाहिजेत.




### लोकसाहित्यावर आपण खूप संशोधन, संकलन केले आहे. त्याबद्दल थोडेसे?

लोकसाहित्याबद्दल म्हणाल तर काही अपसमज आहेत. लोकसाहित्य ग्रामीण, अशिक्षित लोकांचे भूतकाळातील असते असे काही समज आहेत. ग्रामीण भागातील महिलांनी जात्यावर दळण दळत असताना ओव्या लिहिल्या. या सर्वांशी आमचा संबंध नाही असा भाव शहरी लोकांच्याकडे पाहिले की दिसतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये करमणुकीचे साधन व पैसे देणारे साधन म्हणून गोंधळ, जागरण, पोवाडा, लावण्या काही अंशी टिकून राहिले आहे. कारण त्यामध्ये गीत, नृत्य, नाट्य, वाद्य आहे. त्या सगळ्याचा संगम म्हणून ते नृत्यनाट्य सादर होत आहे. मात्र त्यामध्ये धार्मिक भावना, संस्कृतीची गुंफण होती, ते श्रद्धाविश्व गळून पडू नये त्या पार्श्वभूमीवर कलात्मक घटकांचा विकास होण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

### स्त्रीवादी साहित्याबद्दल काय सांगाल?

स्त्रीवादी जाणिवा व्यक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य. या साहित्यामध्ये निरनिराळ्या क्षेत्रातील सामाजिक प्रश्नांवर व्यापक स्तरावर महिला लिहिताना, व्यक्त होताना दिसत आहेत. आदिवासी, ग्रामीण भागातील महिलाही विशेषकरून लिहिताना दिसत आहेत. लोकसाहित्यातील महिलांचा विचार करता, त्यांच्या लेखनातून महिला पहिल्यापासून खूप हुशार आहेत, असे मला वाटते. आमच्याकडे स्त्रियांबद्दल पुरुष काय म्हणतात त्याचा जास्त विचार झालेला आहे. तथाकथित स्त्रीमुक्तीवादी महिला म्हणते त्याच्यापेक्षा जात्यावर दळण दळणारी बाई जास्त क्रांतिकारी बोललेली आहे हे मी सांगितलं तर तुम्हाला आश्चर्य वाटेल. ती बोलून दाखवत होती फक्त ते ऐकायला कोणी नव्हतं. बहिणाबाईंनी अशिक्षित असूनही अनेक शब्दांच्या व्युत्पत्ती सांगितल्या. संत स्त्रिया आधुनिक कवियित्रींच्या खूप पुढे होत्या.

### वाचनसंस्कृती वाढण्यासाठी काय करायला पाहिजे?

पुस्तकांचे ढीग आणून टाकले म्हणजे वाचन संस्कृती वाढत नाही. माणसांना आतून वाटल्याशिवाय, पोटातून आल्याशिवाय ते ओठावर येणार नाही. माणसांना ज्ञान संपादनाची निकड वाटली पाहिजे आणि ते ज्ञान संपादन, वाचन ज्या मार्गाने होत असेल त्या मार्गाने केले पाहिजे. ऐकून, वाचून किंवा अन्य भाषा शिकून ज्ञानसंपादन केले पाहिजे. कविता, कथा किंवा कादंबरी असे सर्व साहित्यप्रकार आपल्याला वाचायला शिकवतात.

### साहित्य क्षेत्रात नव्या पिढीकडून काय अपेक्षा आहेत?

ग्रामीण भागातील मुलं, मुली नव्याने लिहायला लागली आहेत. पुस्तकं मोठ्या संख्येने प्रकाशित होत आहेत. छोट्या छोट्या गावांमध्ये प्रकाशक पुढे येत आहेत. सुदैवाने काही जणांना स्वखर्चाने पुस्तक प्रकाशित करण्याची आता ऐपत निर्माण झाली आहे. त्यामुळे एकूणच खर्च करण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. साहित्याच्या दृष्टीने पुस्तके विकत घ्यावीत, स्वखर्चाने पुस्तके प्रकाशित करावीत, असे नव साहित्यिकांना तसेच लोकांना वाटते आहे. यातून पुस्तकाबद्दलची आस्थाच प्रगट होत आहे. ही गोष्ट खरेच समाधानाची आणि तितकीच महत्त्वाची आहे.

**शब्दांकन : संप्रदा बीडकर,** जिल्हा माहिती अधिकारी, सांगली



Scanned with OKEN Scanner

गझल मराठी भाषेत आता अशी सामावून गेलेली आहे की, मराठी मनाचे ती एक अंग झाली आहे. तंत्रशुद्ध आशयघन आणि गझलियतने ओतप्रोत अशी गजल सुरेश भटांनी मराठी साहित्याला दिली. हे सगळे खरे असले तरी, भरभरून आपण उचंबळून दाद देऊन गझलला आणि पर्यायाने आम्हा सर्वांनाच तारले ते कद्रदान रसिकांनी... गजलसाठी आता पोषक वातावरण आहे.. सर्वत्र गझलचा बोलबाला आहे.. गझल... आणि मराठीत? असा प्रश्न आता कोणी विचारत नाही... हद्दपार झालाय तो !

# अभिव्यक्तीचे माध्यम मराठी गझल...

**भिमराव पांचाळे**

*जाणते ही बाग*
*माझ्या सोसण्याच्या सार्थकाला*
*मी इथे हे अमृताचे रोपटे रुजवून गेलो...*

सुरेश भटांच्या सोसण्याचे सार्थक झाले. त्यांनी लावलेले गझलचे अमृताचे रोपटे मराठी मातीत नुसते रुजले नाही तर त्याचा महावृक्ष झाला, फांद्या सर्वदूर पसरल्या अणि त्याची गोमटी फळं आज मराठी रसिक चाखत आहेत. भावनांच्या अभिव्यक्तीचे एक सशक्त माध्यम असलेला अनोखा आणि मनभावन काव्यप्रकार त्याच्या सर्व गुणवैशिष्ट्यांसह मराठी भाषेत आणला, रसिकप्रिय केला. मराठी भाषेला गझल या काव्यप्रकाराचा परिचय करून दिला तो ही माधवरावांनीच. मराठी गझलचा तो आरंभ काळ होता. अशा बिनबुडाच्या विरोधाला व संघर्षाला वैतागूनच त्यांनी आपल्या गझलांजलीत लिहिले असावे -

*प्याला भरता तुझ्याच साठी*
*भाळी रसिका कशास आठी*
*भासे सुरई जरी इराणी*
*आहे पण ही इरा मराठी...*

माधव ज्युलियन यांनी जमीन (उर्दू भाषेत छंदाला जमीन असेही म्हणतात) तयार केली आणि सुरेश भटांनी गझलचे रोपटे त्या जमिनीत लावले असे म्हटल्यास वावगे ठरू नये.



## साहित्याचा मुख्य प्रवाह गझल

'अमृताते पैजा जिंके' अशी आपल्या भाषेची थोरवी गाणाऱ्यांनी, उर्दूची ती अदब - 'नजाकत मराठीत येईल का?' किंवा हायकू, सुनित स्वीकारणाऱ्यानी, 'गझल हा परकीय काव्यप्रकार आहे' असे म्हणणे जरा विचित्र नाही वाटत कां?

ठाणे येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात 'मराठी कवितेवर गझलचे आक्रमण' अशा शीर्षकाचा परिसंवाद सेतू माधवराव पगडी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित होणे म्हणजे तर गझलच्या दुस्वासाचा कळस होता. कला एकमेकींना पूरक पोषक असतात. त्या आक्रमक वगैरे तर नसतातच असा विचार करत आम्ही मित्र तिथे काल्पनिक चित्र बघत होतो की, गझलचे घोडेस्वार दौडत आले आहेत आणि कवितेला तुडवत आहेत वगैरे... आज हे सगळे खूप विनोदी वाटते. अनेक छोट्या-मोठ्या धारांना आपल्यात सामावून घेणे हा खरे तर मुख्य प्रवाहाचा नैसर्गिक स्वभाव आहे. मग आपल्या साहित्याचा हा कोणता मुख्य प्रवाह आहे जो, मराठी साहित्याचे दालन समृद्ध करणाऱ्या गझलला आजही मानाचे स्थान देत नाही!

*जरी या वर्तमानाला कळेना आमुची भाषा*
*विजा घेऊन येणाऱ्या पिढ्यांशी बोलतो आम्ही...*

भटसाहेबांना अपेक्षित असलेल्या विजा घेऊन येणाऱ्या पिढ्या त्यांच्या हयातीतच आल्या. भटांच्या गझलचा हा करिष्मा होय. मिर्जा गालिब यांनीसुद्धा त्यांच्या पिढीच्या अदबनवीसांना वैतागून असेच उद्गार काढले होते की, माझी पेशकश त्यांना दुर्बोध वाटते, ते टीकेचे आसूड ओढतात माझ्यावर, मला



Scanned with OKEN Scanner

नाकारतात. हे ईश्वरा! आता एवढेच कर की, माझी शायरी कळेल अशी बुद्धी आणि मन त्यांना दे. आणि जर हे शक्य नसेल तर मग मला अशी जुबान तरी दे जी त्यांना कळेल...

*या रब ! वो ना समझे है,*
*ना समझेंगे मेरी बात*
*दे और दिल उनको, जो ना,*
*दे मुझको जुबां और...*

गालिब आपल्या 'जुबा' वर कायम राहिले म्हणून अमर झाले आणि आम्ही रसिक समृद्ध झालो. गालिब आणि सुरेश भट यांच्या कहनमध्ये फरक इतकाच आहे की, गालिब साहेबांचा वैताग हा वैयक्तिक होता, तर भट साहेबांचा मराठी गझल आपल्या भाषेत रुजावी या आग्रहापोटी होता. गझल मराठी भाषेत आता अशी सामावून गेली की, मराठी मनाचे ती एक अंग झाली आहे. तंत्रशुद्ध आशयघन आणि गझलियत ने ओतप्रोत अशी गझल सुरेश भटांनी मराठी साहित्याला दिली. हे सगळे खरे असले तरी, भरभरून आपण उचंबळून दाद देऊन गझलला आणि पर्यायाने आम्हा सर्वांनाच तारले ते कद्रदान रसिकांनी... गझलसाठी आता पोषक वातावरण आहे.. सर्वत्र गझलचा बोलबाला आहे.. गझल... आणि मराठीत? असा प्रश्न आता कोणी विचारत नाही... हद्दपार झालाय तो!

गझलचा आकृतिबंध मराठी भाषेत प्रस्थापित करून आणि सर्वांगसुंदर अशी गझल लिहून सुरेश भट थांबले नाहीत, तर आपले संपूर्ण आयुष्य देऊन त्यांनी गझलचा प्रसार आणि प्रचार केला. एकल मैफिली करून गझल लोकप्रिय केली. चांगला कवी हा उत्तम गझलकार होऊ शकतो. या त्यांच्याच निरीक्षणानुसार अनेक कवींना त्यांनी गझलकडे वळवले. त्यांना गझलची बाराखडी दिली. अनेकांना प्रत्यक्ष समोर बसवून तर कित्येकांना पत्र आणि फोनद्वारे त्यांची कार्यशाळा घेतली.. अनेक चांगले गझलकार निर्माण केले.. एक पिढी लिहिती केली. 'काफला' नावाच्या पहिल्या प्रातिनिधिक गझल संग्रहाची अनमोल भेट त्यांनी सगळ्या रसिकांना दिली.

## गझलमुळे आयुष्याला खरी दिशी

मी मराठी गझलकडे वळलो तो भट साहेबांमुळेच. अमरावतीच्या राजकमल चौकात त्यांच्याच खुल्या गझल दरबारात त्यांना ऐकले आणि गझलचे गारुड काय असते याची प्रचिती आली. माझे शास्त्रीय, उपशास्त्रीय संगीताचे शिक्षण, रियाज आणि सादरीकरण सुरू होते. उर्दू गझल, गायन आणि जुबान यामध्येही गती होती. रसिकांना भावणारे आणि त्या काळच्या परिस्थितीत मददगार ठरू शकतील, असे सगळे प्रकार मी तयारीने गात होतो. मात्र मराठी गझलची न मळलेली वाट धरल्यावर सुरुवातीला माझेच यार-दोस्त (अर्थात माझ्या काळजी-पोटीच) कुरबुरायचे की, 'याला भिकेचे डोहाळे लागले. वगैरे! ते काहीही असो, मराठी गझलने माझ्या आयुष्याला दिशा दिली, नव्हे - माझ्या आयुष्याची दिशा ठरवली. माझ्या या आत्मीय, आनंददायी आणि नादावलेल्या प्रवासाचे आता अर्धशतक जवळ आलेले आहे. मैफिली गाजवून नावलौकिक आणि मानसन्मान मिळण्यासोबतच सुरेश भटांच्या गझल कार्यात आपलाही खारीचा वाटा असावा या भावनेने व नेक इराद्याने हळूहळू काम सुरू केले. गझल आशयप्रधान गायकीवर सतत मनन चिंतन व त्या अनुषंगाने रियाज सुरू होताच, आकृतिबंधाच्या महत्त्वाच्या व आवश्यक गोष्टी पुस्तके वाचून व जाणकारांकडून समजून घेतल्या. खांद्याला खांदा लावून काम करणारे जिवाभावाचे हमसफर भेटले आणि गझल मार्गदर्शन कार्यशाळा, मुशायरे, मैफिली, गझल, संवाद, चर्चा, शिबिरे, प्रातिनिधिक गझल संग्रह, गझलचे छंदशास्त्र इ. प्रकाशने, 'गझल सागर' हे गझलला वाहिलेले पाक्षिक, नवोदित्त गायकांचा शोध व मैफिली, तरही मुशायरे, उर्दू-मराठी, मिले-जुले मुशायरे, अंधमित्रांसाठी ब्रेल लिपीतील गझल संग्रह असे अनेक लहान मोठे उपक्रम राबवण्याचा सिलसिला सुरू झाला. आधी वैयक्तिक पातळीवरून आणि नंतर 'गझल सागर प्रतिष्ठान'ची स्थापना करून हे कार्य अविरत सुरूच आहे.

## मराठी गझलची चळवळ

गझल हा तंत्रानुसारी काव्यप्रकार आहे. गझलरचनेचा आकृतीने हा कळावा यासाठी हे तंत्र समजून घेणे, शिकणे गरजेचे आहे. ते समजले की, गझल लेखनाचा मार्ग प्रशस्त होतो. हे तंत्र कोणी कसे अवगत करून घ्यावे याचे काही नियम किंवा बंधने वगैरे असू शकत नाहीत, गझल सागर प्रतिष्ठानने महाराष्ट्रभर शंभरच्या वर कार्यशाळा घेतल्या. गझलच्या आकृतिबंधाचे तंत्र माहिती करून देणे हाच एकमेव उद्देश होता. प्रिंट मिडियामधील लेख, मुलाखती, बातम्या असोत किंवा दृश्य माध्यमांवरील माझ्या मैफिली, मुलखती, चर्चा असोत, विषय एकच-मराठी गझल!, मिशन एकच - मराठी गझल! ध्यास एकच - मराठी गझलची चळवळ उभी राहावी!

गझल या विषयावर लोकसत्ता, सकाळ, बेळगाव तरुण भारत, लोकप्रभा, पुण्यनगरी इत्यादींमध्ये स्तंभलेखन केले.

गझलच्या संमेलनाला आलेल्या हजारो जाणकार वाचक रसिकांसमोर गझल पेश करण्याची संधी मिळाली, तर मराठी गझलच्या प्रचार आणि प्रसाराला गती मिळेल हाच केवळ उद्देश होता. त्यावेळी मानधनाची अपेक्षा मुळीच नव्हती; पण अर्ज-विनंत्या तरी किती करायच्या? मनात सतत विचार घोळत होता. यापेक्षा आपला मंच आपणच का निर्माण करू नये! आपल्या मराठी गझलचेच संमेलन का आयोजित करू नये! समविचारी दोस्तांशी चर्चा, विचार-विमर्श केला. विचार पक्का झाला आणि पहिले अखिल भारतीय मराठी गझल संमेलन मुंबई येथे २००१ साली आयोजित केले. संमेलन खूप यशस्वी झाले. २०१८ पर्यंत विविध ठिकाणी ९ संमेलने घेतली.

गझल संमेलनाबद्दल एक खास बात अशीही सांगता येईल.

कथा, कविता, कादंबरी इत्यादी साहित्य प्रकारांचे मिळून एक संमेलन आयोजित होत असते. आणि इथे - साहित्याचा एक प्रकार म्हणजे काव्य आणि काव्याच्याही अनेक प्रकारांपैकी एक म्हणजे गझल. साहित्याच्या एका उपप्रकाराला-गझलला वाहिलेले हे अखिल भारतीय स्तरावरील संमेलन म्हणजे एक ऐतिहासिक मिसाल होय.


## गझलियत ही एक अनुभूती

गझलियत ही एक अनुभूती आहे, गझल रचनेची प्राणशक्ती आहे. सर्जक आणि रसिक या दोघांनाही ती अंतर्बाह्य शहारून टाकते. एखाद्या परिभाषेत तिला निबद्ध करणे म्हणजे



Scanned with OKEN Scanner

केवळ अशक्य! गझलियत ही एक अनुभूती आहे, गझल रचनेची प्राणशक्ती आहे. सर्जक आणि रसिक या दोघांनाही ती आंतरबाह्य शहारून टाकते. एखाद्या परिभाषेत तिला निबद्ध करणे म्हणजे केवळ अशक्य! गझलच्या कार्यशाळा घेण्यावर टीका अशी होत होती की, कार्यशाळेत कधी गझलकार निर्माण होतात का? आमचे म्हणणे सुद्धा हेच होते आणि आहे की, कार्यशाळेत गझलकार तयार होत नाहीत, हे खरे असले तरी गझलकार म्हणून घडण्याच्या प्रक्रियेमधले अडथळे मात्र नक्कीच दूर होऊ शकतात. जाणकारांना आणि खऱ्याखुऱ्या गझलकारांना पुरेपूर माहीत असते की, गझलचे तंत्र अवगत झाले म्हणजे गझल लिहिता आली असे होत नाही. तेथून खरे तर सुरुवात होते गझल लेखनाला, गझलकार म्हणून घडण्याच्या प्रक्रियेला. यथावकाश तंत्राचा सराव होतो आणि त्यानंतर उरतो तो केवळ ध्यास उत्तम गझल लेखनाचा. हे ज्याला समजते त्यालाच गझल साधते आणि ती साधली की गझलेत गझलियत अवतरते.




इंटरनेटच्या या वेगवान जगात फेसबुक, व्हॉट्सॲप इ. समाज माध्यमांनी एक विशाल अवकाश उपलब्ध करून दिलेला आहे. आपले विचार, आपली कला घेऊन कुणालाही यावर सहज व्यक्त होता येते.

हे खूप उपयोगी व फायद्याचे असले तरी गझलच्या बाबतीत नुकसानकारकसुद्धा असल्याचे जाणवले. काही चांगले गझलकार या माध्यमांमुळे सापडतात, तर बरेचसे घाईत असणारेसुद्धा भेटतात. गझल कागदावर उत्तरली रे उत्तरली की कधी एकदा माध्यमावर टाकतो आणि वाहवा मिळवतो- ही ती घाई...

तोलामोलाचा मिसरा मिळून शेर परिपूर्ण होईपर्यंत महिनोनमहिने वाट बघणारे गझलचे खलिफा सुरेश भट व त्यांच्या मार्गावरून चालणारे चांगले गझलकार ठाऊक असल्यामुळे ही घाई जरा खटकते एवढेच.

'नसीम' रिफयत ग्वालियरी, भटसाहेब, 'अब्बास' 'दाना' अशा अनेक शायरांच्या कायम संपर्क व चर्चेतून खूप चांगल्या गोष्टी कळायच्या. गोषवारा हाच असायचा की, चांगला शायर व्हायचे असेल आणि आपल्या लेखनात निखार यायचा असेल तर आपणच आपले टीकाकार होऊन आपली रचना तपासली पाहिजे. जेष्ठ शायरांकडून - उस्तादांकडून (इस्लाह) परिष्करण करून घेतले पाहिजे. आस्वाद घेत इतरांच्या रचना वाचणे, इतरही चौफेर वाचन करणे, मनन, चिंतन, निरीक्षण या सगळ्या गोष्टी म्हणजे रियाजचाच हिस्सा आहेत. आपण पुढे जात असताना धडपडणाऱ्यांना हात देणे म्हणजे चळवळीला हातभार लावण्यासारखेच आहे आणि यासारखा आनंदही दुसरा नाही...

*ते लोक होते वेगळे, घाईत*
*जे गेले पुढे*
*मी मात्र थांबुन पाहतो, मागे*
*कितीजण राहिले....*

फारसी-उर्दूच्या तुलनेत आपली मराठी खूप लहान आहे गझल. याचा सकारात्मक अर्थ असाही घेता येईल की, मोठे व्हायला आपल्याला खूप वाव आहे. गझल मोठी झाली की, आपणही मोठे होऊ. मराठी गझलच्या विकासकार्याला आपण सर्वांनी हातभार लावायला हवा. गझल सागर प्रतिष्ठाननंतर अनेक मित्रांनी वैयक्तिकरीत्या आणि लहान मोठ्या संस्था सुरू करून मुशायरे वगैरे आयोजित केले. खूप सकारात्मक गोष्ट आहे ही. समाजातील सर्व व्यक्ती, संस्था आपापल्या परीने गझलच्या प्रचार-प्रसाराचेच कार्य करत आहेत. अपेक्षा एवढीच आहे की, हे कार्य ईर्षावृत्तीने, अभिनिवेशाने न करता गझलवरील श्रद्धेने, कर्तव्यभावनेने व नेक इराद्याने करावे.

गझलच्या महासागरातील आपण एक कतरा आहोत हे कधीही विसरू नये. इथे 'ग' गझलचा असतो. तो गणपतीचा अथवा गलबताचाही असू शकेल; पण 'ग' गर्वाचा असू शकत नाही.

**सरहद, पुणे** आयोजित
**अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे**

**१८ वे**

**अखिल भारतीय**
**मराठी साहित्य संमेलन, दिल्ली**
**२०२५**

या माझ्या गझलेच्या आयुष्यात मी अनेक चढ उतार पाहिले, घटना - दुर्घटना साक्षीभावाने अनुभवल्या, गझल चळवळीसाठी मनोभावे काम केले, हजारो मैफिली केल्या, अनगिनत चाहते आणि जिवाला जीव देणारे मित्र कमावले, असंख्य मान-सन्मान व पुरस्कार मिळवले, सन्मानचिन्हांनी घर अक्षरशः भरून गेले. मैफिलींसाठी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला, जवळजवळ संपूर्ण देशभर फिरलो. मराठी गझलचा झेंडा खांद्यावर घेऊन जगातल्या अनेक देशांमध्ये गेलो.

महाराष्ट्र शासनाने राज्य पुरस्कार देऊन गौरवताना मराठी गझलचा अंतर्भाव उपशास्त्रीय संगीतात केला व नावापुढे पंडित ही उपाधी लावली...

माझी गझल गायकी व गझलकार्य यावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून नांदेडच्या राहूल भोरे याने पीएच.डी. मिळवली. सुरेश भटांचे महाराष्ट्रातील पहिले स्मारक माझ्या गावी-आष्टगावला 'गझलकार सुरेश भट ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालय' या नावाने उभारण्यात मला यश आले, याचा मला जास्त आनंद आहे. साक्षात सुरेश भटांनी 'गझल नवाज' हा खिताब दिला. जिन्दगी निहाल झाली. आनंद देणाऱ्या आणि जगणं समृद्ध करणाऱ्या या घटना घडल्या त्या केवळ गझल सोबत होती म्हणून... और जीने को क्या चाहिए ?

*प्रेमात मी गझलच्या, प्रेमात गझल माझ्या*
*ही एकमेव ओळख माझी जगात आता...*
*ऐ गझल ! तेरा शुक्रिया...*

(लेखक प्रसिद्ध मराठी गझलकार आहेत.)



Scanned with OKEN Scanner

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या पहिल्या सार्वजनिक व्याख्यानाची नोंद आढळते ती सन १९२३-१९२४ ची. शेवटचे व्याख्यान मिळते १९९४चे. त्यांच्या व्याख्यानांचा कालखंड सुमारे सात दशकांचा. या काळात त्यांची अनेक व्याख्याने झाली असतील, परंतु संहितेच्या रूपात उपलब्ध होणारी भाषणे दोनशेहून अधिक आहेत. काही संक्षिप्त, कात्रणरूप आहेत; पण ज्यांना पूर्ण संहितारूप (लिखित/प्रकाशित) भाषणे म्हणता येतील अशी व्यक्ती व विचारकेंद्रित सुमारे ८१ भाषणे हाती आली.**

# व्याख्यानव्रती : लक्ष्मणशास्त्री जोशी

डॉ. सुनीलकुमार लवटे

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पाच्या या संकलन, संपादन, प्रकाशन प्रकल्पात त्यांचाच विचार करण्यात आला आहे. यापैकी त्यांचे जे सहा-सात भाषणसंग्रह प्रसिद्ध आहेत, त्यात ३६ वर भाषणे आहेत. असंकलित संहिता भाषणे ४३ च्या घरात आहेत.

## विषयवैविध्य

या भाषणात विषयवैविध्य आहे. तर्कतीर्थांचा व्याख्यानपट हा अनेकविध शास्त्रांमध्ये त्यांची असलेली गती सिद्ध करणारा ठरतो. मानसशास्त्र, तर्कशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, गणितशास्त्र, विज्ञान (भौतिक, जीव) इ. शास्त्रांवर आधारित त्यांची भाषणे त्या शास्त्रांसंबंधी तर्कतीर्थांचा व्यासंग, अभ्यास, संशोधन, वाचन सिद्ध करणारी आहेत, शिवाय त्या शास्त्रांचा अन्य ज्ञान-विज्ञानाशी अन्वय जोडून ते करत असलेले विवेचन वाचताना लक्षात येणारी गोष्ट अशी की, ते पुस्तक पंडिती मांडणी न करता नेहमी स्वतःच्या चिंतन, मननातून आलेले विचार व्यक्त करीत असल्याने त्यांची भाषणे नेहमीच विचारणीय वाटत आली आहेत,

तीच गोष्ट तत्त्वज्ञानाची. तर्कतीर्थ हे मूलतः धर्मशास्त्राचे अभ्यासक असल्याने वेद, उपनिषद, षड्दर्शने, न्यायमीमांसा इ.मध्ये त्यांना रस नि रुची होती. वाद-विवाद हा त्यांच्या आवड नि स्फूर्तीचा विषय, वादविवादात प्रारंभीच्या काळात हिरिरीने ते भाग घेत. द्वैतवाद, अद्वैतवाद,



लक्ष्मणशास्त्री जोशी

विशिष्टाद्वैतवाद, मायावाद, केवलाद्वैतवाद, बुद्धमत, जैनमत इ. सारख्या तत्त्वज्ञानावर जसे त्यांनी विपुल लेखन केले आहे, तसेच आपल्या अनेक भाषणांतून त्यांनी उपरोक्त वाद नि मतांची मांडणी करून त्यावर साक्षेपी विवेचन केल्याचे दिसून येते. भाषणांमध्ये मार्क्सवाद, गांधीवाद, रायवाद, नवमतवाद इ. वरील त्यांचे विवेचन त्यांना सनातन विचार प्रवाहांइतकेच आधुनिक विचारधारांचे आकर्षण आणि रस असल्याचे सूचित करतात.

साहित्य, काव्य, रससिद्धांत, समीक्षा, कवी, अभिजात साहित्याचे भाषांतर या विषयांवरील त्यांची व्याख्याने त्यांना बहुश्रुत ठरवणारी आहेत. संस्कृत, मराठी, इंग्रजी, हिंदी भाषांमध्ये त्यांनी केलेली भाषणे त्या भाषांवरील तर्कतीर्थांचे प्रभुत्व सिद्ध करणारी आहेत. महाराष्ट्राबाहेर बनारस, कलकत्ता, अहमदाबाद, हैदराबाद, नवी दिल्ली येथे जशी



Scanned with OKEN Scanner


त्यांनी भाषणे दिली, तशी अमेरिका, रशियामध्येही. महात्मा गांधी, कार्लमार्क्स, बा. भ. बोरकर, प्रा. बा. सी. मर्ढेकर त्यांनी वाचला होता. तसाच टागोर, बर्टार्ड रसेल, रेनॉ, कॉम्त, फ्रान्सिस बेकन, रेन देकार्त, मॉरिस कोहेन, जॉन ड्युई इ. विचारकांचे त्यांचे वाचन व्याख्यानांना रंगत आणत. श्रोत्यांना निरंतर नवं ऐकवण्याचा ध्यास त्यांना चिरंजीव अभ्यासक, चिंतक, संशोधक बनण्यास उद्युक्त करत राहायचा. ते केवळ संदर्भ देऊन थांबत नसत, तर उदाहरणे आणि उद्धरणांनी त्यांची भाषणे समृद्ध आहेत. त्यातही तुलनात्माक विवेचन करत ते आपल्या भाषणांत आपले निष्कर्ष मांडत. म्हणून त्यांची भाषणे श्रोत्यांना मार्गदर्शक आणि दिशादर्शक ठरायची.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी महात्मा फुले, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक यांच्या 'गीतारहस्य'मधील कर्मयोग, शंकराचार्य, रामानुजाचार्य, कवी बा. भ. बोरकर, बालकवी, संत रामदास प्रभूतिंवर भाषणे दिली. या भाषणांतून त्या व्यक्तीच्या जीवन, कार्य, विचारांची महती स्पष्ट करत नवी मांडणी केली. व्यक्ती आणि विचार यांचा अन्वय लावत तर्कतीर्थ त्या व्यक्तिमत्त्वातील कितीतरी नवे पैलू श्रोत्यांच्या निर्दर्शनास आणत. अगदी अभ्यासू, जिज्ञासू, व्यासंगी श्रोतेही त्यांच्या नव्या मांडणीने विस्मित होत आपल्या प्रतिक्रिया लेखरूपाने व्यक्त करताना दिसतात. के. ल. दप्तरी, दि. के. बेडेकर, श्याम भट, रा. ना. चव्हाण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, एम. एन. रॉय, प्रा. व. वि. आकोलकर, यशवंतराव चव्हाण, द्वा. भ. कर्णिक प्रभूति मान्यवर यासंदर्भात नोंदविता येतात.

## भाषणांचे स्वरूप

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दिलेली बहुसंख्य भाषणे ही पूर्वनियोजित, विधिवत, निमंत्रण देऊन, पूर्वतयारीला वेळ देऊन योजलेली असत. अधिकतर व्याख्याने विद्यापीठांच्या वार्षिक व्याख्यानमाला, वसंत व्याख्यानमाला, स्मृतिव्याख्याने, आकाशवाणी, साहित्य संमेलने, परिषदा, चर्चासत्रे, महोत्सव यामध्ये दिलेली दिसून येतात. त्यातूनही त्यांचा श्रोतृसमूह बुद्धिजीवी वर्गातील अधिक असत; पण त्यांची जी राजकीय व्याख्याने चळवळी, निवडणुका, प्रसार-प्रचार इ. उद्देशानी झाली, त्यांचा श्रोतृवृंद सर्वसामान्य नागरिक असत. याचाच अर्थ ते आमजनतेचे जसे प्रिय वक्ते होते, तसेच अभिजनवर्गाचेही, त्यामुळे साध्या साध्या प्रकाशन, उद्घाटक, स्वागताध्यक्ष, प्रमुख पाहुणे म्हणून झालेली भाषणे तर असंख्य आहेत.

साहित्यिक तर्कतीर्थ म्हणून त्यांच्या ग्रंथसंपदेची जी सूची पुढे येते, त्यातील अधिकांश ग्रंथ म्हणजे त्यांचे भाषणसंग्रहच आहेत. त्यांना मिळालेला मराठीसाठीचा पहिला साहित्य अकादमी पुरस्कारही. 'वैदिक संस्कृतीचा विकास', 'हिंदुधर्माची समीक्षा', 'ज्योति-निबंध', 'आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत',




'सर्वधर्मसमीक्षा', 'शिखांचा पंथ व इतिहास', 'आद्य शंकराचार्य जीवन आणि विचार' व 'साहित्याचे तर्कशास्त्र' या ग्रंथांना तर्कतीर्थांनी प्रस्तावना लिहून भाषणांविषयीची आपली धारणा आणि भूमिका स्पष्ट केली आहे. काही संग्रहातील भाषणे नंतर मजकुरांची भर घालत अद्ययावत केलेलीही दिसतात. यातून तर्कतीर्थांची निरंतर ज्ञानलालसा स्पष्ट होते.

## तर्कशुद्ध मांडणी

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची भाषणे विवेचक, तर्कसंगत असत. मांडणीची योजना स्वाध्यायाधारित असायची. भाषणात आत्मविश्वास असायचा; पण अभिनिवेश नसायचा. भाषणात नवे देण्याची धडपड असायची. तर्कशुद्ध मांडणी आणि बिनतोड निष्कर्ष हे त्यांच्या भाषणाचे वैशिष्ट्य असे. प्रबोधन हा त्यांच्या भाषणांचा उद्देश असायचा. व्याख्या, उद्धरणे, सुभाषिते, श्लोक, ऋचा इ. मुखोद्गत असल्याने त्यांच्या भाषणांना एखाद्या धर्मोपदेशक, चिंतक, तत्त्वज्ञाचे रूप घेऊन जायचे. सुश्राव्य गायनाप्रमाणे श्रोत्यांना मंत्रमुग्ध आणि मोहीत करण्याची तर्कतीर्थांची वक्तृत्वकला अनुभवसंपन्न आणि कसलेल्या कलाकाराची करामत वाटायची. विस्मित करणारी प्रज्ञा नि गूंग करणारी प्रतिभा यांच्या संगमाने त्यांची भाषणे नेहमी श्रोत्यांवर गारूड करत राहत. त्यांच्या भाषणात विज्ञान आणि अध्यात्म यांचा सुंदर मिलाफ असायचा. शास्त्री आणि तर्कपंडित अशा रसायनाचे त्यांचे वक्ता म्हणून असलेले व्यक्तिमत्त्व नेहमी शास्त्रास शस्त्र बनवण्यास तत्पर नि सज्ज असायचे. त्यांची अधिकांश भाषणे पूर्वलिखित असत. त्यामुळे अनेक भाषण पुस्तक रूपात आढळतात तशी ती लेखरूप प्रकाशित झालेली दिसतात. वृत्तपत्रे आणि नियतकालिकांमधून त्यांच्या भाषणांना निरंतर प्रसिद्धी मिळालेली आहे. अनेक दिवाळी अंकांमधील परिसंवादात तर्कतीर्थांची हुकमी उपस्थिती विचारवंतांच्या श्रेणीत विराजमान करणारी होती.

विसाव्या शतकातील गांधी युगाबरोबर किंवा पहिल्या महायुद्धानंतरचा सुमारे सात दशकांचा काळ हा तर्कतीर्थांच्या वक्तृत्वाचा काळ होय. त्यातील स्वातंत्र्यपूर्व काळ



Scanned with OKEN Scanner




त्यांच्या या केलेल्या विकासाचा काळ मानला, तर स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतरचा काळ त्यांच्या भाषणांचे सुवर्णयुग म्हणता येईल. सन १९५४ चे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्लीचे अध्यक्षपण नि पाठोपाठ सन १९५५ ला त्यांच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' भाषण संग्रहास लाभलेले मराठीचे पहिले साहित्य अकादमी पारितोषिक, यामुळे तर्कतीर्थ मराठीच्या नामवंत नि मान्यवर साहित्यिकांच्या पंक्तीत विराजमान झाले. त्यानंतर ते महाराष्ट्राचेच नव्हे, तर देशातील विचारवंत वक्ते म्हणून गणले गेले. तो काळ (जीवनाचा उतरार्ध) व्याख्याने म्हणून समाजावर प्रभाव टाकण्याचा कालखंड होय.

## सृजनसंवादी भाषणे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भाषणांकडे सृजन साधना म्हणून पाहिले. त्यांची अधिकतर भाषणे पूर्वतयारीने होत. भाषण करण्यापूर्वी ते टिपणे काढत. वाचन करीत. संदर्भाची जुळवाजुळव करीत. विनातयारीची भाषणे उथळ होतात असे त्यांचे म्हणणे होते. भाषणांनंतर त्यांनी आपली अनेक भाषणे लिहून काढली. बोललेले लिहिण्याचा आणि लिहिलेले प्रकाशित करण्याचा प्रघात त्यांनी बऱ्याचदा पाळल्यामुळे आपणापुढे त्यांच्या शंभरएक भाषणांच्या पूर्ण संहिता उपलब्ध असून, इतकी काटेकोर शिस्त पाळणारे ते महाराष्ट्रातले पहिले वक्ते असावेत. त्यांच्या भाषणांचा साहित्य, भाषा, भाषणकला, शैली, मांडणी इ. अंगांनी संशोधनपर शिस्त नि पद्धतीने शास्त्रीय अभ्यास होण्याची गरज आहे.

तर्कतीर्थांच्या व्याख्यानांचा उगम आणि विकास हा वादविवादाच्या प्रसंगाने होत राहिला. त्यांचा पाया वादविवाद राहिल्याने त्यावर उभे त्यांचे वक्तृत्व है विचारप्रवण होत राहिले. वक्ते म्हणून तर्कतीर्थ प्रवचक न होता प्रबोधक बनले, याचे कारण त्यांनी भाषणांकडे ज्ञानोपासना, ज्ञानसाधना म्हणून पाहिले. ते मूलतः शास्त्री, पंडित असल्याने त्यांना शास्त्रीय, तात्त्विक विषयांवर भाषणे देणे आवडत असे. त्यांची ही मौखिक मुशाफिरी एक गंभीर असा सृजन संवाद असायचा, त्यांचे विचार, वाचन, चिंतन, मनन, चर्चा, वादविवादातून प्रगल्भ होत गेले, तसे वक्तृत्वही, देशभक्ती आणि धर्मश्रद्धा या त्यांच्या भाषणाच्या मुख्य प्रेरणा होत्या. त्यामुळे त्यांची अधिकांश भाषणे या विषयवर्तुळात घुटमळताना आढळतात. ते फड गाजवणारे शब्दप्रभू वक्ते नसले तरी त्यांची सर्वच भाषणे सभा जिंकणारी ठरायची. त्यांच्या भाषणांची मदार शब्दसौंदर्य, लालित्य यापेक्षा वैचारिक प्रगल्भतेवर असायची. प्रतिपाद्य विषय मनोज पद्धतीने सादर करण्याबर त्यांचा भर आणि लक्ष असायचे, भाषणांतून श्रोत्यांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या तळमळीमुळे त्याच्या भाषणांकडे समाजमाध्यमे, शासन, बुद्धिजीवी शिकवण आणि शिकवणी (Lesson and Learning) म्हणून पाहत.




## भाषण शैली

तर्कतीर्थांची भाषणे पुस्तकी नसत, वक्ता नि श्रोता यांमधील ते हृदगत असे. 'हे हृदयिचे ते हृदयी' असा भाव त्यात भरून असायचा, भावनिक आवाहनापेक्षा वैचारिक आव्हान करणारी त्यांची भाषणे मोहक असायची. ती एक बौद्धिक मेजवानी ठरायची. तर्कतीर्थ आपल्या भाषणांतून श्रोत्यांना नवी जीवनदृष्टी प्रदान करत असत. शैली म्हणून ती विचारविश्लेषक होत. तुलना, इतिहास, तर्क, तत्त्वज्ञान इ. मुळे त्या भाषणांना तत्त्वमीमांसा, चिकित्सा, समीक्षा असे रूप आल्याने त्यांची शैली प्रबोधनपर होऊन जायची. आपल्या भाषणांतून ते संज्ञा, संकल्पना, व्याख्या, उद्धरणे यांच्या ज्या फेकी करीत, फैरी झाडत त्यामुळे त्यांच्या व्याख्यानांना एकप्रकारची वैचारिक धार येत असे. आपल्या भाषणातून पूर्व आणि पश्चिम अशी तुलना करीत विकासाची नवी क्षितिजे, श्रोत्यांना दाखवत असत. नवं मिळण्या- मिळवण्याची आकांक्षेने, उत्सुकतेने श्रोते तर्कतीर्थांच्या व्याख्यानांना गर्दी करीत, भाषणातील त्यांचे दृष्टांत, उदाहरणे, चपखल असत. बिनतोड तर्क त्यांच्या भाषणशैलीचा अंगभूत भाग असायचा. ते वक्ते असण्यापेक्षा व्याख्याते म्हणून पुढे येत. व्याख्यात्यास साजेसा त्यांच्या व्याख्यानांचा बाज असायचा.

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय खंड-२, भाषणसंग्रह (व्यक्ती व विचार) प्रस्तावना अंश)**

**(लेखक हे ज्येष्ठ साहित्यिक आहेत.)**



Scanned with OKEN Scanner

**संमेलने आवश्यक असतात वाङ्मयीन पर्यावरणासाठी. साहित्याचे वाचक कुठल्याही गावात, शहरात मर्यादितच असतात. वाचनालयाचे सदस्य आणि साहित्याचे वाचक हे पुन्हा वेगवेगळे वर्ग आहेत. जे वाचनालयाचे सदस्य असतात आणि नियमित वाचत असतात त्यांना एकूण साहित्य व्यवहाराविषयी आस्था असतेच असे नाही. त्याशिवाय ज्यांचा साहित्याशी काही संबंध येत नाही, अशी वेगवेगळ्या क्षेत्रातली मंडळी मोठ्या संख्येने असतात. संमेलनांच्या निमित्ताने साहित्याचा परीघ विस्तारित करता येत असतो. साहित्याच्या परिघात नसलेल्या माणसांना त्यात समाविष्ट करून घेणे शक्य होते. एकूण साहित्यव्यवहारासाठी ते फायद्याचेच असते.**

# साहित्य संमेलनाच्या देशा!

**डॉ. विजय चोरमारे**

साहित्य संमेलनांतून साहित्याचे काहीही भले होत नाही, असे मानणारी अनेक साहित्यिक मंडळी आहेत. त्यांचे म्हणणे एकवेळ गृहीत धरले, तरीसुद्धा साहित्य संमेलनांची उपयुक्तता कमी होत नाही. मोठ्या संमेलनांना नावे ठेवणारी मंडळी मग उगाच काहीतरी बोलायचे म्हणून छोटी छोटी संमेलने व्हायला पाहिजेत, तिथे साहित्याची गंभीरपणे चर्चा होत असते अशी भोंगळ विधाने करत असतात. मोठ्या संमेलनात गंभीर चर्चा होत नाहीत, हे जसे अर्धसत्य आहे तसेच छोट्या संमेलनांतून गंभीर चर्चा होतात हेसुद्धा अर्धसत्य आहेत.

संमेलनांचे ठिकाण, त्याच्या आयोजनात आणि कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यात सहभागी असलेल्या लोकांच्यावर संमेलनाचा आशय अवलंबून असतो. संमेलनाच्या आयोजनात गंभीर प्रकृतीची माणसे असली तरी अगदी ग्रामीण भागातल्या संमेलनात तेथील रसिकांचा विचार करावा लागतो. त्यांच्या अभिरुचीला पचतील अशाच वक्त्यांची आणि विषयांची निवड करावी लागते. सुरुवातीच्या काळात लोकांच्या रंजनावर भर द्यावा लागतो. कथाकथनासारख्या कार्यक्रमांतून लोकांच्यात ऐकण्याची गोडी निर्माण करावी लागते. वक्ते ठरवतानाही श्रोत्यांच्या प्रकृतीचा विचार करावा लागतो आणि त्यानुसार काही तडजोडी कराव्या लागतात. अशावेळी साहित्य संमेलनांचा दर्जा घसरला अशी ओरड करण्यात अर्थ नसतो. अशावेळी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवीय की, साहित्य संमेलन आयोजित करणाऱ्यांमधले २५ टक्के लोक भाबडेपणाने काहीही करत असले तरी ७५ टक्के लोक गंभीरपणेच साहित्य व्यवहाराकडे पाहणारे असतात. संमेलनाचा सगळा व्याप ते अंगावर घेत असतात. त्यामागेही त्यांची साहित्यासंदर्भातील आस्था आणि जिव्हाळा हाच भाग असतो. असे असले तरी साहित्य संमेलन घेण्याची गरज आहे का, असा प्रश्न विचारणारे पुढे येणार नाहीतच असे नाही, तर संमेलने आवश्यक असतात वाङ्‌मयीन पर्यावरणासाठी. साहित्याचे वाचक कुठल्याही गावात, शहरात मर्यादितच असतात. वाचनालयाचे सदस्य आणि साहित्याचे वाचक हे पुन्हा वेगवेगळे वर्ग आहेत. जे वाचनालयाचे सदस्य असतात आणि नियमित वाचत असतात त्यांना एकूण साहित्य व्यवहाराविषयी आस्था असतेच असे नाही. त्याशिवाय ज्यांचा साहित्याशी काही संबंध येत नाही अशी वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी मोठ्या संख्येने असतात. संमेलनांच्या निमित्ताने साहित्याचा



परीघ विस्तारित करता येत असतो. साहित्याच्या परिघात नसलेल्या माणसांना त्यात समाविष्ट करून घेणे शक्य होते. एकूण साहित्यव्यवहारासाठी ते फायद्याचेच असते.

## अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

संमेलन संस्कृतीमधील सर्वात महत्त्वाच्या आणि महाराष्ट्राचा प्रमुख सांस्कृतिक उत्सव मानला जातो तो म्हणजे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन. १८८५ साली मराठी ग्रंथकार सभेचे अधिवेशन म्हणून त्याची सुरुवात झाली आणि १४० वर्षे ही परंपरा नुसती टिकून नाही, तर वर्षानुवर्षे अधिक व्यापक बनताना दिसते. दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करणे ही सोपी गोष्ट नसते. दोन-तीनशेची क्षमता असलेल्या छोट्याशा सभागृहात कार्यक्रम आयोजित करायचा म्हटले तरी त्यासाठी किती यातायात करावी लागते, हे संबंधित आयोजकांनाच ठाऊक असते. एखाद्या कुटुंबाकडे त्यांच्या संपूर्ण आयुष्यात एखादाच लग्नसमारंभ असतो. पाचशेपासून पाच हजारापर्यंत पत्रिका असलेला हा समारंभ निभावता निभावता संबंधितांची पार त्रेधा उडत असते. अशा काही गोष्टींचा विचार केला, तर दोन-तीनशे निमंत्रित पाहुणे, शे-दीडशे प्रकाशक आणि लाखभर लोक जिथे जमत असतात अशा साहित्य संमेलनाचे दरवर्षी आयोजन करणे, यासाठी किती पातळीवर यंत्रणा उभी करावी लागत असेल याची कल्पना केलेली बरी. गेली पंचवीसेक वर्षे संमेलनाचा पसारा खूपच वाढला आहे. संमेलनाची जबाबदारी घेणारी स्थानिक संस्था असते आणि तिथले लोक सगळी तयारी पाहत असतात हे खरे असले तरीही महामंडळाला सगळ्यावर देखरेख ठेवावी लागत असते. स्थळ निश्चित करण्यापासून संमेलन पार पडेपर्यंतच्या सगळ्याची रूपरेषा ठरवून ते पार पडेपर्यंतची जबाबदारी असते. स्थानिक संयोजक, निमंत्रित साहित्यिकांपासून ते राजकीय नेत्यांपर्यंतचे सगळे मान-पान सांभाळावे लागतात. या सगळ्याची नोंद प्रसारमाध्यमे कधीच घेताना दिसत नाहीत. किमान सहा महिने तयारी सुरू असलेले तीन दिवसांचे भव्य संमेलन पार पाडूनही चार कौतुकाचे शब्द लिहिले-बोलले जात नाहीत. उलट आयोजनातील त्रुटीच जगासमोर मांडल्या जातात.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी विदर्भ साहित्य संघाच्या डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांची निवड झाल्यानंतर त्यांनी संमेलनाची कोटींची उड्डाणे जमिनीवर आणण्याचा प्रयत्न केला. मराठवाडा साहित्य परिषदेकडे महामंडळाचे अध्यक्षपद गेल्यानंतर प्राचार्य कौतिकराव ठाले-पाटील यांनी उस्मानाबाद संमेलनाच्या निमित्ताने राजकीय प्रभावापासून दूर राहून संमेलन यशस्वी करता येते हे दाखवून दिले. शेवटी हे सगळे प्रयोग आहेत. ज्या गोष्टी शक्यच नाहीत, असे म्हटले जायचे त्या शक्य करून दाखवण्याचे प्रयोग. याचा अर्थ पुढची सगळी संमेलने अशीच व्हावीत असा नव्हे.

स्थानिक परिस्थितीवर अनेक गोष्टी अवलंबून असतात. गेल्या १४० वर्षांत ९७ संमेलने पार पडली आहेत. या वर्षांचा उल्लेख एवढ्यासाठीच की, संमेलन सुरू होऊन बराचसा कालावधी लोटला आहे. ग्रंथकार सभेचे पहिले अधिवेशन म्हणजेच पहिले साहित्य संमेलन. या ग्रंथकार सभेच्या अधिवेशनाचे निमंत्रण महात्मा जोतीराव फुले यांना देण्यात आले होते. त्यावेळी जोतीरावांनी ग्रंथकार सभेला एक पत्र लिहिले. साहित्य संमेलनाच्या इतिहासात डोकावताना हे पत्र खूप महत्त्वाचे ठरते. आजही साहित्यसंमेलनाच्या आशयाची चिकित्सा करताना या पत्राचाच आधार घ्यावा लागतो, इतके ते महत्त्वाचे आहे.

## इतर साहित्य संमेलने

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाशिवाय महाराष्ट्र साहित्य परिषद, मराठवाडा साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ, विदर्भ साहित्य संघ, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा आणि कोकण मराठी साहित्य परिषद या साहित्य संस्थांची स्वतंत्र साहित्य संमेलने होत असतात. अखिल भारतीय संमेलनाचा पसारा टाळून आणि भपका कमी करून ही संमेलने आशयदृष्ट्या अधिक समृद्ध कशी होतील, याचे प्रयत्न केले जातात. नामवंतांसोबत स्थानिक लेखक, कवींना अधिक संख्येने सामावून घेतले जाते. पश्चिम महाराष्ट्रात सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये अनेक छोटी साहित्य संमेलने मोठ्या प्रमाणात होत असतात. स्थानिक पातळीवरील लिहिणारी मंडळी पुढाकार घेऊन, प्रसंगी पदरमोड करून संमेलने घेत असतात. सांगली जिल्ह्यातील औदुंबर या गावी कृष्णा नदीच्या तीरावर मकर संक्रांतीच्या दिवशी साहित्य संमेलनाची १९३९ सालापासूनची परंपरा आहे. कवी सुधांशु आणि ग्रामीण साहित्यिक म. भा. भोसले यांच्या पुढाकाराने सुरू झालेले हे संमेलन आठ दशकानंतरही सुरू आहे. नंतरच्या काळात कोल्हापूर सांगली जिल्ह्यांत अनेक छोटी-मोठी संमेलने सुरू झाली. जत तालुका हा दुष्काळी भाग. या भागातील शेगाव येथे गेल्या १५ वर्षांपासून ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मराठी साहित्याचा जागर सुरू आहे. शेगाव संमेलनासाठी लवकुमार मुळे, श्रीकांत कोकरे आणि मच्छिंद्र ऐनापुरे प्रयत्नशील असतात. विट्याजवळील रामापूर येथे दहा-बारा वर्षांपासून डॉ. स्वाती शिंदे-पवार या ‘अक्षरयात्री’ साहित्य संमेलन भरवतात. या संमेलनाचे अध्यक्षपद महिला साहित्यिक भूषवतात. इस्लामपूर येथे कोजागिरी साहित्य संमेलन, जागर संस्थेचे लोकसाहित्य संमेलन, महाराष्ट्र साहित्य परिषद शाखेचे संमेलन, पलूसमध्ये वासंती मेरू यांच्या पुढाकाराने मराठी ग्रामीण साहित्य संमेलन, तर किरण शिंदे यांच्या प्रयत्नाने होणारे ‘परिवर्तन’ साहित्य संमेलन अशी अनेक संमेलने आहेत. मिरजेत प्रा. भीमराव धुळूबुळू व दिवंगत नामदेव भोसले यांच्या पुढाकाराने ‘शब्दांगण’ साहित्य संमेलन होते. शिराळा तालुक्यात चरण-पणुंब्रे परिसरात वसंत पाटील यांच्या पुढाकाराने भरणारे वारणा साहित्य संमेलन, विटा येथे रघुराज मेटकरी यांच्या पुढाकाराने होणारे संमेलन, बलवडी येथे शांतीनाथ मांगले, देशिंग येथे दयासागर बन्ने, आरगमध्ये चंद्रकांत बाबर, रेणावी येथे धर्मेंद्र पवार, तासगाव येथे तानाजी जाधव, कवठेमहाकांळ-हिंगणगाव येथे अनिल पाटील यांच्या पुढाकारातून संमेलने होत



Scanned with OKEN Scanner

असतात. एकट्या सांगली जिल्ह्यातील ही विविध संमेलने पाहिली तर खेडोपाडी साहित्याची चळवळ किती रुजली आहे हे लक्षात येऊ शकेल.

## विद्रोहाचे झेंडे

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजकांची संकुचित भूमिका, संमेलनाध्यक्ष निवडीची पद्धत आणि त्यातील आशयाला आव्हान देत १९९९ साली विद्रोही सांस्कृति चळवळीने बंडाचा झेंडा उभारला. मुंबईत भरलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाला पर्यायी असे विद्रोही साहित्य संमेलन घेतले. म्हणजे अखिल भारतीय संमेलनाला पर्याय देतानाही तो संमेलनाचाच देण्यात आला. यावरून संमेलन संस्कृतीचे मराठी मातीतील महत्त्व लक्षात येऊ शकेल. बहुजन, मुस्लीम, ख्रिस्ती, भटके-विमुक्त अशा विविध घटकांतील लेखक लिहू लागले होते, अशा सगळ्या प्रवाहांना सामावून घेण्याचे औदार्य अखिल भारतीय संमेलनाला दाखवता आले नव्हते, त्या घटकांना विद्रोही सांस्कृतिक चळवळीने सामावून घेतले. विद्रोही सांस्कृतिक चळवळ पुढे दुभंगली आणि त्यांचीही एकाची दोन, दोनाची तीन संमेलने होऊ लागली. मुस्लीम मराठी साहित्य संमेलन, ख्रिस्ती मराठी साहित्य संमेलन अशी स्वतंत्र साहित्य संमेलने होऊ लागली. विद्रोही संमेलनाने अखिल भारतीय संमेलनाला समांतर चळवळ सुरू केली. आणीबाणीच्या काळात पर्यायी संमेलन झाले होते. त्याच कराडमध्ये २००३ मध्ये झालेल्या अखिल भारतीय संमेलनाला पर्यायी 'आपले साहित्य संमेलन' प्रा. राजेंद्र कुंभार यांच्या पुढाकाराने पार पडले.

अखिल भारतीय संमेलनाच्या विरोधात छोटे मोठे बंडाचे झेंडे सातत्याने फडकत राहिले. या व्यतिरिक्त महाराष्ट्रात होणाऱ्या प्रमुख साहित्य संमेलनांमध्ये अस्मितादर्श साहित्य संमेलन, दलित आदिवासी ग्रामीण स्त्रीवादी साहित्य संमेलन, गुराखी साहित्य संमेलन, महिला साहित्य संमेलन, दलित साहित्य संमेलन, आंबेडकरी साहित्य संमेलन, अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन, झाडीबोली साहित्य संमेलन, संत साहित्य संमेलन, जल साहित्य संमेलन, स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलन, शिक्षक साहित्य संमेलन अशा विविध संमेलनांचा उल्लेख करावा लागेल. स्त्रियांची स्वतंत्र साहित्य संमेलने ठिकठिकाणी होत असतात.

## सीमाभागातील संमेलने

महाराष्ट्र कर्नाटक सीमाप्रश्न सहा दशकांहून अधिक काळ चर्चेत आहे. सीमाभागातील मराठी भाषिक कर्नाटकात खितपत पडले आहेत. अनेक लढे,

### बालकुमार साहित्य संमेलने

राज्यात ठिकठिकाणी बालकुमार साहित्य संमेलनांचे आयोजनही मोठ्या प्रमाणावर होऊ लागले आहे. मुलांमध्ये साहित्याची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने ही संमेलने घेतली जातात. अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे १९७५ पासून संमेलनांचे आयोजन केले जाते. आजवर संस्थेची ३० साहित्य संमेलने पार पडली आहेत. याशिवाय कोल्हापूरची बालकुमार साहित्य सभा, विदर्भ साहित्य संघाचे बालकुमार साहित्य संमेलन, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचे विद्यार्थी साहित्य संमेलन यासह विविध साहित्य संस्था, वाचनालयांच्या वतीने मुलांसाठी साहित्य संमेलनांचे आयोजन केले जाते.

आंदोलनांच्या माध्यमातून त्यांनी आपली महाराष्ट्रात येण्याची इच्छा जाहीर केली. त्यासाठी छळ सहन केला, दडपशाहीचा सामना केला, परंतु महाराष्ट्रात सहभागाची आस आणि मराठीवरचे प्रेम तसूभरही कमी झाले नाही. सीमाभागातल्या जवळपास दहा गावांमध्ये मराठी साहित्य संमेलनांचे आयोजन करून मराठी भाषेवरचे प्रेम व्यक्त केले जाते. म्हणजे सीमाभागातील मराठी भाषिकांनी वेदनेतूनही साहित्य संमेलनाचाच आविष्कार घडवला. वेदना, मातृभाषेवरील प्रेम व्यक्त करण्यासाठी त्यांना संमेलनाचेच माध्यम जवळचे वाटले. बेळगावजवळच्या कडोली येथे सुरुवातीला

**सरहद, पुणे** आयोजित
**अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे**

**९८ वे**

**अखिल भारतीय**
**मराठी साहित्य संमेलन, दिल्ली**
**२०२५**

माधवी देसाई यांच्या प्रेरणेतून संमेलन सुरू झाले. साहित्य रसिकांनी घरातून भाकरी बांधून संमेलनाला यायचे. दुपारी एकत्र स्नेहभोजन करायचे. व्याख्यान, कविसंमेलन, कथाकथन आदींचा आस्वाद घ्यायचा असे स्वरूप होते. हळुहळू संमेलन वाढत गेले. कडोलीबरोबरच सीमाभागातही संमेलन संस्कृतीचा विस्तार झाला. उंचगाव, कारदगा, कुद्रेमणी, सांबरा, बाळेकुंद्री, माचीगड, येळ्ळूर आदी दहा-बारा गावांमध्ये दरवर्षी मराठी साहित्य संमेलने भरवली जातात. बेळगावमध्ये २००० साली डॉ. य. दि. फडके यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले. या संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. फडके यांनी सीमालढ्याच्या इतिहासाचा सविस्तर मागोवा घेतला आणि सीमाप्रश्न सोडवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाण्याची सूचना केली. खरेतर त्याआधीच्या दशकभराच्या काळात सीमाप्रश्न मृतवत झाला होता. पिढी बदलली होती आणि त्यांना त्या प्रश्नाची तेवढी आच उरली नव्हती. साहित्य संमेलनानंतर सीमाप्रश्नाच्या चळवळीला पुन्हा गती मिळाली. महाराष्ट्र सरकार आणि सीमावासीयांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली, त्यामुळे सीमालढ्याचे अस्तित्व टिकून राहिले आहे. सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेला आहे, याचे निःसंशय श्रेय साहित्य संमेलनाचे आहे. साहित्य संमेलनातून नेमके काय साध्य होते, याचे उत्तरही यातून मिळते.

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**



Scanned with OKEN Scanner

**प्रत्येकाच्या मनामनात मातृभाषा मराठीचा जागर व्हावा, साहित्य-संस्कृतीचे जतन आणि संवर्धन व्हावे, मराठी भाषेला प्रोत्साहन मिळावे, सांस्कृतिक विचारांचे आदान-प्रदान व्हावे, माय मराठीची पताका खांद्यावर अभिमानाने मिरवत भाषा वृद्धी व समृद्धीच्या दिंडीत वारकरी बनून ठेका धरणारी लेखक-वाचक मंडळी एकसंघ व्हावी, एकत्र यावी या उदात्त हेतूने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे.**

# संमेलन सर्वव्यापी व्हावे...

**संजय वाघ**

विद्येचे माहेरघर मानल्या गेलेल्या पुण्यातून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची सुरुवात झाली. मराठी साहित्याची गोडी वाढवणे, साहित्यकांना एकत्र आणणे आणि मराठी भाषेच्या विकासाला प्रोत्साहन देणे हे मुख्य उद्दिष्ट होते. यामुळे मराठी साहित्याच्या क्षेत्रात एक नवा उगम झाला. यामुळे संमेलनाचा वार्षिक गजर आजही थाटामाटात सुरू आहे.

## साहित्य संमेलनाची चळवळ

भाषेच्या या राष्ट्रीय उत्सवाच्या दिमतीला महाराष्ट्रभर ग्रामीण-शहरी भागात छोट्या-मोठ्या साहित्य संमेलनांचीही चळवळ उभी राहिली. वाचन संस्कृतीला खतपाणी घालणाऱ्या साहित्यविषयक संस्था, वाचनालये आकारास येऊ लागली. त्यांनीदेखील ही साहित्य दिंडी पुढे नेण्यासाठी साहित्य संमेलने, पुरस्कार समारंभ व साहित्याशी संबंधित विविध उपक्रम राबवण्याची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. कोणताही आर्थिक आधार नसताना साहित्यप्रेमी रसिकांनी पदरमोड करत त्या संस्था जगवल्या, वाढवल्या. दरम्यानच्या काळात गाव, तालुका व जिल्हा पातळीवर विविध साहित्य संस्था आकारास आल्या, कोणत्याही अनुदानावर विसंबून न राहता आपापल्या परीने त्यांनी साहित्योत्सव सुरू ठेवला. प्रत्येक लिहित्या हाताला व्यासपीठ मिळावे, या भावनेने संधीची कवाडे सर्वांसाठी खुली झाली. तरीदेखील जे काही वंचित राहिले, त्यांनी स्वतंत्र व्यासपीठ उभे केले. यामागे भाषेचा विकास, तिचे जतन, संवर्धन,संशोधन हाच हेतू होता. त्यामागे लेखक, कवी म्हणून आपली वर्णी लागावी, हाच एक उदात्त हेतू असायचा. राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक एकोपा वाढीस लागावा या विचारातून लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव सुरू केला. समाजातील पितृसत्ताक व्यवस्थेला झिडकारून महिलांनीही स्वतःची चूल स्थापन केली. यात गैर असे काहीच नाही.

## नवोदितांना व्यापक व्यासपीठ मिळावे

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर सर्वच भूभागातील, चार घटक संस्थांच्या कार्यक्षेत्रातील लेखक, कवींच्या प्रतिभेला वाव व व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, खेड्यापाड्यात राहून मराठी साहित्याची इमाने इतबारे सेवा करणारे अनेक साहित्यिक या उत्सवापासून वंचित राहू नये, नवोदित साहित्यकांना व्यासपीठ मिळावे, यासाठी शासनाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. यासाठी प्रज्ञावंतांचा शोध घेऊन त्यांना सन्मानाने या साहित्याच्या दिंडीत सहभागी करून घेण्याची गरज आहे. यामुळे या खुल्या कथा-परिसंवादांच्या व्यासपीठावर, समीक्षक, अभ्यासक, विचारवंत, संशोधक म्हणून नव्याने साहित्य उजेडात येईल.

अखिल भारतीय संमेलन हे मराठी सारस्वतांसाठी सर्वोच्च असे व्यासपीठ आहे. या संमेलनाच्या मंडपात विविध विषय हाताळण्याच्या भूमिकेतून व अनेकांना सहभागी करून घेण्याच्या हेतूने एकाचवेळी तीन-चार व्यासपीठांवर कथा, कविता, कवितावाचन, परिसंवाद, वा तत्सम अनेक कार्यक्रम सुरू असतात.

## बोलीभाषांसह उपभाषेचा सन्मान व्हावा

नाशिकमधील ९४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात आयोजकांनी बालकांसाठी व बालसाहित्यासाठी स्वतंत्र दालन उभारून एक अभिनव प्रयोग करून पाहिला व तो यशस्वीही झाला. तोच कित्ता अमळनेरच्या ९७व्या साहित्य संमेलनात गिरवण्याचा प्रयत्न झाला. वास्तविक जे प्रयोग व जे बदल रसिकश्रोत्यांना भावतात, त्याची दखल भविष्यातील आयोजक संस्थांनी घ्यायला हवी. या संमेलनात एक नवीन प्रयोग म्हणून मराठीशी संलग्न असणाऱ्या किंवा जवळीक असणाऱ्या उपभाषा व विविध बोलीभाषा यांचा सन्मान आयोजकांनी करायला हवा. प्रांतनिहाय प्रत्येक बोलीभाषेमधील कवी-लेखकांना आमंत्रित करून त्यांना या राष्ट्रीय उत्सवात सहभागी करून घेणे गरजेचे आहे.. या बोलीभाषांमध्ये खूप कसदार साहित्य व विषयांचे वैविध्य आहे. त्याचे प्रतिबिंब राष्ट्रीय व्यासपीठावर उमटले, तर संमेलन सर्वव्यापी होऊ शकेल, यात शंका नाही.

## देशाबाहेर मराठी भाषेचा गुंजा

मराठी भाषिक प्रज्ञावंत लेखक मंडळी महाराष्ट्राबाहेरही विविध राज्यांमध्ये विखुरलेली आहेत. त्याचे योगदान साहित्य, कला विज्ञान, आणि समाजशास्त्र क्षेत्रात महत्त्वाचे आहे. कर्नाटक, गोवा गुजरातमध्ये राहून मराठी भाषेला, वाचन संस्कृतीला समृद्ध करणारे अनेक लेखक आहेत. या लेखकांनी त्यांच्या लेखनात स्थानिक संस्कृती, भाषा, आणि समाजाच्या मुद्द्याचे



Scanned with OKEN Scanner

प्रतिनिधित्व केलेले आहे. अनेकांच्या कार्यामुळे मराठी साहित्याची व्याप्ती वाढली आहे आणि विविध राज्यांमध्ये मराठी भाषिकांच्या समुदायाला एकत्र आणण्यास मदत झालेली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये देशभरातील मराठी भाषिक लेखक, कवी, विचारवंत, अभ्यासकांना आपण निमंत्रित करून कार्यक्रमाचे स्वरूप, रूपरेषा यामुळे देशातील विविध राज्यांत नोकरी, उद्योग, व्यवसायासाठी स्थायिक झालेल्या मराठी लेखकांना राष्ट्रीय व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न जरूर व्हायला हवा. राज्याच्या, देशाच्या सीमा ओलांडून मराठी साहित्यांचे संवर्धन करणाऱ्यांची माहिती संकलित करून या संमेलनात त्यांना सहभागी करून घेतले तर मराठी भाषाची व्याप्ती नक्कीच मदत होणार आहे.

### अध्यक्ष हा संमेलनाचा चेहरा

अध्यक्ष हा संमेलनाचा चेहरा असतो. त्यांच्या निर्णयांवर, विचारधारेवर आणि नेतृत्वावर संपूर्ण परिषद किंवा संमेलनाची दिशा ठरते. त्यामुळे अध्यक्षाची निवड योग्य पद्धतीने केल्यास त्या व्यक्तीला सर्व सदस्यांचे विश्वास आणि समर्थन मिळते. यामुळे कार्यकाळात सर्वांना एकत्रित काम करण्याची प्रेरणा मिळते. लोकशाही ही एक अशी प्रणाली आहे, ज्यामध्ये नागरिकाला आपला आवाज उठवण्याचा आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचा हक्क असतो. लोकशाही मार्गाने अध्यक्षाची निवड ही एक आवश्यक प्रक्रिया आहे. यामुळे सर्व सदस्यांना समान संधी मिळते, पारदर्शकता वाढते आणि संघटनेतील एकात्मता मजबूत होते. त्यामुळे, प्रत्येक संमेलनाने या प्रक्रियेला महत्त्व देणे आवश्यक आहे. लोकशाही मूल्यांचा आदर करूनच आपण एक मजबूत आणि समृद्ध समाज निर्माण करू शकतो. ऋषितुल्य, प्रतिभावंत सारस्वत अध्यक्षपदापासून वंचित राहू नये, यासाठी निवडप्रक्रियेत सर्व सदस्यांचा सहभाग असावा. ज्यामुळे संपूर्ण संमेलनात एकतेचा भाव निर्माण होईल.

### एक प्रेरणादायी नेतृत्व

महिला सशक्तीकरणाच्या युगात, संमेलनाच्या अध्यक्षपदाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अध्यक्ष म्हणजे एक मार्गदर्शक, एक प्रेरणा, आणि एक शक्तिशाली आवाज. महिलांनी आपल्या साहित्याच्या विचारातून कार्यांच्या माध्यमातून समाजात परिवर्तन घडवून आणले आहे. साहित्य संमेलनाने महिलांच्या हक्कांसाठी लढा देणे, शिक्षण आणि आरोग्याच्या बाबतीत जागरूकता वाढवणे, आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणणे हे महत्त्वाचे आहे. विविध कार्यशाळा, चर्चासत्रे आणि नेटवर्किंग संधींच्या माध्यमातून, महिलांनी आपल्यातील अंगभूत क्षमतांना वाव दिला पाहिजे. महिला संमेलनाध्यक्ष म्हणजे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व, जी न केवळ आपल्या पिढीला, तर पुढील पिढ्यांनाही प्रेरणा देणारे असावे. या सर्व गुणांचे एकत्रित स्वरूप म्हणजे एक सक्षम महिला संमेलनाध्यक्ष, जी बदल घडवून आणण्याची ताकद ठेवते. त्यामुळे आगामी काळात अध्यक्षपदाच्या प्रक्रियेत त्यांचीही दावेदारी प्रबळ असणार यात संदेह नाही.

### ठरावांची पूर्तता सुनिश्चित व्हावी

साहित्य संमेलनात दरवर्षी वेगवेगळे ठराव होतात. ठरावांची पूतर्ता करण्यासाठी कार्यकारणी किंवा विशेष समित्यांना जबाबदारी देणे आवश्यक आहे. केलेल्या ठरावाची अंमलबजावणी कशी होते, त्याचा नियमित मागोवा घेणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून संमेलनाच्या ठरावाची प्रभावीपणे पूर्तता करणे शक्य आहे. केवळ कागदावरील ठराव कागदापुरतेच सीमित न राहता अंमलबजावणीसाठी एक मूल्यांकन प्रक्रिया ठरवून संमेलनातील ठरावांकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

### संमेलनाच्या यशाचे गमक

अध्यक्ष हे केवळ शोभेपुरते नसून, एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असतात. अध्यक्षाच्या नेतृत्वाखाली, साहित्यिक संघटना एकत्र येऊन सामाजिक बदल घडवून आणू शकतात. त्यामुळे एक सक्षम आणि सक्रिय अध्यक्ष हे संमेलनाच्या यशाचे मुख्य कारण आहे. वाचकांसोबतच संमेलनाची उंची वाढविण्यासाठी लेखक, पुस्तकांचे प्रकाशक, विक्रेते या उत्सवात सहभागी होतात. संमेलनाचे आकर्षण

**सरहद, पुणे** आयोजित
**अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे**

**९८ वे**

**अखिल भारतीय**
**मराठी साहित्य संमेलन, दिल्ली**
**२०२५**

असलेल्या अध्यक्षीय भाषणातून संमेलनाध्यक्षांनी वेगळा विचार समाजात पेरण्याचा प्रयत्न करावा. अध्यक्षांनी सकारात्मक विचार, उदाहरणे, आणि प्रेरणादायी कथा सादर करून, खुला संवाद साधून विविध मतांना महत्त्व देणे आवश्यक आहे.

संमेलनाची गर्दी पांगल्यानंतर संमेलनाध्यक्ष वर्षभर या पदावर सन्मानाने राहतो. राज्यभर साहित्यविषयक कार्यक्रमांना हजेरी लावतो. त्या पलीकडे जाऊन त्यांना काहीतरी भरीव काम करणे गरजेचे आहे. त्यामुळेच कविश्रेष्ठ नारायण सुर्वे यांनी या संमेलनाध्यक्षांचा उल्लेख 'गुळाचा गणपती' असा केला होता. सुर्वे यांनी वास्तवावर बोट ठेवले होते. त्यामुळेच या प्रतिष्ठेच्या पदाचा सन्मान होण्यासाठी व गरिमा कायम राहण्यासाठी त्यांना ठोस असे अधिकार बहाल करण्याची नितांत गरज आहे.

अनेक वर्षे भाषाप्रेमी व मराठी साहित्यिकांनी अविरत लढा दिला, तेव्हा कुठे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. आता बंगाली, आसामी, प्राकृत व पाली यांच्या पंक्तीत बसून मराठीचे अभिजातपण टिकवण्यासाठी, ते अधिक गडद करण्यासाठी एक ध्येय, उद्दिष्ट निश्चित करावे लागणार आहे. केवळ दर्जा मिळवून भाषा श्रेष्ठ होत नाही किंवा मिळालेले श्रेष्ठत्व टिकवू ठेवणे भाषेच्या प्रतिष्ठेची रेषा अधिक मोठी व ठसठशीत करण्याची आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे.

**(लेखक हे साहित्य अकादमीच्या बालसाहित्य पुरस्काराचे विजेते आहेत.)**



Scanned with OKEN Scanner

ऐतिहासिक वारसा आणि शास्त्रशुद्ध अधिष्ठान प्राप्त असलेल्या नवी दिल्लीत होत असलेले ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरणार आहे. मराठीला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिले साहित्य संमेलन आहे. तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणारे उद्‌घाटनही याला अधिक महत्त्व प्राप्त करून देईल. अशा या विशेष संमेलनानिमित्त 'मराठी भाषा ते अभिजात मराठी भाषा' या प्रवासाचा आढावा घेणारे संकलन..

# मराठी भाषेचा उगम

**युवराज पाटील**

मराठी भाषेचा उगम केवळ श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वरच्या शिलालेखात सापडत नाही, तर तिची मुळे अधिक खोल आणि प्राचीन आहेत. लिखित पुराव्यांचा शोध घेतल्यास, सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीचा पहिला लिखित ग्रंथ 'गाथा सप्तशती' आढळतो. सातवाहन राजा हाल याने गोदावरी खोऱ्यातील कवींच्या रचनांचे संकलन करून हा ग्रंथ संपादित केला. यातील भाषा महाराष्ट्री प्राकृत होती, जी मराठीच्या उगमस्थानी आहे, परंतु यापूर्वीही महाराष्ट्री प्राकृत अस्तित्वात होती का? याचे उत्तर 'होय' असेच आहे. याचा ठोस पुरावा इ.स.पूर्व ३०० मध्ये वररुची (कात्यायन) यांनी लिहिलेल्या 'प्राकृत प्रकाश' या ग्रंथात सापडतो. हा ग्रंथ प्राकृत भाषेचे व्याकरण स्पष्ट करणारा असून, त्यात महाराष्ट्री प्राकृतसह मागधी, अर्धमागधी, पैशाची आणि पाली भाषेचाही समावेश आहे. त्यामुळे मराठी भाषेचा उगम किमान २३०० वर्षांपूर्वीचा असल्याचे निश्चित होते.

## ज्ञानेश्वरी ते आधुनिक मराठी : भाषा परिपक्वतेचा प्रवास

कोणतीही भाषा पूर्णतः व्याकरणबद्ध स्वरूपात यायला काही शतकांचा काळ लागतो. १२व्या शतकातील ज्ञानेश्वरी ही महाराष्ट्री प्राकृतची परिष्कृत आवृत्ती म्हणता येईल. ज्ञानेश्वरांचे समकालीन संत नामदेव, मुकुंदराज, म्हाइंभट आणि त्यानंतर संत एकनाथ, संत तुकाराम यांच्या साहित्यातून मराठी अधिक स्थिरावत गेली. छत्रपती शिवाजी महाराजांनी 'राज्यव्यवहार कोश' तयार करून राजव्यवहारासाठी मराठीला सशक्त केले. धुंडीराज व्यास आणि रघुनाथ पंडित अमात्य यांनी हा कोश लिहिला होता. पुढे १८व्या शतकात दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी १८३६ मध्ये 'मराठी भाषेचे व्याकरण' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला.

## अभिजात भाषेचे निकष आणि मराठी

भारत सरकार कोणत्याही भाषेला अभिजात दर्जा देताना पुढील महत्त्वाचे



निकष विचारात घेते, त्यात

**प्राचीनतेचा पुरावा :** भाषेचा इतिहास किमान १५०० ते २००० वर्षांपर्यंत मागे जाणारा असावा.

**स्वतंत्र व्याकरण आणि लेखन परंपरा :** भाषा केवळ बोली स्वरूपात नसून शास्त्रशुद्ध व्याकरण आणि साहित्यपरंपरा असावी.

**मौलिक साहित्य ठेवा :** ज्ञानपरंपरा असलेले ग्रंथ आणि साहित्य शतकानुशतके उपलब्ध असावे.

**सतत वापर आणि टिकाऊपणा :** भाषा अद्यापही लोकांमध्ये व्यापक प्रमाणावर वापरली जात असावी.

मधुकर वाकोडे, सतीश काळसेकर, डॉ. कल्याण काळे, प्रा. आनंद उबाळे, परशुराम पाटील, डॉ. मैत्रेयी देशपांडे आणि अन्य विद्वानांनी केलेल्या सखोल अभ्यासानंतर केंद्र सरकारकडे अहवाल सादर करण्यात आला. त्यानुसार २०२४ मध्ये मराठी भाषेला अभिजात दर्जा बहाल करण्यात आला.

हा सन्मान मराठी भाषिकांसाठी अभिमानास्पद आहे. यामुळे मराठीसाठी स्वतंत्र संशोधन केंद्र, शैक्षणिक अनुदान आणि जागतिक स्तरावर तिची प्रतिष्ठा वाढणार आहे.

**सरहद, पुणे** आयोजित
**अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे**

**१८ वे**

**अखिल भारतीय**
**मराठी साहित्य संमेलन, दिल्ली**
**२०२५**



मराठी भाषा या सर्व निकषांमध्ये योग्य ठरली. म्हणून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला.

सातवाहन काळातील महाराणी नागनिका हिने नाणेघाटात कोरलेला शिलालेख आणि महाराष्ट्रातील लेण्यांमधील अनेक शिलालेख हे आद्य भाषेचे महत्त्वाचे ऐतिहासिक पुरावे आहेत.

## मराठीला अभिजात दर्जा : ऐतिहासिक निर्णय

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. श्रीकांत बहुलकर, प्रा.

## दिल्लीतील ऐतिहासिक संमेलन आणि पुढील वाटचाल

अभिजात दर्जा मिळाल्यानंतर प्रथमच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्लीमध्ये होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार असल्याने हे संमेलन ऐतिहासिक ठरणार आहे.

यामुळे मराठी भाषा संशोधनासाठी अधिक अनुदान आणि केंद्रे स्थापन केली जातील. मराठीचा शैक्षणिक स्तरावर अधिक व्यापक वापर होईल. डिजिटल माध्यमांत मराठीला अधिक संधी निर्माण होतील.

## अभिजात मराठीचा अभिमान

मराठी भाषेत एकूण ४२ बोलीभाषा असल्याचे भारतीय विद्वान मानतात. यामध्ये अहिराणी, वऱ्हाडी, कोळी, आगरी, माणदेशी, तंजावर मराठी, कुणबी, महाराष्ट्रीय कोकणी या प्रमुख बोलीभाषा आहेत.

२००० वर्षांहून अधिकचा इतिहास, समृद्ध साहित्य परंपरा आणि ऐतिहासिक संदर्भ यामुळे मराठीच्या अभिजाततेचा दर्जा अधिक दृढ झाला आहे. आता या अभिजाततेचा उपयोग करून मराठीला जागतिक स्तरावर अधिक दृढ करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या कार्यात सर्व मराठी भाषकांचाही मोठा सहभाग असणार आहे.

संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेबद्दल अभिमानाने म्हटले आहे -

*माझा मराठाचि बोलु कौतुकें,*
*परि अमृतातेंही पैजां जिंके।*

या ओळींमधून त्यांनी मराठी भाषेची महती व्यक्त केली आहे. अमृतालाही पैजेने जिंकणारी ही अक्षरे ज्ञानदेवांच्या प्रत्येक शब्दाशब्दांतून प्रकट झाली.

अशी ही आपली मराठी भाषा वैश्विक ज्ञानभाषा होण्यासाठी आपण सर्वजण सतत प्रयत्नशील राहू या!

**जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव**



Scanned with OKEN Scanner

घरासमोर सडा-रांगोळी झाली की, जात्यावरच्या ओव्या कानावर पडायच्या. सांस्कृतिक मूल्यांची रेलचेल असलेली ही पहाट आयुष्यभराचा संस्कार देऊन जायची. यात समाज घडवण्याचे अद्‌भुत सामर्थ्य असायचे. नात्यांचा जिव्हाळा, त्यांच्या भल्याची कामना करणारे मन या ओव्यांमधून डोकावायचं. कामाची धांदल असायची तरी आपल्या माणसांसाठी आवर्जून वेळ काढण्याची वृत्तीही असायची.

# पहिली माझी ववी गं...

डॉ. सुरेखा मधुकर मुळे

'रात्र संपली दिस उगवला, पूर्ण निशेचा नाश जाहला, नवतेजाने प्रफुल्ल होऊन लागे जग हे कार्याला, रामप्रहरी स्मरा विठुला, शुद्ध मनीचा भाव, हेच सांगण्या आलो तुम्हासी वासुदेव माझे नाव' असं म्हणत ज्ञानरूपी गोविंद वासुदेवाच्या रूपाने आपल्या दारी येतो आणि दान पावल्याची पावती देत आपल्याला आशीर्वाद देऊन निघून जातो इतकी सुंदर पहाट मला वाटतं दुसरी असू शकत नाही.

ही उगवती फार पूर्वीची नाही, अगदी काही वर्षांपूर्वी गावागावात अनुभवता यायची. घरासमोर सडा-रांगोळी झाली की जात्यावरच्या ओव्या कानावर पडायच्या. सांस्कृतिक मूल्यांची रेलचेल असलेली ही पहाट आयुष्यभराचा संस्कार देऊन जायची. यात समाज घडवण्याचे अद्‌भुत सामर्थ्य असायचे. नात्यांचा जिव्हाळा, त्यांच्या भल्याची कामना करणारे मन या ओव्यांमधून डोकावायचं. कामाची धांदल असायची तरी आपल्या माणसांसाठी आवर्जून वेळ काढण्याची वृत्ती ही असायची.

लोकमनातील विश्वास या निमित्ताने व्यक्त व्हायचा. मला आठवतं, झोपेतून उठल्यानंतर आजी जमिनीला हात लावून नमस्कार करायची... ती असे का करायची कळायचं नाही, मग एक दिवस तिला विचारलं... तिने ओवीच गायीली. पहिला माझा नमस्कार धरणीमातेला.... जागा मला देते ती उभं की राहायला... आपण एकीकडे धरणीमाय म्हणतो आणि दुसरीकडे दिवसभर तिला पायाखाली तुडवतो. तिचं हे आपल्यावरचं ऋण आहे... आपण ते मान्य करायलाच हवं. त्यामुळे झोपेतून उठल्यानंतर जमिनीवर उभं राहण्याआधी तिला नमस्कार करून तिच्यावर पाय ठेवण्याची मान्यता घ्यायची आणि मग दिवसभराच्या कामाला सुरुवात करायची.


संग्रहित

आज आपण सगळेजण ग्लोबल वॉर्मिंगच्या, प्रदूषणाच्या विषयांवर भरभरून बोलतो; पण किती साध्या शब्दात फार पूर्वी आपल्याच माणसांनी पंचमहाभूतांचे महत्त्व जाणून त्याची जपणूक केलेली दिसते. सणवाराला लागणारी पत्री तोडताना फक्त पाच पाने तोडायची, ती तोडण्याआधी ती कशासाठी घेत आहोत हे त्या झाडाला सांगून त्याची परवानगी घेऊन तोडायची असं मुलींना सांगितले जायचे. मुलांमध्ये संयम, शिस्त जागवताना त्यांच्यात ओरबाडण्याची वृत्ती रुजणार नाही याची काळजी घेतली जायची. 'नारायण उगवतो किरण टाकित भुईला... पतीराज भाईराज औख मागते दुहीला' ही त्यानंतरची आजीची ओवी असायची. आपल्याच माणसांसाठी उगवणाऱ्या सूर्याला साक्षी ठेवून औख म्हणजे आयुष्य मागणारी ही स्त्री तिच्या भल्या मनाचा संस्कारच सांगून जायची.

## सोनसळी सकाळ

अशा अनेक मूल्यांनी आणि संस्कारांनी भरलेल्या संकल्पना या मानवी मनाला नेहमीच सुपोषित करत आल्या आहेत. देवत्वाला लौकिक पातळीवर आणून त्यांचाही दिनक्रम या बायाबापड्यांनी आपल्या ओव्यांमधून सांगितला आहे. 'पहाटेच्या प्रहरी कोण करी हरी हरी, देव माझा मारुती तोंड धुई बारवाच्या चिरेवरी, रामकुंडावरी हिरवा मांडव जाईचा, करितो

स्नान संध्या पुत्र कौसल्या माईचा...', ही त्याची काही उदाहरणे सांगता येतील.

घर संसाराचा गाडा ओढणारी ही स्त्री उठल्यापासून तिच्या कामात व्यस्त आहे.. पण तिला जाणवणारी सोनसळी सकाळ ही तिने शब्दात मांडलीय, 'उगवले नारायण उगवता झाले लाल... पांघरली कोरी शाल वर जरीचा रुमाल' असं ती त्या उगवतीचे वर्णन करतेय. तिच्यातली सौंदर्यदृष्टी, निसर्गाचे बदलणारे रंग टिपण्याचे कसब अलौकिक आहे.

## ओवी ववी

हे टिपण ती ज्या माध्यमातून मांडते आहे ती ओव्यांची मांडणी खूप सहज आणि बोलकी आहे... 'उगवले नारायण केळीच्या कमळात... बाई सकाळी उठूनी हात माझे जोंधळ्यात...' असं जेव्हा ती म्हणते तेव्हा ती घरची समृद्धी सांगत असते... जोंधळे म्हणजे ज्वारी. पहिली माझी ओवी 'गणराया गणपती... पिठाला बरकती, तिथं लक्ष्मी उभी हुती...' हे त्याचेच उदाहरण.

## लोकमनाचा संस्कार

संस्कृती माणसाला घडवते हीच संस्कृती पुढे नेत तो माणूस नवीन संस्कृतीला जन्माला घालतो... ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे... पण नवं घेताना जुनं जे चांगलं आहे, कालातीत आहे आणि जे जीवनमूल्यांचा अविभाज्य भाग आहे ते बरोबर नेणं हे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. जात्यावरच्या ओव्या हा साडेतीन चार चरणांचा काव्य प्रकार आहे. ओवीची मांडणी लवचिक असल्याने त्यातून लोकमनाला जागं ठेवण्याचं आणि संस्कार आणि संस्कृती पुढे नेण्याचं काम झालेलं दिसतं.

## संस्कारांची पेरणी

अहंकार, द्वेष वाईट आहे हे सांगताना साधी राहणी आणि उच्च विचारसरणीची बीजं ओव्यांनी मनामनात रुजवली. लोकमनाला सात्विकतेच्या वाटेवर आणून सामान्य माणसाचं जगणं सोपं केलं. मनामनात ज्ञानाची ज्योत चेतवली. ल्योकापरी लेक कशानं उणी झाली, मायबापा ओवी गाता कैलासी ऐकू गेली असं सांगत मुला-मुलीत फरक न करण्याचा सल्ला दिला.

ओव्यांना समाजजीवनाचा आरसाच म्हणा नं. 'बाप म्हणे लेकी, तुला देऊन आलो बाई, परि तुझ्या नशिबाचा जामीन झालो नाही' असं म्हणणाऱ्या मुलीचा वडिलांची 'बाप म्हणे लेकी तु गं माझं साखरेचं पोतं, तुझ्या नशिबाचा मीच जामीन हुतो' अशी बदललेली मानसिकताही या हळव्या मनाच्या स्त्रीने अलगद टिपली आहे. 'जिथं असं घडत नाही तिथे लई झाल्या लेकी म्हणू नको माझ्या बापा, उडूनिया जाईल तुझ्या चिमण्यांचा ताफा...' असं सांगणारी आजी, पणजी ही आपल्याला याच ओव्यांमध्ये भेटते आहे. हा संवादाचा असा ठेवा आहे ज्याला आपण संस्कारांच्या तराजूत तोललं तर एक सुसंस्कृत समाजाची पेरणी करणारी ही गीतं म्हणून आपण ओव्यांकडे पाहू शकतो. 'नको काळजी ही विहिणीबाई माझ्या अंगणी मोगरा, आली तुझी जाई' अशी मुलीच्या आईची काळजी मिटवणारी सासूदेखील याच ओव्यांमधून आपल्या समोर आलेली दिसते.

'स्त्रियाचा जल्म नको घालू सख्याहरी, रात्रंनि दिवस परक्याची ताबेदारी, गर्वाचे नारी गर्वाचे घर खाली - लंकेच्या रावणाची कायबाई गत झाली, सासुरवासामंदी काकणं गेली कोपऱ्याला - बया विचारते काय जाचलं माझ्या लेकराला, वाटेवरी अंबा, अंबा नव्हं हुती कैरी, सवतीवरी लेक दिली बाप नव्हं हुता वैरी' अशी मनीची वेदना, घुसमटही तिने आपल्या ओवीतून व्यक्त केलीय. याही परिस्थितीत ती माहेरचा स्वाभिमान अभिमान जागा ठेवण्याचाही प्रयत्न करतेय, 'थोरलं माझं जातं, मला बघून पळतं, माय वाघिणीचं दुध मनगटी खेळतं सासूचा सासुरवास कडु विषाचे गं प्याले, तुझ्या नावासाठी गोड केले मायबाई म्हणत संसाराचा गाडा पुढे नेतेय.'

## तिचा मोठा संसार

भौतिक सुखात अडकलेल्या माणसाला हे पुण्यसंचित नक्कीच वाचवू शकेल इतके सामर्थ्य ओवीच्या मांडणीत आहे. या ओव्यांमधून तिचा भला मोठा संसार व्यक्त झाला आहे. हे विश्वची माझे घर सांगणारा

सरहद, पुणे आयोजित
अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे

**अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली**
२०२५

हा संवाद आहे. यातील सहजता, नैसर्गिकपणा आणि हळुवारपणे आपल्यासमोर आलेले तिचे भावविश्व किती नाजूक आहे याची जाणीव आपल्याला होते. सुख दुःखाच्या द्वंद्वावर मात मिळवताना तोल कसा सावरायचा हे या ओव्या सांगतात. या ओव्या अंतरीचे बोल आहेत, यात मातृभाषेचा गौरव आहे.. म्हणूनच मायबोलीहून नाही दुसऱ्या भाषेला वाव, व्याकरणाविना येथे बोलती हृदयीचे भाव असे ओव्यांचे वर्णन करावे लागते. काळाच्या मस्तकावर पाय ठेवून पुढे जाण्याच्या त्यांच्या क्षमतेबद्दलच सांगायचे झाले, तर 'काव्यसंपदा ही कुणाची ठाव नाही नाव गाव, आहे सारे अनामिक उरे मनातील भाव' असंच म्हणावे लागेल.

## तिचं गोकुळ

जात्यावरच्या ओव्यांमधून व्यक्त होणारं स्त्रीजीवन, कुटुंब हे गोकुळासारखं आहे. यात एकमेकांसाठी जीव पाखडणारी माणसं आहेत. वडीलधाऱ्यांच्या शब्दांना मान देणारी, आपल्या माणसांसाठी झीज सोसणारी माणसं आहेत. ती एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होतात. ओव्यांमध्ये आहे जीवाभावाची सई म्हणजे मैत्रीण, तर भावासाठी जीवाची पंचारती करून त्याला ओवाळणारी बहीणही आहे. सासरी नांदणाऱ्या मुलीला माहेरची अपूवाई आहे, तर सासरचे कौतुक सांगणारी गृहलक्ष्मीही याच ओव्यांमध्ये आहे.

'मायबाप माझे गंगा रामेश्वर, देवाला नको जाया देव माझ्या घरी थोर असा जन्मदात्यांबद्दलचा तर सासू नि सासरा तेंची



Scanned with OKEN Scanner

मोत्याची पाऊलं, त्यांच्या की पोटीचं मला माणिक गावलं' असा सासु-सासऱ्यांविषयीचा मनातला आदरभाव ही ओव्यांमधून व्यक्त झाला आहे.

आईला जप, तिचा अपमान करू नको असं सांगणारी आजीही नको म्हणून 'पुत्रा मातेला वेडी वेडी, तिला जन्म देताना तुटली तिची आतडी' असं म्हणताना दिसते. 'बहीण गेली सासरला, भाऊ उभा वाटेवरी, आल्या गेल्याला पुसतो बहीण दिसली कुठवरी' अशी बहिणीची काळजी घेणारा भाऊ यात आहे, तर 'नणंद अक्काबाई चिंचेचं आकडं, किती करा सेवा नित बोलणं वाकडं,' ही व्यथाही आहे. हे सगळं स्त्रियांचं जिव्हाळ्याचं भावविश्व आहे.

## तिची नातीगोती

'देव देव म्हणूनी चारीधामाला गेलं येडं, शहाणा पुत्र मायबापाची सेवा करं, बाप तो ईश्वर, मायबाई काशी, नंदी आहे पायापाशी भाऊराया, वेड्या माझ्या जीवा तुला उलीसं कळंना, मायबापसारखी कुठं दौलत मिळंना, तुझी वाट रे पाहुनी डोळे झाले कुखावाणी सोयऱ्या बांधवा कशी माया लोकावाणी...' अशी मनाच्या गाभाऱ्याला खोलवर स्पर्शून जाणारी ओवी ऐकली की यातली सहजता तर जाणवतेच; पण तिच्या नात्यागोत्यातील आनंद, रुसवा, तिची घालमेल ही जाणवते. राखी पौर्णिमा आली तरी भाऊ बहिणीकडे आला नाही... हे काय रे दादा... तु बहिणीला इसरलास काय? पण लक्षात ठेव दादा आम्ही चार घटकेच्या चिमण्या आहोत... आणि तू तर कस्तुरीसारखा आहेस... कळतय नं तुला मी काय म्हणतेय ते... रागावलास का माझ्यावर... विचार करता करता ती पुन्हा मान झटकते... म्हणते, हा काय भलताच विचार करतेय मी? पाठच्या बहिणीवर भाऊ कसा रागवेल... कस्तुरी का सोडेल नीजवाज भाईराया.... तिचं दोलायमान मन ओवीतून व्यक्त होतं आणि भावावरचा विश्वास दाखवतं.

'जिला नाही भाऊ तिने पाचोळ्याचा केला, आली वाऱ्याची झुळूक दादा उडूनिया गेला' हा तिला आलेला नात्यातील फोलपणा ती सांगतेय तर कधी मानियला भाऊ जातीचा मुसलमान, सख्या भावापरिस आहे त्याचं ईमान म्हणत मानवतेचे रेशीम बंधही दाखवतेय.

## तिच्या अंतरीचं गुज

ओवी म्हणजे स्त्री जीवनाची, तिच्या मनाची हळुवार गाथा आहे. ती जशी मनाला मोहून टाकणारी, अंतरीचं गुज सांगणारी भाषा आहे तशीच ती मोठ्याच्या आम्ही मुली जशा तलवारीच्या अण्या, जाईल पाणी, तुझं दुरून बोल शहाण्या असे परखडपणे सांगायलाही घाबरत नाही.

## मनाचा हळुवारपणा

'सुंदर माझे जाते गं, फिरतसे बहुते, ओव्या गाऊ कौतूके तु ये रे बा विठ्ठला' असं गाताना आणि आपला श्रमपरिहार करताना या भोळ्याभाबड्या स्त्रियांनी आपल्या आसपास घडणाऱ्या अनेक गोष्टी टिपकागदाप्रमाणे टिपून घेऊन आपल्या गाण्यात ओवल्याचे दिसते. या हळव्या मनाला सीतेला झालेला सासूरवासही आवडला नाही, त्यावर बोलताना ती म्हणते, 'सीताबाई वनवासी, दगडाची केली उशी, अरण्यामंदी सीताबाई, तुला झोप आली कशी किंवा कामाच्या व्यापात तिला पंढरपूरला जाता येत नाही,' मग ती म्हणते, 'पंढरीला जाया अवंदा नव्हतं माझं मन, देवा विठ्ठलानं पत्र पाठविली दोन, एवढ्या कामातून मी पंढरीला गेले का? तर देवा विठ्ठलाची दोन पत्रं आली, तिथे गेले तर काय, भक्तांची ही गर्दी,' मग ती विठ्ठलाकडे तक्रार करताना म्हणते, 'जीवाचं सुखदुःख तुला सांगते विठ्ठला, पंढरीच्या पाटला कधी भेटशी एकला..'

## मातीचा सुगंध

समाजजीवनाचे दर्शन घडवणारी ओव्यांमधील अभिव्यक्ती त्यामुळेच आजही लोकमनाशी एकरूप झालेली दिसते. 'उगवले नारायण गोदावरीला आरती, आंघोळीला आले सोपान निवृत्ती' इथे मांडणीतील प्रादेशिकताही आपल्या लक्षात येईल. जे जे स्त्रियांच्या मनाच्या जवळ, तिच्या घर-संसाराच्या जवळ त्याचा तिने आपल्या ओव्यांमधून आवर्जून उल्लेख केलेला दिसतो. मराठवाड्यात सर्वात मोठी नदी गोदावरी... तिचा उल्लेख मराठवाड्याच्या ओवीगीतांमध्ये अनेकदा आलेला दिसतो..

मनातल्या आशयाला पूर्ण अर्थ देणारी ही मांडणी त्यामुळेच ये हृदयीचे ते हृदयी जाऊन भिडणारी आहे. याची प्रेरणा ही मुळातच सामाजिक जीवनात, कौटुंबिक वातावरणात रुजलेली आहे. याला गावाकडच्या मातीचा आणि घरंदाजपणाचा सुगंध आहे. त्याग आणि उपभोग याच्यात संतुलन साधताना आपला, कुटुंबाचा, घर परिवार आणि परिसराचा विचार यातून व्यक्त झाला आहे.

## काळजाची भाषा

ज्ञात-अज्ञात स्वरूपात पिढ्यान्‌पिढ्या प्रवास करणाऱ्या या ओव्यांना खऱ्या अर्थाने काळजाची भाषा म्हणावं लागेल. ओव्यांमधील भाषेचे सामर्थ्य, यातील भावभावनांचे ऐश्वर्य आणि अभिव्यक्तीमध्ये काळानुरूप झालेला बदल हा त्या त्या काळातील स्त्रियांच्या परिवर्तनाचा प्रवास सांगतो. यातून व्यक्त होणारं महिलांचं भावविश्व हे इतकं संवेदनशील आहे की, कधी पटकन डोळ्यात पाणी आणतं तर कधी अत्याचाराविरुद्ध लढण्यासाठी हत्तीचं बळ देतं.

## वाट झाली मोकळी

आज आपण माध्यम क्रांती अनुभवत आहोत. संवादासाठी रोज एक नवं माध्यम गवसत असताना आपण कसं आणि कोणत्या माध्यमातून व्यक्त व्हायचं, यासाठी अनेक पर्याय आहेत; पण ज्यावेळी असे कोणतेच पर्याय उपलब्ध नव्हते तेव्हा गावगाड्यात अडकलेल्या आणि कुटुंब कबिल्यात उंबऱ्यांच्या आत वावरणाऱ्या स्त्रियांना त्यांचं मन मोकळं करण्यासाठी कुठलंच साधन नव्हतं, तेव्हा या जात्यावरच्या ओव्यांनी त्यांच्या मनातील भावभावना, उद्रेक, घालमेल यांना वाट मोकळी करून दिली. ओव्यांच्या माध्यमातून याला गुंफण्याचं-ओवण्याचं काम केलं आणि त्यातून मनाचा शिणवटा हलका केला.

ओव्यांमधील अभिव्यक्ती ही फक्त स्त्रियांच्या सुख-दुःखापुरती मर्यादित आहे का, तर नक्कीच नाही. यात अनेक पिढ्यांचे अनुभव आणि त्यातून मिळालेलं ज्ञान



Scanned with OKEN Scanner

यामुळं ओवी आणखी संपन्न झाली आहे. यात जीवन जगण्याची शिदोरी आहे. 'शेजीबाई एका दारी दोघी वागू, माझी मैना, तुझा राघू' असं सांगताना ती शेजीचं म्हणजेच शेजारणीशी असलेलं तिचं नातं सांगतेय, तर कधी दुसरीकडे शेजीच्या घरी गेले 'सहज मी बसायला, शेजी मनाशी बोलती आली असेल उसण्याला' अशी तिची तक्रारही करतेय.

एवढंच कशाला? मनाला न पटलेल्या गोष्टीही ओव्यांमधून समोर आल्या आहेत... 'आपली नार हाय हळदीचा गाभा, पर नारीसाठी वळचणीला उभा' असं म्हणत परस्त्रीच्या नादी लागलेल्या पतीविषयीची वेदना यात आहे. देवाला लौकिक पातळीवर आणून त्याच्याशी साधलेला संवाद यात आहे... 'किती गं पुण्य केलं तु कुंभाराच्या ईटं, विठु दयाळाची तुला चरणं सापडली कुठं' असा मनाला पडलेला प्रश्न आहे, तर 'रुक्मीण धुणं धुती, विठ्ठल डगरीला उभा', अशा दोघांच्या प्रीतीला हसली चंद्रभागासारखा प्रेमातील लडिवाळपणाही यात आहे. 'भीम भीम म्हणू भीमा साखरेची पुडी, भीमाचं नाव घेता सुदं झाली माझी कुडी' ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयीची आदरभावनाही ओव्यांमधून व्यक्त झाली आहे

यातील वैचारिक श्रीमंती थक्क करणारी आहे. ओवी आणि लोकगीतातून उलगडत जाणारं स्त्री मनाचं भावविश्व प्रचंड उत्कट आहे. ओव्यांनी प्रवाहासोबत जात, नावीन्याची कास पकडत आपला प्रवाह नेहमीच खळखळता ठेवल्याने त्या त्या काळातील घटना-घडामोडींचं प्रतिबिंब त्यात दिसून आलं आहे. त्यामुळेच अगदीच सहजतेने स्वातंत्र्य, स्वराज्य, महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा उल्लेख जसा आला तसाच प्रौढ शिक्षण, लसीकरण, दारुबंदी, मुलीचा जन्म, तिला होणारा सासूरवास यासारखे विषय ओव्यांनी अतिशय लीलया हाताळलेले दिसतात.

## शब्दांचं कोंदण

जन्मापासून मृत्यूपर्यंत साथ देणारी, प्रत्येक सण समारंभ, सुखदु:ख आपल्यासोबत साजरी करणारी आणि त्यातून आपल्या जीवनाचा आरसा दाखवून दिशा देणारी ही ओवी केवळ स्त्री मनाचं भावविश्व नाही तर खऱ्याअर्थाने लोकसंवादाचं सशक्त माध्यमही आहे. ओव्यांची भाषा, तिचं वैभव, तिची मांडणी प्रचंड विलोभनीय आहे. ओव्यांमधून आपल्या जिवलगांसाठी वापरलेली प्रतीके/उपमा या मांडणीची श्रीमंती सांगतात. कंथ, मंगळसूत्र, राजस, कपाळीचं कुंकू, राया, सखा, साजना, गळीचं मंगळसूत्र अशा विविध नावांनी पतीला संबोधणारी पत्नी यात आहे. मुलीला पृथ्वी, हिरकणी, मैना, चंद्रम्याची कोर, चिमणी, गुळाची घागर, साखरेचे पोते, हरभऱ्याची डाळ, साखरेचा घडा, धर्माची पायरी संबोधणारी हळव्या मनाची आई ओव्यांमध्ये आहे. प्रत्येक नात्याला तिने सुंदर शब्दांचं कोंदण या ओव्यांमधून दिलेलं दिसतं.

## नावीन्याचे टिपण

'पहाटेच्या प्रहरी मला संसाराचा धंदा, नाव तुझे रे गोविंदा घ्यायला विसरले' असं सांगून माफी मागणाऱ्या मनाचा नितळपणा या महिलांकडे आहे. 'सकाळी उठून मला घाई सडा रांगोळीची, माझ्या की दारावरनं वाट जाते मंदिराची' असं ओवीतून सांगणारी स्त्री पुढे तिच्या अस्तित्वाविषयी जाणती झाली आणि बदलत्या परिस्थितीची नोंद तिने आपल्या ओव्यांमधून घेताना म्हटलं, 'सकाळी उठूनी मला सडा रांगोळीची घाई, माझ्या की दारावरनं वाट शाळेची जाई, पहिली ओवी कौसलेच्या रामाला, मुलासंगे मुलीला मी पाठवते शाळंला...' मुला मुलीत भेद करायचा नाही हा संदेश किती ओघवत्यापणाने तिने आपल्या ओवीमधून मांडला आहे.

आता इंग्रजी माध्यमातील शिक्षण हा काही नावीन्याचा विषय राहिला नाही; पण साधारणत: तीन चार दशकांपूर्वी तो नक्कीच नावीन्याचा विषय होता, तोही तिने आपल्या ओवीत मांडताना म्हटलं, 'सकाळच्या पारी टांगा धावतो वेसीबाहेर, तान्हा माझा इंग्रजी शाळेत जातो कोसावर' हेच नावीन्य शेतातल्या कामाच्यावेळीही दिसते. 'नदीच्या पल्याड काय वाजतं खटाखटा, माझ्या बंधुजीच्या शेतात नवीन इंजिन जुना पट्टा.'

सरहद, पुणे आयोजित
अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे
९८ वे
अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

स्वातंत्र्य, स्वराज्य, स्वदेशीवरचं तिचं भाष्यही बोलकं आहे, ती म्हणते, 'जिकडे तिकडे झाले गांधी गांधी, साधी झाली राहणी बाया बापड्यांची, कुठं चालल्या आयाबाया.. बंद मीठ लुटावया इंग्रजांचं,' तिला गावात आलेल्या नवीन आगीनगाडीचंही खूप कौतुक आहे, ती म्हणते, 'आगीनगाडीला नका म्हणू राक्षसीन, चार बोटांच्या रुळावर कशी चालली मोकाशीन' मुंबई आणि गिरण्या एक जिव्हाळ्याचं नातं, तेही तिनं आपल्या ओव्यांमधून मांडलंय, 'मुंबई शहरामंदी गिरणीबाई तुझा भोंगा, माझ्या प्राणसख्याचा धावतो टांगा.'

## सगळ्यांचं भलं चिंतणारा लोकरंग

हे खऱ्या अर्थाने लोकजीवन आहे. प्रवाही राहणारं, नदीसारखं, यात ना विचाराचं साचलेपण आहे ना संस्काराचं. बदलत्या काळातील चांगल्या गोष्टींचा स्वीकार करत ही लोकधारा पुढे आणि पुढेच जात आहे. 'फिरती पोटासाठी पाय, ओठी भक्तांचे रंजन, अंतरंगी कोरले अशी कला असे जीणे, संगे संस्कृतीचे लेणं' असं या गाण्यांबाबत, लोकसंस्कृतीच्या उपासकांबाबत बोलले जाते. ओवी ही देखील एक संस्कृतीचं लेणं आहे, हा लोकरंग ना केवळ तिच्या, परंतु समाज जीवनाच्या भावविश्वाला प्रकाशमान करणारा, सगळ्यांचं भलं चिंतणारा आहे एवढं नक्की.

विभागीय माहिती उपसंचालक (लातूर)



Scanned with OKEN Scanner

मराठी भाषा अभिजात आहे की नाही याची चर्चा आपल्याला सोळाव्या शतकापासूनच सुरू झालेली दिसते. संस्कृत भाषा देवांनी निर्माण केली, मग काय प्राकृत भाषा (म्हणजे माहाराष्ट्री प्राकृत) काय चोरांनी निर्माण केली? हा प्रश्न अत्यंत उद्वेगाने संत एकनाथ यांनी विचारला होता. मराठी भाषा स्वतंत्र नसून संस्कृतपासून निर्माण झाली हा दुराग्रह भाषा विद्वानांनीही धरला.

# प्राचीन मराठी भाषेचे वैभव


**संजय सोनवणी**

एकोणिसाव्या शतकात आर्य आक्रमण सिद्धांतामुळे भारतातील बहुतेक भाषा या संस्कृतोद्भव आहेत व एतद्देशीयांना आक्रमक आर्यांची भाषा न पेलल्यामुळे सामान्य लोकांत अपभ्रष्ट संस्कृत म्हणून प्राकृत बोलीभाषा निर्माण झाल्या असा अ-भाषाशास्त्रीय सिद्धांत पुढे आला. भाषाशास्त्राची मांडणी करताना प्राकृत भाषांना मिडल-इंडो-युरोपियन अशी संज्ञा बहाल करत प्राकृत भाषांना दुय्यम स्थान दिले गेले.

भाषांचा प्रवाह हा प्राथमिक ओबड-धोबडतेकडून कालौघात सांस्कृतिक परिवर्तनासोबत परिष्कृततेकडे वाटचाल करतो आणि भाषा ही त्या त्या प्रदेशाच्या भूवैशिष्ट्यांमुळे निर्माण होणाऱ्या सामुहिक मानसशास्त्राची उपज असते. हे निखळ प्रादेशिक भाषाशास्त्रीय सत्य आर्य आक्रमण सिद्धान्त डोक्यावर घेणाऱ्या विद्वानांच्या लक्षात आले नाही. उलट भाषांचा उपयोग सांस्कृतिक दहशतवादासाठी होऊ लागला. संस्कृत ही देवभाषा असून बाकी संस्कृतच्या अपत्यभाषा आहेत, हे असत्य लोकांवर बिंबवण्यात भाषिक वर्चस्वतावादी लोक यशस्वी झाले. यामुळे भाषिक न्यूनगंड निर्माण झाला आणि सामाजिक मानसशास्त्र दुय्यम झाले. जीही भाषा स्वतंत्र आहे, कोणत्याही बाह्य प्रभावाखाली तिची निर्मिती झालेली नाही, ज्या भाषेत किमान दीड हजार वर्षांपासून लिखित पुरावे उपलब्ध आहेत आणि ज्या भाषेचा प्रवाह सातत्यपूर्ण राहिलेला असून जी मौलिक साहित्य परंपरा दाखवते ती भाषा अभिजात होय.

आजची मराठी भाषा प्राचीन 'महरठी पाईय' असे तत्कालीन मराठीत म्हणवणाऱ्या भाषेचा सलग प्रवाह आहे. या शब्दाचे पुढे कृत्रिम संस्कृत रूप माहाराष्ट्री प्राकृत असे केले गेले. मराठी शब्दांच्या कृत्रिम संस्कृतकरणाचा अट्टाहास मध्ययुगात मोठ्या प्रमाणात बळावल्याने अनेक सांस्कृतिक बाबीही झाकोळल्या गेल्या आहेत. उदाहणार्थ सालाहन किंवा सातवाहन या शब्दाचे केलेले शालिवाहन हे संस्कृत रूप. यामुळे शक संवत्सराची स्थापना करणारे शालिवाहन कोण हा प्रश्न दीर्घकाळ अनुत्तरित राहिला होता हा इतिहास आहे. असे अनेक गोंधळ या भाषिक अपप्रवृत्तीमुळे झालेले आहेत, ज्याचे निराकरण अद्याप व्हायचे आहे.

संस्कृत भाषा अन्य सर्व भारतीय भाषांपेक्षा प्राचीन आहे काय? या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर आहे की नाही. संस्कृत भाषेचा जन्म इसपू पहिले शतक ते इसवी सनाचे दुसरे शतक या ३०० वर्षांच्या काळात प्राकृत भाषांवर संस्कार करत क्रमशः झाला. याचे पुरावे आपल्याला प्राचीन नाण्यांवरील व शिलालेखातील भाषेतून





Scanned with OKEN Scanner

मिळतात. वेदांची भाषा आणि संस्कृत भाषा एकच असाही थोर गैरसमज समाजात आहे. वास्तव हे आहे की, या दोन्ही भाषा सर्वस्वी भिन्न आहेत. पाणिनी आपल्या अष्टाध्यायी या व्याकरणात वैदिक भाषेचा उल्लेख 'छांदस' असा करतो तर संस्कृतचा उल्लेख फक्त 'भाषा' असा करतो. वैदिक भाषा संकरित असून त्यात अवेस्त्याची प्राचीन पर्शियन भाषा आणि प्राचीन प्राकृत भाषांचा संकर झालेला आहे. एवढेच काय, संस्कृत भाषाही प्राकृत भाषांवर संस्कार करत कृत्रिमरीत्या तयार करण्यात आलेली आहे आणि त्या रूपांतरणाचा सलग इतिहासही उपलब्ध आहे.

या संदर्भात जे. ब्लॉख यांनी १९१४ साली लिहिलेल्या फॉर्मेशन ऑफ मराठी लँग्वेज' या पुस्तकात फार महत्त्वाची निरीक्षणे नोंदवलेली आहेत. थोडक्यात ती अशी : ऋग्वेदाच्या प्राचीन संपादकांनी अन्य बोलीभाषांना आत्मसात करत अथवा त्यापासून उधारी करत ऋग्वेदाची वैशिष्ट्यपूर्ण भाषा घडवली आहे. (पृ.२) मराठी ही सरळ महाराष्ट्री प्राकृताशी नाते सांगते. अन्य प्राकृत भाषांचा प्रभाव नगण्य आहे. मराठीचे ध्वनिशास्त्र गुंतागुंतीचे व अन्य आर्यभाषांपेक्षा स्वतंत्र आहे. (पृ. ४५), अनेक प्राकृत घाट संस्कृतात घुसले आहेत. संस्कृत ही स्वतंत्र भाषा नसून मिश्र भाषा आहे. (पृ. ४८) हेमचंद्र ज्यांना अपभ्रंश भाषा म्हणतो, त्या भाषांचा मराठीशी काहीही संबंध नाही, तर मराठीचा संबंध थेट प्राचीन माहाराष्ट्री प्राकृताशीच आहे. (पृ. ३०-३१) प्राकृत म्हणजेच महाराष्ट्री प्राकृत. शौरसेनी, मागधी, अर्धमागधी वगैरे अन्य प्राकृत भाषा दुय्यम आहेत. मराठीचा पाया स्थानिक वैशिष्ट्यपूर्ण प्राचीन बोलींचा आहे जो अन्य भाषांत समांतरपणे आढळत नाही. (पृ.३२) सातवाहन काळात स्थानिक प्राकृत राजभाषा व साहित्यभाषा बनली व तिला वैभव आले. भारतातील कोणतीही भाषा कोणावर लादली गेल्याचे भाषाशास्त्रीय उदाहरण मिळत नाही (पृ. ४४). मी येथे ब्लॉख यांनी दिलेली अत्यंत थोडकी उदाहरणे घेतली आहेत; पण ती मराठी भाषेच्या स्वतंत्र वास्तवावर प्रकाश टाकण्यास पुरेशी आहेत.

खुद्द ऋग्वेदात अनेक प्राकृत प्रयोग आलेले आहेत. म्हणजेच प्राकृत भाषा वेदपूर्व काळातही अस्तित्वात होत्या. किंबहुना प्राकृत आणि अवेस्तन शब्दांचेच सुलभ ध्वनीबदल करत वैदिक संस्कृत व नंतरचे संस्कृत बनले आहे. अहुरऐवजी असुर, मिथ्रऐवजी मित्र अशी अवेस्तन शब्दांचे ध्वनीबदल केल्याची असंख्य उदाहरणे देता येतील. इंद्रऐवजी इंद, वृंद ऐवजी वुंद असे मूळचे प्राकृत प्रयोग ऋग्वेदात जसेच्या तसेच राहिलेले आहेत. व्याकरणाचा पायाही प्राकृतच असल्याचे अनेक उदाहरणांवरून आढळून येते. उदा. देवासः, सत्यासः ऐवजी देवाः, सत्याः इ. खरे तर ऋग्वेदाची भाषा अवेस्तन (प्राचीन पर्शियन) आणि भारतातील स्थानिक प्राकृत यांचे मिश्रण आहे. एवढेच नव्हे तर ऋग्वेदातील ६% शब्द द्रविड व मुंड भाषेतून वैदिक छांदस भाषेत उधार घेतलेले आहेत. 'भाषांचा उगम' या माझ्या पुस्तकात मी संस्कृत भाषा इसपू पहिले शतक ते इसवी सनाचे दुसरे शतक या काळात कशी क्रमशः विकसित होत गेली हे ग्रांथिक, शिलालेखीय व नाणकशास्त्रीय पुराव्यांवरून साधार दाखवले आहे. त्या दृष्टीने संस्कृत हीच आधुनिक भाषा ठरत असून प्राचीन प्राकृत भाषांवर संस्कार करत ही नवी भाषा बनवलेली आहे; परंतु ती आधुनिक असूनही तिला अभिजात दर्जा आणि ज्यापासून ती बनली त्या महाराष्ट्री प्राकृताला व त्या भाषेची थेट वंशज असलेल्या मराठीला मात्र आजवर अभिजात दर्जा नाकारणे हे कर्मदरिद्रीपणाचेच नव्हे, तर भाषाशास्त्रीय दृष्टिकोनही नसल्याचे निदर्शक होते.

त्यामुळे संस्कृत भाषा अपभ्रंश स्वरूपात येऊन प्राकृत (पाअड) भाषा बनल्या हे इंडो-युरोपीय भाषा सिद्धांत मांडणाऱ्या या पाश्चात्त्य व एतद्देशीय संस्कृतनिष्ठ विद्वानांचे मत टिकत नाही. उलट मूळ प्राकृत शब्दांचेच उच्चारसुलभीकरण करीत संस्कृत विकसित होत गेली हे बुद्धिस्ट हायब्रीड संस्कृत ग्रंथ, शिलालेखीय ते नाण्यांवरील भाषेतून सिद्ध होते. महाराष्ट्री प्राकृतात इसपू पहिल्या शतकातील हालाचा 'गाथा सतसई' हा अनमोल काव्यसंग्रह जसा उपलब्ध आहे, तसेच त्याच काळातील

**सरहद, पुणे** आयोजित
**अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे**

**९८ वे**

**अखिल भारतीय**
**मराठी साहित्य संमेलन, दिल्ली**
**२०२५**

तरंगवइ हे पादलिप्ताचार्यांनी लिहिलेले मराठीतील आद्य महाकाव्यही प्रसिद्ध आहे. रामाच्या जीवनावरील पहिले महाकाव्य मराठीतीलच! पउमचरिय (पद्मचरित) हे ते महाकाव्य जे विमल सुरी यांनी इसवी सनाच्या पहिल्या शतकात लिहिले. मराठीचे आद्य व्याकरण तर इसपूर्व्यां तिसऱ्या शतकातील. पाअड लख्खन सुत्त हे ते व्याकरण जे इसपूच्या तिसऱ्या शतकात लिहिले गेले. याचाच अर्थ मराठी भाषा प्राचीन काळातच साहित्याची भाषा बनू लागली होती. ती बोलण्यात त्याहीपूर्वी शेकडो वर्ष असणार हे उघड आहे.

सातवाहन साम्राज्य महाराष्ट्राबाहेरही पसरले असल्याने मराठीचा प्रसार अन्यत्रही झाला. मराठी ही देशातील महत्त्वाची साहित्यभाषा बनली ते तिच्यातील शब्दसामर्थ्य आणि अंगभूत साहित्यिक गुणधर्मांमुळे. त्यामुळेच मुलाच्या मराठी नसलेल्या एका जैन लेखकाने 'अंगविज्जा' हा तत्कालीन समाजजीवनावर प्रकाश टाकणारा ग्रंथ इसवी सनाच्या पहिल्या शतकात लिहिला. हा गद्य ग्रंथ असल्याने तत्कालीन गद्य मराठीचेही व्यापक दर्शन यातून घडते. याशिवाय पाले, लोहगड, नाणेघाट येथील इसवीसनपूर्व पहिल्या शतकातील मराठीतील शिलालेखही प्रसिद्ध आहे. नाण्यांवरचा मजकूरही मराठी भाषेत आहे. सातवाहनांनी मराठीला राजभाषा बनवल्याने मराठीचा प्रगल्भ विकास व्हायला मदत झाली. या भाषेतील शब्द व व्याकरण पूर्णतया स्वतंत्र असून ते संस्कृताचा अपभ्रंश नव्हे; पण हा गैरसमज शतकानुशतके जपला गेला. कुवलयमाला या आठव्या



Scanned with OKEN Scanner

शतकातील काव्या ग्रंथाचा लेखक उद्योतन सुरी आपण मराठी भाषेची निवड का केली हे सांगताना म्हणतो, संस्कृत भाषा अनेक पद, समास, निपात, उपसर्ग, विभक्ती, लिंग, परिकल्पना, कुविकल्प इत्यादी बाबींमुळे दुर्गम दुर्जनाएवढीच विषमतेने ग्रासित असल्याने आपण हे काव्य लिहिण्यासाठी मराठी (मरहठ्ठी पाइय) भाषेची निवड केली आहे. (कुवलयमाला ७१.२) २२०० वर्षांपासून मराठी भाषेत सातत्याने साहित्याची निर्मिती होत राहिली. धार्मिक साहित्य तर अक्षरशः हजारोंच्या संख्येत आहे. एवढी साहित्य निर्मिती भारतातील इतर कोणत्याही भाषेत झालेली दिसून येत नाही. शिवाय मराठी लेखक हे प्रयोगशील असल्याने आद्य प्रवासवर्णन वासुदेवहिंडीच्या रूपात इसच्या तिसऱ्या शतकात लिहिले गेले, तर आद्य उपहासकथा धुत्ताख्खान आठव्या शतकात लिहिले गेले. मराठी भाषेचे वैभव कालौघात जसे वाढत गेले तशी ही भाषा बदलत जात आजच्या स्वरूपाला येऊन पोहोचली आहे. तरीही मराठी भाषा दुय्यम आहे आणि संस्कृत प्राचीन हा अट्टाहास सुरूच होता; पण समजा संस्कृत आधीची असती, तर या प्राकृत भाषेच्या आधीचा मूळ संस्कृतलिखित अथवा शिलालेखीय पुरावा आजही अस्तित्वात असला असता; पण अगदी वैदिक धर्माचे आश्रयदाते असलेल्या शुंग काळातील शिलालेखही स्वच्छ प्राकृतात आहेत. 'गाथा सप्तशती'चे संपादक स. आ. जोगळेकरांनाही सातवाहनांनी केलेल्या श्रौत यज्ञांचे वर्णन नाणेघाट शिलालेखात प्राकृतात कसे, हा प्रश्न पडला होता व त्यांनी या ग्रंथाच्या प्रस्तावनेत तो नमूदही केला. शुंगांच्याही अश्वमेध यज्ञाचे वर्णन प्राकृतात आहे. संस्कृत भाषा अस्तित्वात असती तर किमान यज्ञाचे उल्लेख असणारे लेख तरी संस्कृत भाषेत असते, पण तसे आढळून येत नाही. मुळात जी भाषाच अस्तित्वात नव्हती त्या संस्कृत भाषेत त्यांचे वर्णन कसे करणार? आणि मग संस्कृत शब्दांचे अपभ्रंश म्हणजे प्राकृत असा अर्थ पुराव्यांच्या अभावात कसा काढता येईल? संस्कृत भाषा व तिचे पाणिनीकृत व्याकरण गुप्तकाळात सिद्ध झाले. तिसऱ्या शतकानंतर मात्र आधी द्वैभाषिक (प्राकृत लेख व त्याचा संस्कृतमधील अनुवाद) व नंतर संस्कृत शिलालेख/ताम्रपटांचा विस्फोट झालेला दिसतो हे येथे लक्षात घ्यायला पाहिजे. असंख्य प्राकृत ग्रंथांची भाषांतरे अथवा छाया याच काळात झाल्या. गुणाढ्याच्या 'बृहत्कथे'चेच काय; पण प्राकृतप्रकाश (मूळ नाव- पाअड लख्खन सुत्त) या वररुचिकृत प्राकृत व्याकरणाचाही भामहकृत संस्कृत अनुवाद झाला. याचे कारण संस्कृत ही ग्रंथव्यवहाराची मुख्य भाषा बनली असली तरी प्राकृतातही समांतरपणे विपुल ग्रंथनिर्मिती होतच राहिली, त्यामुळे प्राकृत व्याकरणाचाही अभ्यास गरजेचा बनला.



मराठीचे आज उपलब्ध असलेले आद्य व्याकरण इसवी सनापूर्वी तिसऱ्या शतकातच लिहिले गेले, म्हणजेच मराठी भाषा त्याच काळात प्रगल्भ झालेली होती. ती बोलण्या-लिहिण्यात त्याच्याही खूप पूर्वीपासून असणार हा अंदाज आपण सहज बांधू शकतो. मराठी भाषेत रामकथेवरील विमल सुरीकृत आद्य महाकाव्य 'पउमचरीय' इसवी सनाच्या पहिल्या शतकातच लिहिले गेले. याआधीच हाल सातवाहनाने संपादित केलेली गाथा सतसई, माहाकाव्य तरंगवइचे लेखन पूर्ण झालेले होते. नंतरच्या कालखंडात लिहिले गेलेले अंगविज्जा, लिलावइ, वासुदेव हिंडी, समराइच्च कहा, महाकाव्य गौडवहोसारखे असंख्य ग्रंथ हे मराठीचे वैभव आहेत. तेराव्या शतकानंतर उदयाला आलेले संत साहित्य हे मराठी भाषेच्या विकासातील कळस आहे. जिवंत भाषेप्रमाणे आपली मराठी कालौघात विकसित होत आजच्या स्वरूपापर्यंत पोहोचली आहे. २,२०० वर्षांपूर्वीच्या सातवाहनकालीन मराठीतील असंख्य शब्द आजही आपल्या नित्य बोलण्यात असतात ही बाब भाषेच्या सातत्याचे फार मोठे लक्षण आहे.

मराठी अभिजात ठरल्याचे लाभ काय हा एक प्रश्न सातत्याने विचारला जाऊ लागला आहे. मराठी अभिजात ठरणे म्हणजे ती स्वतंत्र भाषा आहे हे अधिकृतरीत्या मान्य होणे. भाषिक न्यूनगंड हा मानवी समुदायाचे मानसिक शोषण करणारा असतो. भाषिक वर्चस्वतावादापासून सुटका होणे आणि आपली भाषा ही आपल्याच पूर्वजांची निर्मिती आहे ही जाणीव वेगळा आत्मविश्वास आणि आत्मसन्मान निर्माण करणारी असते. यामुळे केंद्र सरकार अनुदान देईल, भाषेचा अभ्यास वाढेल, मराठी भाषकांकडे तुच्छतेने पाहणे कमी होईल, अशी अपेक्षा असली, तरी शेवटी भाषा ही सामुदायिक निर्मिती असल्यामुळे मराठी भाषेचे वैभव दिगंत वाढवण्यासाठी मराठी भाषकांनाच कंबर कसावी लागणार आहे.

सध्यातरी मराठी बांधवांना भाषिक न्यूनगंडातून सुटका मिळाली. याचा आनंद साजरा करून आपली भाषा अजून कशी सशक्त होईल, आपल्या भाषेत कशी अधिकाधिक ज्ञाननिर्मिती होईल याकडे जोमाने लक्ष पुरवावे लागेल आणि शेवटी, अभिजात भाषा म्हणजे केवळ अभिजनांची भाषा नव्हे, तर जीही भाषा स्वतंत्र असते व जिच्यात किमान दीड-दोन हजार वर्षांचा निरंतर मौलिक साहित्य निर्मितीचा इतिहास असतो तीच भाषा अभिजात भाषा असते आणि मराठी भाषा या निकषांवर टिकली आहे हे सार्वकालिक सत्य आता केंद्र सरकारनेही मान्य केले आहे, हे आपल्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे.

**(लेखक हे इतिहास संशोधक आहेत.)**



Scanned with OKEN Scanner

**साहित्याची श्रेष्ठता, भाषेच्या वयाचे १५०० ते २००० वर्षांचे लिखित पुरावे, भाषेची स्वतंत्रता आणि भाषेचे मूळ रूप व आजचे रूप यांचे नाते असणे हे केंद्र शासनाने एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत निश्चित केलेले चारही निकष मराठी सहज पूर्ण करते. आपण तसे सिद्धही केले आहे. आता गरज आहे ती लोकअभियानाची.**

# मराठी अभिजातच

**भूषण गगराणी**

मराठी ही लोकभाषा, राजभाषा, ज्ञानभाषा आणि महानुभावांची धर्मभाषा आहे. कोणताही माणूस मातृभाषेतून विचार करतो. मातृभाषा ही एक प्रकारे माणसाच्या अस्तित्वाला विचारांचा प्राणवायू पुरवत असते. ते त्याचे ओळखपत्र असते. मातृभाषा ही माणसाची अस्मिता आणि अस्तित्वखूण असते. साहित्याची श्रेष्ठता, भाषेच्या वयाचे १५०० ते २००० वर्षांचे लिखित पुरावे, भाषेची स्वतंत्रता आणि भाषेचे मूळ रूप व आजचे रूप यांचे नाते असणे हे केंद्र शासनाने एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत निश्चित केलेले चारही निकष मराठी सहज पूर्ण करते. आपण तसे सिद्धही केले आहे. आता गरज आहे ती लोक अभियानाची. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी गेली चौदा वर्षे आपण अहोरात्र झटत आहोत. डॉ. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेला अभिजात मराठी भाषेचा अहवाल केंद्र सरकारने नेमलेल्या भाषातज्ज्ञांनी सर्वानुमते मंजूर केला, त्याला ७ वर्षे उलटून गेली.




## मराठी जगणारच

अभिजात मराठी भाषा म्हणजे श्रेष्ठ मराठी भाषा. ज्या भाषेतले साहित्य श्रेष्ठ दर्जाचे असते तिला अभिजात दर्जा मिळतो. मराठी 'अमृतातेंही पैजां जिंकणारी असल्याची' ग्वाही संत ज्ञानेश्वर देऊन गेलेत. जगातील सर्व भाषा मेल्या आणि अवघ्या चार जगल्या तरी मराठी जगणार आहे. स्वत:चे राज्य आणि श्रेष्ठ साहित्य असलेली मराठी ही जगातली चौथ्या क्रमांकाची राज्यभाषा आहे. मराठीतले कोशवाङ्मय तर जगातले दुसऱ्या क्रमांकाचे कोशवाङ्मय आहे.

१७ वर्षांपूर्वी तमीळ भाषेला अभिजात दर्जा दिला गेला. त्यानंतर संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम आणि उडिया यांनाही तो मिळाला. मराठीला हा दर्जा द्यावा अशी साहित्य अकादमीने एकमताने केलेली लेखी शिफारस भारत सरकारने गेली ७ वर्ष दुर्लक्षित केली आहे. त्यामुळे मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, शिक्षण हे सारेच विषय मागे गेले आहेत. मराठी भाषेचे स्वतंत्र विद्यापीठ, मराठीचे २५ वर्षांचे धोरण, सांस्कृतिक धोरण आणि अभिजात दर्जा या बाबतीत तडजोड होता कामा नये.

## समृद्ध मराठी

१९०७ मध्ये ग्रियर्सनने भारतीय भाषांचे सखोल सर्वेक्षण केले. तो म्हणतो की, जी भाषा रोजगार देते तिच जगते. जी भाषा रोजगारक्षम नसते ती मरते, नष्ट होते.



Scanned with OKEN Scanner

बोलीभाषांची विविधता हे मराठीचे खरे वैभव असून मराठीच्या ५२ बोलीभाषा आहेत. त्याचा आपण अभिमान बाळगला पाहिजे. जिला जास्त ओढे ती नदी मोठी, याच न्यायाने मराठीला रसद पुरवणाऱ्या या सर्व बोली महत्त्वाच्या आहेत. या सर्वच बोलीभाषांतील साहित्य खूप सकस आहे. बहिणाबाई, उद्धव शेळके, शांता शेळके, भुजंग मेश्राम, सदानंद देशमुख, व्यंकटेश माडगूळकर, राम नगरकर, आनंद विंगकर, राजन गवस, मच्छिंद्र कांबळी, प्र.ई. सोनकांबळे, बा. भ. बोरकर, बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ आदींमुळेच मराठी समृद्ध झालेली आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, मुक्ताबाई, सावता महाराज, एकनाथ, तुकाराम, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, जी. ए. कुलकर्णी, बा. सी. मर्ढेकर, भालचंद्र नेमाडे, वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, दुर्गा भागवत, पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, भाऊ पाध्ये, अरुण कोलटकर, महेश एलकुंचवार, रंगनाथ पठारे अशा अनेकांमुळे मराठी समृद्ध झालेली आहे. दलित साहित्याने मराठीला सामाजिक दस्तऐवज देऊन तिला खूप श्रीमंत केलेले आहे. इरावती कर्वे, नरहर कुरुंदकर, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, राजारामशास्त्री भागवत, प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे, विठ्ठल रामजी शिंदे, त्र्यंबक शंकर शेजवलकर, गणेश देवी, रामचंद्र चिंतामण ढेरे, सदानंद मोरे, दिलीप चित्रे, कमल देसाई, मालती बेडेकर, शरद पाटील, अरुण साधू, गंगाधर गाडगीळ, आ. ह. साळुंखे यांचे लेखन श्रेष्ठ प्रतीचे आहे. तसेच शाहीर होनाजी बाळा, विष्णुशास्त्री चिपळूणकर, ह. ना. आपटे, वि. दा. सावरकर, आचार्य अत्रे, चिं. वि. जोशी, वि. का. राजवाडे, दया पवार, ऊर्मिला पवार यांचाही उल्लेख आपणास करावयास हवा.

एक होता कावळा नि एक होती चिमणी.. ही प्रत्येक मराठी घरात आजही सांगितली जाणारी गोष्ट आहे. ती पहिल्यांदा ग्रंथात लिहिली गेली ८०० वर्षांपूर्वी. लीळाचरित्रात धानाई नावाच्या हट्टी मुलीला श्रीचक्रधरांनी ती सांगितली असली तरी ती त्याआधी हजार-बाराशे वर्षे मराठी लोकजीवनात सांगितली जात होती. ती विलक्षण लोकप्रिय होती.

## खरी जिवंत भाषा

महाराष्ट्री प्राकृत किंवा महारठ्ठी या नावाने दोन-अडीच हजार वर्षांपूर्वी प्रचलित, लोकप्रिय व मान्यताप्राप्त असलेली भाषा ही संस्कृतपेक्षाही जुनी असल्याचे म. म. राजारामशास्त्री भागवत (विदुषी दुर्गा भागवत यांचे आजोबा) यांनी १८८५ मध्येच दाखवून दिले होते. 'मराठ्यासंबंधी चार उद्‌गार' हा त्यांचा ग्रंथ जिज्ञासूंनी अवश्य वाचावा. त्यांचा 'मराठीची विचिकित्सा' हा ग्रंथही महत्त्वाचा आहे.

राजारामशास्त्री भागवतांच्या संशोधनाचा निष्कर्ष सांगताना दुर्गा भागवतांनी म्हटले आहे की, जुनी महाराष्ट्री संस्कृतपेक्षा जुनी व खरी जिवंत भाषा आहे हे त्यांनी दाखवले आहे. मराठी संस्कृतोद्‌भव नाही. ती संस्कृतपेक्षा जुनी भाषा आहे. नात्याने ती संस्कृतची मावशी आहे. १९२७ मध्ये



ज्ञानकोशकार केतकर यांनी प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास दोन खंडांत लिहिला. त्यात त्यांनी मराठीचे वय किमान अडीच हजार वर्ष असल्याचे पुराव्यानिशी दाखवून दिले आहे. १९३२ मध्ये पांगारकरांनी दाखवून दिलेले आहे की, महाराष्ट्री, महारठ्ठी, मऱ्हाठी, मराठी या वेगळ्या भाषा नसून ती एकाच भाषेची प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन रूपे आहेत.

गाथा सप्तशतीतील मराठी महाराष्ट्री प्राकृत या नावाने ओळखले गेली. हरिभद्र, भद्रबाहू, उद्योतन सुरी आदीचे लेखन आणि चक्रधर, चोखा, चोंभा, बखरकार ते फुले-आंबेडकर, अण्णाभाऊ, लोकहितवादी, आगरकर, रानडे, टिळक, विष्णुभट गोडसे, लक्ष्मीबाई टिळक, विश्राम बेडेकर, हमीद दलवाई, फादर स्टिफन्स यांच्या साहित्याची महत्ता आणि त्यांचे जैविक नाते महत्त्वाचे आहे.

मराठीतला आज उपलब्ध असलेला पहिला ग्रंथ आहे, गाहा सत्तसई (गाथा सप्तशती). गाथा म्हणजे कविता. सातशे लोककवितांचा संग्रह म्हणजे हा ग्रंथ होय. पैठणच्या हाल या सातवाहन राजाने सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी पन्नास कवींच्या या कविता संकलित केल्या. सातवाहनांची राजभाषा मराठी असल्याने त्यांचे जिथे-जिथे राज्य होते तिथे-तिथे या ग्रंथाची हस्तलिखिते मिळालेली आहेत. सातवाहनांचे संपूर्ण भारतावर तर राज्य होतेच. शिवाय पार अफगाणिस्तानपर्यंत राजभाषा मराठीची पताका फडकत होती.

## संगम साहित्यात मराठी

तमीळ भाषेला अभिजात दर्जा मिळण्यात 'संगम साहित्याचा' मोठा वाटा आहे. हे साहित्य २३०० ते २६०० वर्ष जुने आहे. कावेरी नदीवर धरण बांधले जात असल्याचा प्रसंग त्यात आला आहे. या धरणाच्या कामासाठी जगभरातून तज्ज्ञ मागवण्यात आलेले होते. महाराष्ट्रातील मराठी गवंडी मोठे कुशल असल्याचे वर्णन त्यात आले आहे. ते आपापसात मराठीतून बोलत असत.

इसवीसनाच्या दुसऱ्या शतकात वररुचीने 'प्राकृतप्रकाश' हा व्याकरण ग्रंथ लिहिला. त्यात त्याने शौरसेनी, मागधी, पैशाची व महाराष्ट्री या प्राकृत भाषांचे व्याकरण सिद्ध केले. आधीचे सगळे नियम सांगून झाल्यानंतर शेवटचा नियम सांगताना तो म्हणतो, शेषं महाराष्ट्रीवत. यावरून देशाच्या वेगवेगळ्या भागात प्रचलित असलेल्या सगळ्या भाषांना मराठीचे नियम लागू पडत होते. यातून मराठीची प्रतिष्ठा, मान्यता आणि श्रेष्ठता स्पष्ट होते.

संस्कृत महाकवी कालिदास आणि शूद्रक यांच्या 'शाकुंतल' आणि 'मृच्छकटिक' या नाटकांमध्ये अनेक संवाद मराठीत आहेत. महाभारत या जगप्रसिद्ध महाकाव्यात अनेक मराठी शब्द आलेले आहेत. यज्ञाच्या वेळी पंडितांना मराठीत बोलायला बंदी घालण्यात आल्याची नोंद श्री. भागवत यांनी दाखवून दिलेली आहे. संस्कृती ही धर्मभाषा असली तरी हे पंडित खासगीत मराठीत बोलत असत हे यातून उघड होते. संत



Scanned with OKEN Scanner

एकनाथांनी संस्कृत वाणी देवे केली मग प्राकृत काय चोरापासोनी झाली? असे संतप्त उद्‌गार काढले होते. 'विंचू चावला... या भारुडाची मराठी आजची अस्सल मराठी असूनही ते तिला प्राकृत म्हणतात कारण महाराष्ट्री प्राकृत हीच मराठी आहे. रघुनाथराव गोडबोले यांनी १८६३ साली प्रकाशित केलेल्या मराठी शब्दकोशाला 'महाराष्ट्रीय भाषेचा कोश' म्हटले आहे, ते यामुळेच.

जुन्या काळात धर्मग्रंथांची भाषा होती संस्कृत, पण तिचा जन्म झाला वैदिक भाषेपासून आणि वैदिकची आई होती वैदिकपूर्व बोली भाषा. हॉर्वर्ड विद्यापीठाचे डॉ. मायकेल विट्झेल यांनी आपल्या 'ट्रेसिंग दि वैदिक डायलेक्ट्स' या ग्रंथात हे दाखवून दिले आहे. तेव्हा संस्कृत ही सर्व भाषांची जननी होती हा प्रचार खरा नाही. पाणिनीने जेव्हा या भाषेचे व्याकरण लिहिले तेव्हा तो तिला 'छंद' भाषा म्हणतो.

मूल लहान असताना, रांगत असताना पीएच.डी. करू शकेल का? नाही. मग कोणतीही भाषा बालवयातच ज्ञानेश्वरी, लीळाचरित्र आणि विवेकसिंधू यांसारखे जागतिक दर्जाचे श्रेष्ठ ग्रंथ कसे प्रसवू शकेल? आठशे वर्षांपूर्वी मराठीत हे ग्रंथ लिहिले गेले तेव्हा मराठी बालभाषा नव्हती, तर ती एक परिपक्व झालेली समृद्ध भाषा होती. संत ज्ञानेश्वर मराठीची गोडी अमृताहूनही जास्त असल्याचे प्रतिपादन कोणाला उद्देशून करत होते? संस्कृतलाच ना? ज्ञाननिर्मिती, साहित्य, विचार, तत्त्वज्ञान आणि संस्कृती यांची त्या आधीची फार मोठी परंपरा मराठीला होती. गाथा सप्तशती, पादलिप्त, हरिभद्राची 'समरादित्याची कथा', उद्योतन सुरीची कुवलयमाला, चक्रधरांचे लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, एकनाथांची भारुडे, माझा प्रवास, गावगाडा, धग, कोसला, बनगरवाडी, बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर, गोलपिठा, शांतता कोर्ट चालू आहे हे ग्रंथ इतके चिरेबंदी आहेत की, मराठीची श्रेष्ठता स्वयंस्पष्ट आहे.

## आम्ही आग्रही

आम्ही सर्वच भाषांचा आदर करतो. ज्यांना कोणाला इंग्रजी, हिंदी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगू, सिंधी, उर्दू, बंगाली अशा कोणत्याही भाषेच्या माध्यमातून कोणत्याही बोर्डाच्या शाळेतून शिकायचे वा बोलायचे, लिहायचे असेल त्यांना आम्ही अडवत नाही. कारण आमचा इतर कोणत्याही भाषेला विरोध नाही. मराठीसाठी मात्र आम्ही आग्रही आहोत. आपण दक्षिण भारतात गेलो की तिथली सगळी माणसे त्यांच्या मातृभाषेबद्दल आग्रही असलेली दिसतात. तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम हे सगळेच लोक आपापल्या मातृभाषेचा अभिमान बाळगतात. या बहुतेक सर्व राज्यांनी शिक्षण, साहित्य, संस्कृती, कला आदी क्षेत्रात फार मोठी भरारी घेतलेली आहे. मानव विकास निर्देशांकात ही राज्ये पुढे आहेत. हे सारे आपले शेजारी असून आपण त्यांच्याकडून मातृभाषाप्रेम शिकायला हवे. तिथल्या सरकारांनी स्थानिक भाषेच्या सक्तीबाबत अतिशय कडक पावले उचललेली आहेत.

मराठीला अभिजात दर्जा मिळणे म्हणजे मराठीच्या जागतिक प्रतिष्ठेवर शिक्कामोर्तब होणे. त्यामुळे मराठी माणसाचा न्यूनगंड कमी होईल. मराठी शिकवण्याची सोय देशातील ४५० विद्यापीठांमध्ये होईल. मराठीच्या समग्र विकासासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी अनुदान मिळेल. मराठी शाळा, शिक्षण, शिक्षक यांची दर्जावाढ; वाचन संस्कृती वाढणे; ग्रंथालये संवर्धित केली जाणे; मराठी पुस्तके स्वस्तात मिळणे; मराठी मुलामुलींना अधिकाधिक रोजगार मिळणे या सगळ्यामुळे मराठीचा दर्जा आणखी सुधारण्यास खूप मदत होईल. विशेषतः बृहन्महाराष्ट्रात मराठीच्या संवर्धनाला यातून अर्थबळ पुरवता येईल. मराठीचे गोमटे व्हायला अभिजात दर्जा गती देईल. त्यामुळे मराठीचा हा सन्मान महत्त्वाचा आहे.

## जनचळवळ

मा. मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना समक्ष भेटून मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याबाबत मागणी केलेली आहे. नाशिक येथे झालेल्या ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषा विभागाच्या वतीने अभिजात मराठीची माहिती देणारे देखणे प्रदर्शन उभे केले होते.

**सरहद, पुणे** आयोजित
**अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे**
**९८ वे**
**अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली**
**२०२५**

त्याला हजारो रसिकांनी भेट देऊन मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी राष्ट्रपती महोदयांना वैयक्तिक पत्रांद्वारे विनंती केली. 'शांतता मराठीचं कोर्ट चालू आहे' ह्या लघुपटाला हजारो मराठीजनांनी उचलून धरले. प्रदर्शनास भेट देणाऱ्या मराठी जनांनी आपापल्या भ्रमणध्वनीवरून क्यूआर कोड स्कॅन करून मराठीला अभिजात दर्जा मिळावा, या विषयावरील याचिकेवर सह्या केलेल्या आहेत. महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन, २०२२ दरम्यान विधानमंडळाच्या प्रवेशद्वारासमोर २२ डिसेंबर २०२१ ते २८ डिसेंबर २०२१ या कालावधीत अभिजात मराठी भाषा दालन उभारण्यात आले. तसेच 'शांतता मराठीचं कोर्ट चालू आहे' या लघुपटाचे सादरीकरणही करण्यात आले. या कालावधीतदेखील रसिकांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी राष्ट्रपती महोदयांना वैयक्तिक पत्रांद्वारे विनंती केली आहे. २९ डिसेंबर २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ या कालावधील अभिजात मराठी भाषेचे हे दालन सर्वांसाठी खुले करण्यात आले. तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने २०२२ वर्षाची दिनदर्शिका अभिजात मराठी भाषा या विषयाच्या अनुषंगाने तयार करण्यात आली आहे. या दिनदर्शिकेद्वारे अभिजात मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा लवकरात लवकर मिळावा याकरिता सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.

(लोकराज्य फेब्रुवारी २०२२ मधून पुनर्मुद्रित)




Scanned with OKEN Scanner

मराठी भाषा सल्लागार समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्याचा शासन प्रयत्न करणार असल्याची घोषणा केली. त्याबाबतच्या चर्चेत या संदर्भातील पुढील निकषांकडे लक्ष वेधले गेले.

# मराठी अभिजात कशी ?

प्रा. हरी नरके

High antiquity of its Early texts/ recorded history Over period of 1500-2000 years, A body of ancient literature test, which is considered a valuable her-itage by generations of speakers. The literary tradition be onginal and not borrowed from another speech community The classical language and literature being datinct from modern there may be a discontinuity between the classical language and its later forms of its off-shoots. मराठी ही जगातील १० व्या क्रमाकांची भाषा असली तरी तिचा जन्म २००० वर्षांपूर्वीचा नसल्याने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळू शकत नसल्याचा मुद्दा पुढे आला. मराठी भाषेचा जन्म नेमका केव्हा झाला, याबाबत कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी, संचालक- मराठी संशोधन मंदिर, यांचा 'मराठी भाषा उद्गम व विकास' हा १९३३ साली प्रकाशित झालेला ग्रंथ अतिशय मोलाचा समजला जातो. त्यात ते म्हणतात, सर्व प्राकृत भाषा, अपभ्रंश व संस्कृत या भाषांनी आपापल्या परीने मराठीस जन्माला आणण्यास हातभार लावलेला दिसतो. निरनिराळ्या प्राकृतभाषा बोलणारे निरनिराळे समाज निरनिराळ्या काळी वरून आर्यावर्तातून अनेक कारणांमुळे महाराष्ट्रात उतरले आणि तेथे स्थायिक झाले. त्यांच्या संमिश्र बोलण्यानेच मराठी भाषा बनली. महाराष्ट्र देश ज्याप्रमाणे गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, अश्मक, कुंतल, विदर्भ, कोकण इत्यादी लहान लहान देशविशेषांचा मिळून बनला व महाराष्ट्राची लोकवसाहत ज्याप्रमाणे निरनिराळ्या लोकघटकांनी मिळून झाली, त्याचप्रमाणे मराठी भाषा ही निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या विशेषतः माहाराष्ट्री व अपभ्रंश यांच्या मिश्रणाने बनली. महाराष्ट्र देश, मराठा समाज व मराठी भाषा यांची घटना वर दिलेल्या रितीने ख्रिस्तोत्तर ६००-७०० च्या सुमारास




झाली. (पृ. १६८) कु. पां. कुलकर्णी यांनी आपल्या ४९६ पृष्ठांच्या या शोधग्रंथात या विषयाचा सांगोपांग वेध घेतला आहे. विषयाचे सर्व पैलू मांडण्यासाठी त्यांनी या संदर्भातील तज्ज्ञांच्या ३२ मौलिक संदर्भ ग्रंथांचा वापर केलेला आहे. कुलकर्णींच्या मते मराठी भाषेचे वयोमान १३००-१४०० वर्षांचे ठरते. असे असेल तर मग मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळू शकणार नाही, याबाबत (१) डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर लिखित 'प्राचीन महाराष्ट्र' 'खंड १ व २ (२) हाल सातवाहनाची 'गाथा सत्पशती' संपादक, स. आ. जोगळेकर (३) गुणाढ्याचे 'बृहत्कथा' हे व राजारामशास्त्री भागवत, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, वि. का. राजवाडे, वि. ल. भावे, रा. भी. जोशी आदींचे ग्रंथ तपासून काय चित्र समोर येते त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करू या. 'कथासरित्सागर' या महाग्रंथाचे मराठी भाषांतर ह. अ. भावे यांनी केले असून, त्याच्या पाचही खंडांना ख्यातनाम विदुषी दुर्गा भागवत यांच्या पाच प्रदीर्घ आणि विवेचक प्रस्तावना आहेत, त्या प्रस्तावनेत म्हणतात, गुणाढ्याच्या बृहत्कथेची तुलना रामायण आणि महाभारताशी करण्यात येते. प्राचीन भारतातल्या साहित्याचा एक विशेष असा आहे की, पुष्कळ ग्रंथ लुप्त झाले आहेत आणि असंख्य ग्रंथ केवळ खंडावस्थेत आढळतात. अशा विलुप्त ग्रंथांत गुण्याढ्याच्या बृहत्कथेचा समावेश होतो. बृहत्कथेसंबंधी अनेक संदर्भ जुन्या ग्रंथात आढळून येतील. बृहत्कथेचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध असलेले ग्रंथ संस्कृतात व प्राकृतात आहेत. हे ग्रंथ जीव शैव व वैष्णव मतातून निघालेले आहेत आणि जैन मतातलाही ग्रंथ उपलब्ध आहे. तेव्हा भिन्न परंपरांना मान्य असलेला बृहत्कथा हा एक प्राचीन लोकप्रिय ग्रंथ होता यात संशय नाही.


बृहत्कदेशी प्रत्यक्ष संबंध असलेले ग्रंथ दोन आहेत. ते दोन्ही काश्मीरचे असून, अकराव्या शतकात उपलब्ध झालेले आहेत. दोहोंची भाषा संस्कृत व मते शैव आहेत. पहिला जागतिक ख्याती पावलेला ग्रंथ हा सोमदेवाचा 'कथासरित्सागर' आणि दुसरा क्षेमेद्रांची 'बृहत्कथा मंजिरी' हे दोन्ही ग्रंथ



Scanned with OKEN Scanner

श्लोकबद्ध असून, ते वृत्त अनुष्टुभ आहे. कथासरित्सागरची भाषांतरे युरोपीय भाषांमध्येही उपलब्ध आहेत, परंतु 'बृहत्कथा मंजरी'चे इंग्रजीत एकच व तेही काही भागांचेच भाषांतर झालेले आहे. अकराव्या शतकात सोमदेव शर्मा या काश्मीरचा राजा अनंत याच्या पदरी असलेल्या कवी पंडिताने अनंत राजाची राणी सूर्यवती हिला रिझवण्यासाठी पैशाची भाषेत त्याकाळी उपलब्ध असलेल्या बृहत्कथेवरून संस्कृतात कथासरित्सागराची रचना केली. आपण हा ग्रंथ गुणाढ्याच्या बृहत्कथेवरून रचला आहे ही गोष्ट सोमदेवाने ग्रंथारंभीच सांगून गुणाढ्याचे चरित्रही सांगितले आहे, असे दुर्गा भागवत म्हणतात.

डॉ. श्री. व्यं. केतकर या ग्रंथाबाबत आपल्या 'प्राचीन महाराष्ट्र' या ग्रंथात म्हणतात, पैशाचीतील मुख्य विद्युत विश्रुत ग्रंथ म्हटला म्हणजे बृहत्कथा होय. तो कुरू युद्धोत्तर इतिहासाचा संरक्षक आणि त्याबरोबरच इतिहास विपर्यासाचा संरक्षक आहे. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथात बृहत्कथेपासून इतिहास निष्कर्षणाचा पद्धतशीर प्रयत्न केलेला आढळेल. ऐतिहासिक कथासूत्राच्या शोधाच्या अनुषंगाने अनेक प्रश्न विवेचनास घेतले गेले आहेत. त्यापैकी एक प्रश्न म्हटला म्हणजे बृहत्कथेच्या कालासंबंधीचा होय. बृहत्कथा अखिल भारतीय कथांचा संग्रह असल्यामुळे आणि त्यामध्ये प्रतिष्ठान कथा व दक्षिणापथ कथा, कुंडीनपूर कथा येत असल्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासास त्या संग्रहाचा उपयोग करणे प्राप्त झाले. हा संग्रह तयार करण्यात वररुचीचा हात असल्यामुळे आणि वररुची हा महाराष्ट्राच्या भाषेचा आद्य वय्याकरण असल्यामुळे वररुचीविषयक अधिक विधाने करणे प्राप्त झाले... वररुचीची माहाराष्ट्री बुद्धपूर्व आहे आणि वररुचीचे व्याकरण पाली किंवा अर्धमागधी या भाषांच्या उदयापूर्वीचे आहे, असे आमचे मत आहे. आणि पैशाची भाषेचे प्रामुख्य ज्या काळात होते तो काळ वररुचीच्या व्याकरणाने दिग्दर्शित होत आहे. वररुचीच्या काळापूर्वी काही पिढ्या पैशाची ही वाङ्मयाची भाषा होती. त्या काळात माहाराष्ट्री भाषा प्रगल्भ झाली होती आणि प्राकृत भाषांत तीच प्रमुख होती हे स्पष्ट आहे. हा प्रगल्भतेचा काळ अर्थात वररुचीच्या पूर्वी दोनतीनशे वर्षे इतका तरी होता असे म्हणण्यास हरकत नाही... त्यावरून 'प्राकृत प्रकाशा'च्या उत्पत्तीच्या काळी चारही प्राकृत भाषांचे व्याकरण असणे आणि 'महाराष्ट्र' हा शब्दही अस्तित्वात असणे हे पूर्ण संभवनीय वाटते. एवंच महाराष्ट्राच्या इतिहासाचा एक मोठा उजेडाचा कालविभाग म्हटला म्हणजे वररुचीचा व पाणिनीचा काल होय. या वररुचीचे अस्तित्व पाणिनीच्या कालाहून दूर नसावे आणि वररुची व पाणिनी हे दोघेही जवळजवळ समकालीन असल्यामुळे ते दोघेही एका गुरूचेच शिष्य होते ही कल्पना उद्धृत होऊन आणि विद्वान वर्गाच्या आख्यायिका संग्रहात शिरून ती कथापीठ लंबकात समाविष्ट झाली असावी. कथापीठलंबक रचनेचा काल मौर्य राज्याच्या प्रारंभाचा असावा, असे आमचे मत आहे. (पृ ११,१२) ते पुढे म्हणतात, महाराष्ट्र हा शब्द व भाषा वररुचीच्या काळी होती आणि वररुचीच्या काली ही भाषा संवर्धित झाली होती आणि वररुचीचा काल ख्रिस्तपूर्व ८०० पासून ६०० पर्यंत केव्हातरी असा धरला, तर महाराष्ट्राची स्वतंत्र भाषा अगोदर दोनतीनशे वर्षे तरी विकसित होत असली पाहिजे म्हणजे ख्रिस्तपूर्व पहिल्या सहस्रकांच्या पूर्वीच म्हणजे ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात महाराष्ट्राचा आद्यविकासाचा काल जातो आणि या भाषेच्या नावास कारण झालेले जे महार आणि रठ्ठ यांचे एकराष्ट्रीकरण जे ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात झाले असावे असे दिसते. अश्मक राजा कुरू युद्धात पडला आणि कुरू युद्धापासून अश्मकांचे सातत्य आहे, तर महार आणि रठ्ठ यांचे एकराष्ट्रीकरण




**सरहद, पुणे** आयोजित
**अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे**
**९८ वे**
**अखिल भारतीय**
**मराठी साहित्य संमेलन, दिल्ली**
**२०२५**

आणि अश्मक राजाचे सातत्य याची संगती लावण्याचा प्रयत्न अवश्य होतो.


अश्मक राज्य सुरू होण्यापूर्वीच महारांच्या देशात रठ्ठांचा प्रसार होऊन महाराष्ट्र बनले असावे आणि त्यांच्या संयुक्त जनतेत अश्मक राजकुल उत्पन्न झाले असावे असाच इतिहास असावा असे दिसते. (पृ.१३)

डॉ. केतकर हालांच्या सप्तशतीबद्दल म्हणतात, महाराष्ट्रातील अत्यंत प्राचीन वाङ्मय म्हणजे हालांची सप्तशती होय, तीवरून असे दिसते की, त्या वेळेस प्रमुख जानपद हलिक होते. गोदातट आणि विंध्य पर्वत हे दोन्ही प्रदेश वाङ्मयात येत होते. भाषेला नाव प्राकृत हेच अधिक प्रिय होते. (पृ.२९) केतकरांचे अनुमान आहे की, शातवाहनांच्या काळात अपभ्रंश भाषेचा उदय झाला असेल, कारण शातवाहनांच्या काळी अपभ्रंशाचे अस्तित्व होते अशी साक्ष बृहत्कथा देते. 'राजारामशास्त्री भागवत यांचे निवडक साहित्य' दुर्गा भागवत यांनी संपादित केले असून, त्याचा पहिला खंड मऱ्हाठ्यासंबंधाने चार उद्‌गार हा या विषयावर महत्त्वाचा प्रकाशझोत टाकतो. राजारामशास्त्री भागवत म्हणतात, महाराष्ट्र हा शब्द बराच जुनाट आहे. नंदाचे राज्य मगध देशावर असता म्हणजे शालिवाहन शकाचे पूर्वी सुमारे सव्वा चारशे वर्षे, वररुची नावाचा विद्वान झाला. त्याने 'प्राकृत प्रकाश' नावाचे प्राकृत भाषेचे म्हणजे संस्कृत नाटकातील बालभाषेचे व्याकरण केले आहे. त्या व्याकरणाचे अगदी शेवटचे सूत्र 'शेष माहाराष्ट्रीवत' हे होय. अशोकाने महाराष्ट्र देशात धर्मोपदेश



Scanned with OKEN Scanner

करण्यासाठी काही बौद्ध भिक्षुस पाठवले, अशी बौद्ध लोकांतही दंतकथा आहे. नंदाच्या नंतर चंद्रगुप्ताने राज्य केले. चंद्रगुप्ताच्या पाठीमागे त्याचा मुलगा बिंदुसार गादीवर बसला व बिंदुसाराच्या मागून त्याचा मुलगा प्रियदर्शी किंवा अशोक यांस गादी मिळाली. तेव्हा चांगला बावीसशे वर्षांचा 'मरहट्ठ' किंवा 'महाराष्ट्र' शब्द आहे असे म्हणण्यास हरकत नाही. (पृ. ७ व ८) ते पुढे म्हणतात, बाकी सर्व मऱ्हाटी भाषेप्रमाणे शौरसेनी भाषेचे नियम आहेत असे समजावे. हा सूत्राचा अर्थ ज्यास आपण बालभाषा म्हणतो त्यात पूर्वीच्या काळी शौरसेनीही होती. शूरसेना म्हणजे मथुरामंडळ या प्रांताची जी पूर्वीची भाषा शौरसेनी. उंच जातीच्या व कुलीन बायका जी भाषा प्राचीन काळी नाटकात बोलत ती हीच, 'शौरसेनी' नाटक म्हटले म्हणजे लोकस्थितीचे हुबेहुब चित्र होय. तेव्हा संस्कृतात नाटके ज्यावेळी होऊ लागली त्यावेळी कुलीन व वरिष्ठ जातींच्या बायकांची भाषा 'शौरसेनी' होती, याविषयी काही संशय नको. या 'शौरसेनी' भाषेची एक प्रकृती जशी संस्कृत तशीच दुसरी प्रकृती माहाराष्ट्री ऊर्फ अतिप्राचीन मऱ्हाठी, असे कात्यायन म्हणतो. शौरसेनीपासून मागधी व पैशाची नावाच्या बालभाषा निघाल्या. मगध म्हणजे गयेच्या व पाटणाच्या आसपासचा मुलूख या देशाची जी पूर्वीची भाषा ती मागधी, पंजाब वगैरे प्रांतातील राहणाऱ्या लोकांचे 'पिशाच' हे प्राचीन नाव दिसते. बाल्हिक म्हणजे बल्क, बुखारा व समरकंद वगैरे ठिकाणचे लोक सर्व पिशाचांची संतती, असे कर्णपर्वात लिहिले आहे. या लोकांची पूर्वीची भाषा पैशाची. शौरसेनीपासून मागधी व पैशाची नावाच्या निघाल्या व शौरसेनेची प्रकृती जशी संस्कृत तशीच मऱ्हाठी असे कात्यायन म्हणतो. तर मग सर्व बालभाषांचे मूळ प्राचीन मराठी असा सिद्धान्त केल्यास काहीच प्रत्यवाय नाही. 'गाथांची भाषा महाराष्ट्री' असे अलंकारिक म्हणतात. गाथा शब्द आलेला 'गै' धातूपासून. 'गाथा' शब्दाने प्रायः आर्या किंवा गीति संस्कृतात समजली जाते. या अलंकारिकांच्या नियमावरून गाण्याची भाषा प्राचीन काळी 'माहाराष्ट्रीयच' होती असे म्हणावे लागते. तेव्हा सर्व बालभाषांची प्रकृती व गाणी प्राचीन काळची ज्या भाषेत, अशी एक प्राचीन 'मऱ्हाठी' भाषा होय. शौरसेनीची प्रकृती कृत हे तर कात्यायनाने प्रकरणाच्या आरंभीच सांगितले आहे. असे असता अखेरीस 'शेष माहाराष्ट्रीवत' असे कात्यायन पुनः म्हणतो, त्यापक्षी 'महाराष्ट्री' व संस्कृत या दोहोंची परस्परनिरपेक्षता त्यास इष्ट होती असे दिसते. मूळचा शब्द पाहू गेले असता 'पाअड' होय. 'पाअड' शब्दाच्या जवळजवळ संस्कृतात 'प्रकट' हा शब्द येतो. 'पाअड' भाषा प्रकट' भाषा. म्हणजे अर्थात सर्व लोकांचा व्यवहार व दळणवळण जीत चालते ती. संस्कृत भाषा पडली धर्माची, अर्थात धर्मप्रसार करणे ज्यांच्या




हातात असल्या ब्राह्मणांची. ती काही सर्वसाधारण भाषा नव्हती. पण, पाअड भाषा पडली वाहत्या पाण्याप्रमाणे. ते सर्वांचे जीवन तेव्हा सर्वांचाच संबंध तिच्याबरोबर. सहजच तीस 'पाअड' म्हणजे सर्वांस समजण्यासारखी असे अन्वर्थक नाव मिळाले, व धर्मभाषेचे 'संस्कृत' म्हणजे थोड्याशा दान ब्राह्मणांनी मिळून आपल्या बुद्धीप्रभावाने 'तकतकी आणलेली' असे ब्राह्मणांनीच नाव पाडले. काही काळाने 'संस्कृत' या शब्दाबरोबर मेळ दिसावा म्हणून 'पाअड' शब्दाचे प्रकट रूप न करता 'प्राकृत' असे रूपांतर केलेले दिसते. त्यामुळे प्राकृत हा शब्द संस्कृतात दररोज पाहण्यात येणारे, अर्थात 'क्षुल्लक' या अर्थाचा वाचक झाला. 'शिक्षा' म्हणून वेदाचे एक अंग आहे. त्यात 'प्राकृते संस्कृते चापि' (प्राकृत भाषेत व संस्कृत भाषेत) असा लेख आला आहे. त्यापक्षी प्राचीन काळीही 'प्राकृत' ही स्वतंत्र भाषा समजण्याचा संप्रदाय पुष्कळ दिवसांपासून होता हे उघड होय. तेव्हा 'माहाराष्ट्री', शौरसेनी, मागधी व पैशाची या सर्व जितक्या 'पाअड' भाषा होत्या तितक्या 'प्राकृत' झाल्या व या प्राकृत भाषांचे 'प्राकृतप्रकाश' नावाचे सूत्रमय व्याकरण कात्यायनाने पहिल्याने लिहिले. वर लिहिलेल्या पाचही भाषा 'पाअड' भाषा इतकेच की सर्वांत प्राचीन व सर्वांची प्रकृती 'माहाराष्ट्री' ऊर्फ प्राचीन मऱ्हाठी. महाराष्ट्रीपासून निघाली शौरसेनी व शौरसेनीपासून कालांतराने मागधी व पैशाची या दोन भाषा निघाल्या. तेव्हा मागधी व पैशाची ही दोन्ही प्राचीन मराठीची नातवंडे होत, शौरसेनीची खरी आई म्हटले म्हणजे एकटी प्राचीन मऱ्हाठी भाषा. (पृ. १२, १३) प्राचीन मराठीतील १) गाथा सप्तशती, २) प्रवरसेनाचे 'सेतुकाव्य', ३) गौडवध, ४) राजशेखराची 'कर्पूरमंजिरी' हे ग्रंथ आणि गुणाढ्याचे पैशाची भाषेतील बृहत्कथा ग्रंथ हे फारच महत्त्वाचा पुरावा होत. नंदाच्या वेळच्या शालिवाहनाचा गुणाढ्य हा प्रधान होता. त्या ग्रंथाची हल्ली संस्कृतात दोन श्लोकमय भाषांतरे विद्यमान आहेत. श्रीलंकेतील महावंश या पाली भाषेतील सिंहली लिपीतील ग्रंथात अशोकाने बौद्ध भिक्षु महाराष्ट्रात पाठविल्याचा उल्लेख आहे. भवभूतीच्यानंतर दोनशे वर्षांनी राजशेखर झाला. तो महेंद्रपाल राजाकडे आश्रयाला होता. तो स्वतःला 'महाराष्ट्र चुडामणी' म्हणवून घेत असे.

इरावती कर्वे आपल्या 'मराठी लोकांची संस्कृती' या ग्रंथात म्हणतात, पश्चिमेकडील शक व महाराष्ट्रातील शातवाहन येण्याचे आधीच महाराष्ट्राच्या भूमीत संस्कृत वा संस्कृतोद्भव भाषा दृढमूल झाली होती व म्हणून बाहेरून आलेल्या राजांनी द्राविड भाषा न उचलता महाराष्ट्री (संस्कृत प्राकृत अवतार) आत्मसात केली. (पू. २०३) त्या पुढे म्हणतात, सर्व भारताची संस्कृती ज्या काव्यामध्ये साकारली ते वैदर्भी रीतीत होते, म्हणजे विदर्भाचे संस्कृत परंपरेमधील स्थान लक्षात येते. जसा अपरान्त त्याचप्रमाणे विदर्भ ही अति प्राचीन आर्य



Scanned with OKEN Scanner

(संस्कृत बोलणाराची) वसाहत होती. दोन्हीही वसाहती वन्यांच्या प्रदेशात झाल्या. संस्कृत द्राविडांशी लढा करून नव्हे. पहिल्या प्रख्यात वैदर्भींचे नाव लोपमुद्रा आहे. हे नाव आर्य नव्हे, ते लोपामुंडा याचे तर रूप नव्हे ना? मुंड लोकांची राजकन्या लोपा असा त्याचा अर्थ होईल. मुंडांचा नागांशी संबंध होता, त्याबद्दल बौद्ध वाङ्मयात पुरावा सापडतो. कोसलाचा राजा पसेनदी याचे मनात गौतम बुद्धाच्या घराण्यात लग्न करून बुद्धाचे नातेवाईक व्हावे असे होते. वासभखत्तिया यांच्या विवाहातून जन्मलेल्या विदुडभ याने सर्व शाक्य कुळाचा नाश केला. ही कथा पाली वाङ्मयात सांगितली आहे. इ.स. पूर्व ५०० ते ६०० वर्षांची ती कथा आहे. म्हणजे त्यावेळी नाग व मुंड एक असावेत असे दिसते. (पृ. २१३ व १४)

इरावती कर्वे यांनी पुढे या संदर्भात अधिक माहिती देताना म्हटले आहे की, महाराष्ट्राचे राजे सातवाहन यांनी प्रतिष्ठान ऊर्फ पैठण येथे राज्य केले. प्राकृत भाषेला उत्तेजन दिले व पर्यायाने मराठीच्या जन्माला मदत केली. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व संतकवीचा जन्म मध्य महाराष्ट्रात झाला व हल्लीच्या मराठीचे स्वरूप त्यांनी निश्चित केले. या प्रदेशाला जुने नाव अश्मक असे आहे. अश्मकाचे सर्वांत प्रसिद्ध राजे म्हणजे प्रतिष्ठानचे शातवाहन. त्यांचे आधी प्रतिष्ठानला नरसिंह नावाचा राजा होता. असा उल्लेख सोमस्वामीच्या कथा सरित्सागरात सापडतो. त्या कथेबद्दल के. श्री. व्यं केतकरांनी प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात लिहिले आहे... शातवाहनांना संस्कृत माहीत नव्हते, त्यांनी प्राकृताला आश्रय दिला. महारठी नावाच्या मांडलिक राजांशी लग्नसंबंध जोडला असे दंतकथा व शिलालेखांवरून दिसते. शातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट व यादव या घराण्यांनी महाराष्ट्रावर एकामागून एक राज्य केले. महाराष्ट्रातील बुद्ध लेणी शातवाहनांच्या व वाकाटक आणि चालुक्यांच्या कारकिर्दीतील आहेत. त्यातील सर्व लेख प्राकृतातील आहेत. 'लीलावती' या अपभ्रंश भाषेत लिहिलेल्या काव्यात सुप्रसिद्ध बौद्ध पंडित नागार्जुन हा हालाचा मित्र व हितोपदेशक होता असे म्हटले आहे. त्यांच्या संबंधी रठ्ठ आणि महारठ ह्यांची नावे शिलालेखात येतात. यांचे प्रमुख शिलालेख पश्चिम महाराष्ट्रातच आहेत. आंध्र व कर्नाटक अशा दोन संस्कृतीसंपत्र राष्ट्रांशी बरोबरी करून मराठीने आपल्या दक्षिण सीमा पक्क्या केल्या; एवढेच नाही, तर मराठी भाषा कर्नाटकाच्या गाभ्यापर्यंत पोहोचली. याला अनेक सांस्कृतिक कारणे आहेत. प्रख्यात सूत्रकार बौद्धायन व आपस्तंभ दाक्षिणात्य होते. बृहत्कथेत अपाणिनीय अशा ऐन्द्रादी व्याकरणांचा उल्लेख येतो ती दक्षिणात्यांनी रचिलेली होती असे दिसते. चालुक्य व राष्ट्रकुट दोघेही जैनानुयायी होते व त्यांच्या आश्रयाखाली पुष्कळ महत्त्वाचे जैन ग्रंथ महाराष्ट्रात लिहिले गेले. पुष्पदंताचे 'हरिवंशपुराण' राष्ट्रकुट राजांच्या अमदानीत मान्यखेड (मालखेड) येथे रचले गेले. कर्नाटकाच्या गाभ्यात महाराष्ट्री भाषेत ग्रंथनिष्पती राजाश्रयाने होत होती असे स्पष्ट दिसते. श्रवणबेळगोळचा हा शिलालेख मराठ्यांच्या आक्रमक राजसत्तेचे प्रतीक नसून जैनांच्या धर्मप्रसाराचे आहे. मध्ययुगातही भाषेच्या बाबतीत मराठीची आई जी महाराष्ट्री, तिचे वर्चस्व दक्षिणेत होते व तीत उत्तम ग्रंथांची उत्पत्ती होत होती. कोऊहल कवीने रचलेल्या 'लीलावती' काव्यात तो स्वतःचे काव्य 'मरहठ्ठ देशी' लिहिल्याचे सांगतो. काव्याचा काळ सुमारे ख्रिस्ताद्ब ८०० असावा असे तज्ज्ञांचे मत आहे. शातवाहन हे राजाचे नाव ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून तो थेट सत्यशती हालापर्यंत आढळते. यातील एका शातवाहनाची (ख्रिस्तपूर्वीच्या शातवाहनाची) राणी पंडिता होती. ती राजाजवळ विनोदाने जे संस्कृत बोलली ते राजाला कळले नाही. म्हणून ती हसली व राजा अपमानित होऊन निघून गेला. राजाने सहा महिन्यांत भाषा शिकण्याचा निश्चय केला व तो जी भाषा शिकला ती प्राकृत, हा कथाभाग बृहत्कथेच्या आरंभी येतो. व त्यात वररुचीचे नाव प्रामुख्याने येते. मराठी वाङ्मयाच्या प्रौढत्वाची, स्वयंसिद्धतेची बीजे ही या प्राकृत वाङ्मयात आहेत. बृहत्कथेला जगातील कथावाङ्मयात तोड नाही. हालाच्या सप्तशतीतील काव्यही लोकवाङ्मय आहे. कुठल्यातरी राज्याच्या राजकवीने केलेले ते काव्य नसून महाराष्ट्रात

सरहद, पुणे आयोजित
अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे
९८ वे
अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

प्रचलित असलेल्या लोकप्रिय काव्याचे ते संकलन आहे. त्यात राज्यां दरबाराचे चित्रण नसून गावगाड्याचे, पाटला पाटलाच्या सुनेचे म्हणजेच महाराष्ट्राच्या साध्या ग्रामीण जीवनाचे चित्र पाहावयास सापडते. लीलावती ही अद्भुतरम्य कथा हाल राजाबद्दल आहे. त्यातही महाराष्ट्राचा प्राण जे प्रतिष्ठान नगर व तेथील गोला ऊर्फ गोदावरी नदी व तीत नाहणाऱ्या, अंगाला हळद फासणाऱ्या महाराष्ट्र सुंदरीचे वर्णन आढळते. हा कवी आपल्या भाषे 'मरहठ्ठ देसी भाषा' असे नाव देतो. (पृ. २६)

दुर्गा भागवतांनी राजारामशास्त्री भागवतांच्या संशोधनाचा निष्कर्ष सांगताना म्हटले आहे जुनी महाराष्ट्री संस्कृतपेक्षा जुनी व खरी जिंवत भाषा आहे हे त्यांनी दाखवले आहे. (पृ.२) थोर संशोधक श्री. व्यं. केतकर, राजारामशास्त्री भागवत, वि. का. राजवाडे, इरावती कर्वे, कृ. पा. कुलकर्णी, दत्तो वामन पोतदार, वि. ल. भावे, भि. जोशी आदींच्या उपरोक्त संशोधनाच्या आधारे माहाराष्ट्री (मराठी) भाषा ही किमान अडीच हजार वर्षे जुनी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. माहाराष्ट्री, मऱ्हाठी, मराठी भाषेचा हा अडीच हजार वर्षांचा प्रवास साधार उलगडला म्हणजे मराठी भाषा ही अभिजात भाषा असल्याचे निर्विवादपणे सिद्ध होते.

*(कृतज्ञता प्रा. रंगनाथ पठारे, श्री. ह. अ. भावे, श्री. संजय सोनवणी व श्री. प्रल्हाद यांच्याशी झालेली चर्चा या लेखासाठी उपयुक्त ठरली.)*

(लोकराज्य ऑक्टोबर २०११ मधून पुनर्मुद्रित)



Scanned with OKEN Scanner

तेराव्या शतकापासून तर अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंतच्या काळात मराठी भाषेतील साहित्य निर्मिती मुख्यत्वे संतांनी केलेली दिसते. ज्ञानेश्वर, नामदेवांपासून तर निळोबा पिंपळनेरकरांपर्यंत संत साहित्याचा वारसा वृद्धिंगत झालेला आहे. याच काळात विशेषतः महानुभाव पंथातील लेखकांनी पुष्कळ ग्रंथनिर्मिती केली, परंतु त्यांचे साहित्य सांकेतिक लिप्यांमध्ये बंदिस्त झाल्यामुळे फक्त पंथीय अनुयायांपुरते मर्यादित राहिले. त्याचा एकूण मराठी साहित्यावर प्रभाव पडू शकत नाही हे मोठे नुकसानच झाले.


# संत साहित्य

**डॉ. सदानंद मोरे**

वारकरी संप्रदायातील संतांचे अभंग आणि ओव्या मात्र जनसामान्यांच्या ओठाओठांतून पसरत राहिल्या. पंढरी, आळंदी, पैठण, देहू इ. त्यांच्या केंद्रात वारीच्या निमित्ताने प्रतिवर्षी येणारे लाखो वारकरी भजन-कीर्तनाच्या माध्यमातून संतांचे साहित्य कंठस्थ करत राहिले. म्हणूनच मौखिक परंपरा या साहित्याच्या प्रसारामागील व ते टिकून राहण्यामागील प्रधान कारण आहे. या साहित्याने मराठी भाषा घडविण्यात मोलाचे योगदान दिले असे म्हणण्यात काहीही अतिशयोक्ती नाही.

या काळात मुद्रण कला अस्तित्वातच नव्हती. त्यामुळे छापील ग्रंथामुळे होणारा वाचकांच्या संख्येचा लाभ या साहित्यास होणे शक्यच नव्हते. मात्र हस्तलिखित पोथ्यांचे प्रमाण लक्षणीय आढळते. देहूच्या तुकाराम महाराजांच्या हयातीतच जयरामस्वामी वडगावकर यांनी कोल्हापूर येथे केलेली कीर्तने बहिणाबाई सिऊरकर या लहान मुलीने ऐकली, त्यात जयराम स्वामी तुकोबांचे अभंग म्हणत. ते ऐकून प्रभावित झालेल्या या मुलीला महाराजांचे प्रत्यक्ष दर्शन-श्रवण व्हावे म्हणून देहूगावी जायचे वेध लागले!

१९व्या शतकाच्या मध्यावर ब्रिटिशांनी आणलेल्या छपाई यंत्रामुळे आधीच लोकप्रिय असलेल्या संत साहित्याचे मुद्रण शक्य झाले. तोपर्यंत भाविक मंडळी आपापल्या गावी अभंगाची हस्तलिखिते,




ज्ञानेश्वरीच्या पोथ्या सिद्ध करून पंढरीस नेऊन विठ्ठलाच्या पायी ठेवून गावात घेऊन येत. त्यांची मिरवणूक काढत व सप्ताह करत, असे लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी नोंदवले आहे.

इ.स. १८१८ साली मराठ्यांच्या राज्याची इतिश्री झाली. ब्रिटिश कंपनीच्या नव्या राज्याचा कारभार मुंबईहून पाहिला जाई. या कारभारातील एल्फिन्स्टन प्रभृति धुरीणांनी पुस्तक प्रकाशनाला प्राधान्य दिले. शिवाय ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या धर्माचा प्रचार करण्यासाठी बायबलसारख्या धर्मग्रंथाचा मराठी अनुवाद छापण्याचा धडाका लावला.

मिशनऱ्यांच्या धर्मप्रचाराला तोंड देण्यासाठी आपणही आपले धर्मग्रंथ छापून प्रसिद्ध केले पाहिजेत, याची जाणीव मराठी विचारवंतांना होऊ लागली. मराठीतील आद्य पत्रकार ‘दर्पण’ पत्राचे कर्ते बाळशास्त्री जांभेकर हे त्यातील पहिले. जांभेकरांनी १८४५ साली ‘ज्ञानेश्वरी’ ग्रंथाचे पहिले प्रकाशन केले. हा संत साहित्याच्या मुद्रण प्रकाशनाचा ओनामा होय. बाळशास्त्रींनी केलेल्या प्रारंभानं, तर संत साहित्याच्या प्रकाशनात खंड म्हणून कधी पडलाच नाही. १८६७ पर्यंतचा काळ हा दोला मुद्रितांचा म्हणजे पाळण्यातील वाढीचा मानला जातो. १८६७ मध्ये गणपत कृष्णाजी या भंडारी गृहस्थांच्या छापखान्यात रावसाहेब विश्वनाथपंत मंडलिकांनी तुकोबांची गाथा छापली. तो दोला मुद्रितांच्या युगाचा शेवट मानला जातो. अर्थात १८४५ ते १८६७ या दरम्यान अनेक मुद्रक, प्रकाशक पुढे सरसावले होते. माधव चंद्रोबा डुकले यांनी सर्व संग्रह छापखान्याच्या माध्यमातून महत्त्वाची कामगिरी केली.

याच दरम्यान ख्रिस्ती मिशनऱ्यांचे आणि विचारशील ब्रिटिश राज्यकर्त्यांचे, संतसाहित्याकडे विशेषतः तुकोबांच्या अभंगाकडे लक्ष गेले. मुंबई विद्यापीठाचे पहिले कुलगुरू सर अलेक्झांडर ग्रँट तर तुकोबांचे मोठे चाहते होते. नव्याने स्थापन झालेल्या नवशिक्षितांच्या प्रार्थना समाजात ग्रँट साहेबांच्या अनुयायांचा मोठा भरणा होता. त्यांच्यापैकी शंकर पांडुरंग पंडित यांनी विष्णु परशुराम पंडित यांच्या साहाय्याने तुकोबांच्या गाथेची संशोधित




Scanned with OKEN Scanner

आवृत्ती सिद्ध केली. त्यासाठी ग्रँट साहेबांनी इंदुप्रकाश छापखान्यास २७,००० रुपयांची मदत सरकारमार्फत करविली.

प्रार्थना समाजाच्या अनुयायांनी तुकोबांना आपला मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक, नव्हे धर्मजीवनातील नायकच मानले होते. त्यांनी तुकोबासंबंधी खूप लिखाण केले आहे. महाराजांच्या अभंगांचा अर्थ लावण्यासाठी त्यांनी डॉ. रा. गो. भांडारकर यांच्या नेतृत्वाखाली 'तुकाराम चर्चा मंडळ'च स्थापन केले होते. या चर्चेचे दोन खंड त्यांनी प्रकाशित केले. अलीकडे साहित्य अकादमीने त्यांचे पुनर्मुद्रण केले आहे.

प्रार्थना समाजाप्रमाणे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजानेही तुकोबांना केंद्रस्थानी ठेवले होते. मात्र बहुजन समाजातील ही मंडळी संशोधन समीक्षा या प्रांतात नवखी असल्यामुळे अपवाद वगळता त्यांच्याकडून उल्लेखनीय कामगिरी झाली नाही. मात्र तुकाराम तात्या पडवळ यांनी सर्वच संतांच्या गाथा प्रकाशित करण्याचा उपक्रम हाती घेतला. 'तुका म्हणे' या मुद्रेचे उपलब्ध साडेआठ हजार अभंग संकलित करून त्यांनी बृहत्गाथा प्रकाशित केली. त्यांचे पुनर्मुद्रण अलीकडे वरदा प्रकाशन, पुणे यांनी केले आहे.

वारकरी संप्रदायात ज्ञानेश्वरांना संस्थापकाचा मान दिला जातो. वारकरी ज्ञानेश्वरीचे पारायण धर्मग्रंथाप्रमाणे करतात.




त्यामुळे त्यांच्यासाठी ज्ञानेश्वरीच्या अनेकानेक आवृत्त्या निघणे स्वाभाविक होते. त्यात डॉ. अण्णा मोरेश्वर कुंटे आणि नाना महाराज साखरे यांच्या प्रती अधिक प्रसिद्ध आहेत. याच कुंटे यांनी ज्ञानेश्वरांचा 'अमृतानुभव' ग्रंथ त्यावरील शिवकल्याणांच्या टीकेसह प्रसिद्ध केला. या ग्रंथावर बाळाचार्य खुपेरकरांपासून डॉ. भा. पं. बहिरटांपर्यंतच्या अनेक अभ्यासकांनी आपले लेखन प्रसिद्ध केले आहे. ज्ञानेश्वरीचे पारायण करताना तिचा अर्थ समजून केले तर उत्तम म्हणून प्राचार्य श.वा. दांडेकर यांनी 'सार्थ ज्ञानेश्वरी' प्रकाशित केली. दांडेकरांनी केलेली अनेक कीर्तनेही य.गो. जोशी यांच्या प्रसाद प्रकाशनाने प्रसिद्ध केली आहेत. 'अभंग संकीर्तनांचे' काही खंडच आहेत. ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी'सारखेच एकनाथांच्या भागवतावरील अकराव्या स्कंधावरील भाष्याला महत्त्व आहे. 'ज्ञानेश्वरी' इतक्या नसल्या तरी या ग्रंथाच्याही बऱ्याच आवृत्त्या प्रकाशित झाल्या. पुण्याच्या त्र्यंबक हरी आवटे यांनी सर्व संतांचे अभंग 'सकल संतगाथा' म्हणून काही खंडातून प्रकाशित केले. त्यांचीही नवी आवृत्ती 'वरदा'ने काढली आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्यामुळे संतसाहित्याची चिकित्सक चर्चा सुरू झाली. राजवाड्यांनी 'ज्ञानेश्वरी'ची पाटांगण प्रत छापली व ती अतिप्राचीन असल्याचा दावा केला. तो मान्य न झाल्याने त्यांनी ती अग्नी - नारायणाच्या स्वाधीन करून आपल्या तामसी वृत्तीचे प्रदर्शन मात्र केले. वि.ल. भावे. यांनी 'महाराष्ट्र सारस्वत' ग्रंथातून प्राचीन मराठी साहित्याचा इतिहास लिहिला. त्यात संत साहित्याच्या चर्चेनेच अधिक जागा व्यापलेली दिसून येते. त्यांची परंपरा 'पाच संतकवी'चे विवेचन करून सारस्वताला पुरवणी जोडणाऱ्या डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी सुरू ठेवली. गुरुदेव डॉ. रा. द. रानडे यांनी साक्षात्कारवादाच्या चौकटीत संत साहित्याची मीमांसा केली. तीही महत्त्वाची आहे. विनोबा भावेंनीही बहुतेक सर्व संतांच्या भजनांची संपादने करून प्रसिद्ध केली.

संत साहित्याच्या आधुनिक अभ्यासकांमध्ये ल. रा. पांगारकर यांचे नाव घ्यावे लागते. त्यांनी अनेक संतांची चरित्रे

सरहद, पुणे आयोजित
अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे
९८ वे
अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

लिहिली. 'भक्तिमार्ग प्रदीप' हा त्यांचा ग्रंथ तर आजही प्रसिद्ध आहे. महाराष्ट्र भाषाभूषण ज.र. आजगावकरांना तर आधुनिक महिपती म्हणावे इतके चरित्रलेखन त्यांनी केले. असेच ओवीबद्ध चरित्रलेखन दासगणू यांनी केले. राजवाडे-भावे-शंकरराव देव आणि भा.वा. भट यांचे रामदासी साहित्य संशोधनाचे कार्य महत्त्वाचे आहे. धुळ्याची सत्कार्योत्तेजक सभा ही संस्था देवांचीच. संत साहित्याकडे आधुनिक काव्यशास्त्रीय, सामाजिक, सांस्कृतिक दृष्टीने बघून महत्त्वाचे लेखन झाले आहे. त्यात गं. बा. सरदार यांचे 'संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती', बा. र. सुंठणकरकृत 'महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य', दिलीप चित्रे लिखित 'पुन्हा तुकाराम', डॉ. आ. ह. साळुंखे यांचे 'विद्रोही तुकाराम', सदानंद मोरेकृत 'तुकाराम दर्शन' अशा ग्रंथांचा उल्लेख करावा लागतो. दिलीप चित्रे यांनी तुकोबा हे जागतिक पातळीवरील महाकवी ठरवून त्यांच्या फूटपट्टीने मराठी साहित्याच्या मर्यादा उघड पाडल्या आहेत. सदानंद मोरे यांनी तुकोबांना केंद्रस्थानी ठेवून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाची पुनर्मांडणी केली आहे. डॉ. दिलीप धोंडगे यांनी तुकोबांच्या कवितेचा शैलीवैज्ञानिक अभ्यास केला. त्यांचा ग्रंथ प्रकाशनाच्या प्रतीक्षेत आहे. संत साहित्य हे अजूनही मराठी वाचकाच्या आस्थेचा विषय आहे व यापुढेही राहील, असे म्हणण्यात अतिशयोक्ती नाही.

(लोकराज्य जून-जुलै २०११ मधून पुनर्मुद्रित)



Scanned with OKEN Scanner

केशवसुतांची 'कवी' म्हणून निश्चित आणि स्पष्ट अशी भूमिका आहे. ती आधीच्या कालखंडातील संतांच्या, पंडितांच्या व शाहिरांच्या भूमिकांहून निराळी आहे. ही भूमिका त्यांच्या सर्वच कवितांमधून व्यक्त होते. केशवसुतांच्या कवितेचे प्रेमकविता, सामाजिक कविता, गूढगुंजनपर कविता, निसर्गविषयक कविता असे विभाजन केले, तरी त्यांच्या कवितांमागची भूमिका एकसंध आहे. त्यामुळेच निसर्गदृश्य पाहताना स्वतःच्या देशाच्या पारतंत्र्याची जाणीव होते. आपल्या कुटुंबीयांचा विचार करताना समाज परिवर्तनाचा विचार त्यांच्या मनात येतो. स्वसमाजाचे भान हा केशवसुतांच्या कवितेचा अपूर्व असा विशेष आहे.

# कवी आणि कविता

**वसंत आबाजी डहाके**

केशवसुतांच्या कवितेतील वैचारिक आशय जसा महत्त्वाचा आहे तसेच त्यांनी पद्यबंधांत केलेले प्रयोगही महत्त्वाचे आहेत. इंग्रजी सॉनेटवरून त्यांनी मराठी चतुर्दशपदी अथवा सुनीत आणले. केशवसुतांच्या विचारप्रवण पिंडाच्या अभिव्यक्तीशी हा बंध जुळणारा होता. केशवसुतांनी अभिव्यक्तीच्या आवश्यकतेनुसार अक्षरगणवृत्तांना नवा आकार दिला आणि मात्रावृत्तांनाही कवितेत, आवश्यक त्या आंदोलनासाठी वळवले.

आशय-अभिव्यक्तीचे निराळेपण, नव्या मूल्य संकल्पनांचा आविष्कार, कवितेविषयीची नवी भूमिका, कवितेतील प्रयोगशीलता या गोष्टींमुळे; केशवसुत हे युगप्रवर्तक कवी ठरले. केशवसुतांच्या कवितेपासूनच पुढे मात्रावृत्तांचा स्वीकार करणारी, परमार्थाशी संबंध नसणारी, लौकिक विषयांना (विशेषतः सामाजिक-राजकीय) प्राधान्य देणारी पद्यबंधांमध्ये वेगवेगळे प्रयोग करणारी, प्रदीर्घ नसणारी, स्फुट कविता प्रचारात आली. आत्माविष्कारात्मक भावकवितेचा जन्म झाला, नव्हे, उत्तरोत्तर भावकविता हीच कविता या साहित्य प्रकाराच्या केंद्रस्थानी आली.

बालकवींच्या कविता वाचताना सर्वप्रथम लक्षात येणारी गोष्ट म्हणजे, त्यांनी साध्या सोप्या मात्रावृत्तांचा आणि गेय अशा चालींचा उपयोग केला आहे; वर्णांच्या आणि शब्दांच्या पुनरुक्तीचा त्यांनी वापर केला आहे; बहुतांश कवितांमध्ये मृदू वर्णांचे उपयोजन आहे; बालकवींच्या विशिष्ट संवेदनशीलतेचा प्रत्यय येतो; उपमा-रूपक-उत्प्रेक्षासदृश प्रतिमा आणि वर्णांतून, शब्दांतून जाणवणारा नाद, यमके, चरणांतील आंदोलने, लय यांमुळे; बालकवींच्या कवितेला अनन्य असे रूप प्राप्त झाले आहे. वर्णांची, शब्दांची, अर्ध-चरणांची आवृत्ती आणि समांतरता हे बालकवींच्या कवितेचे एक वैशिष्ट्य आहे. 'आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिंकडे' यात वर्णांची आवृत्ती दिसते; 'नभांत भरला, दिशांत फिरला, जगांत उरला' यात समांतरता आहे. अशी अनेक उदाहरणे बालकवींच्या कवितेत आढळतात. किंबहुना बालकवींच्या कवितेचे ते पोत आहे. केशवसुतांच्या कवितेतून अगदी निराळा असा घाट बालकवींनी घडवला आहे.

गोविंदाग्रजांवरही केशवसुतांचा प्रभाव असला तरी त्यांचा पिंडही केशवसुतांहून निराळा आहे. केशवसुत प्रवर्तित संप्रदायातच गोविंदाग्रजांचाही समावेश होतो; कारण, केशवसुतांप्रमाणे आत्मविष्कार, सुनीत रचना, निसर्गविषयक -प्रेमविषयक काव्यलेखन, गूढगुंजन, मात्रावृत्तांचा वापर गोविंदाग्रजांनीही केला आहे, परंतु कल्पकता आणि भावनोत्कटता यांच्या बाबतीत गोविंदाग्रज हे केशवसुतांहून पूर्णतः भिन्न आहेत. त्याचप्रमाणे गोविंदाग्रजांची शब्दावर असलेली हुकूमत केशवसुत व बालकवी यांच्याहून भिन्न तऱ्हेची आहे. बालकवी हे निसर्गाचे कवी म्हणून ओळखले गेले. कारण, त्यांच्या कवितेत निसर्गाची प्रसन्नमधुर आणि खिन्नउदास अशी दोन्ही रूपे, आविष्कृत झाली आहेत. गोविंदाग्रज हे 'प्रेमाचे शाहीर' ठरले. प्रेमभावनेच्या विविध छटा त्यांच्या कवितेतून दिसतात; किंबहुना, गोविंदाग्रजांच्या बहुसंख्य कवितांतून प्रेमभावनेचाच आविष्कार झालेला आहे. गोविंदाग्रजांच्या प्रेमकवितांत सफल प्रीतीची कविता थोडी आहे, विफल प्रीतीचीच अधिक आहे. स्वतःच्या अस्तित्वाशीच ही प्रेमभावना निगडित झाली होती, हे त्यांच्या अनेक कवितांतून दिसते. आपली भावना व्यक्त करण्यासाठी गोविंदाग्रजांनी वेगळीच सृष्टी रचली आहे. त्यातूनच त्यांच्या 'कथात्म' कवितांचा उदय झाला आहे.

भास्कर रामचंद्र तांबे हे आनंदवादी कवी होत. भारतीय दर्शन आणि भारतीय साहित्यशास्त्र यांच्या संस्कारातून त्यांची कविता घडली. विशुद्ध सौंदर्यवाद आणि अढळ आस्तिक्यवाद ही तांबे यांच्या कवितेची ठळक वैशिष्ट्ये आहेत. शब्दांची निवड आणि रचना, त्यांतील नादमाधुर्य, गृहस्थाश्रमाच्या चौकटीतून प्रणयाची रम्य चित्रणे, ईश्वरावरील श्रद्धा, भोवतीच्या निसर्गातून आस्तिक्याचा प्रत्यय, गांधींच्या चळवळीविषयक आदर, विभूतीपूजन, जन्म, विवाह आणि मृत्यू या मानवी जीवनातील अटळ घटनांविषयीचे भान तांबे यांच्या कवितेतून प्रकट झाले. केशवसुतांच्या विचार-कवितेहून तांबे यांच्या गेय कवितेला



Scanned with OKEN Scanner

अधिक लोकप्रियता लाभली.

१९२० साली लोकमान्य टिळकांचे निधन झाले. १९२०पर्यंतच्या कालखंडात दत्त, केशवसुत, टिळक, विनायक, माधवानुज, गोविंदाग्रज, बालकवी, रेंदाळकर या कवींची जीवितयात्रा संपली होती. चंद्रशेखर, बी. तांबे, गोविंद, बहिणाबाई चौधरी, सावरकर, ज. के. उपाध्ये, दु. आ. तिवारी, आनंदराव टेकाडे, माधव हे कवी हयात होते; आणि काव्यसमाधनेत मग्न होते. १९२०च्या ऑक्टोबरमध्ये कवी अनंततनय आणि कवी अज्ञातवासी यांनी 'महाराष्ट्र शारदामंदिर' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेशी यशवंत, द.ल. गोखले, गिरीश, श्री.बा. रानडे, माधवराव पटवर्धन, शं.का. गर्गे (दिवाकर), माडखोलकर इत्यादींचा संबंध होता. प्रागतिक लोकांचा एक वेगळा गट तयार झाला आणि त्यातून रविकिरण मंडळाची स्थापना झाली. गांधी, आंबेडकर आणि सावरकर असे तीन लोकोत्तर नेते, या काळातल्या राजकीय-सामाजिक चळवळींचे सूत्रधार होते. देशात भारल्यासारखे वातावरण तयार झाले होते. मात्र, या वातावरणाचे पडसाद रविकिरण मंडळाच्या कवितेतून उमटलेले दिसत नाहीत. शहरी, मध्यमवर्गीय, सुशिक्षितांच्या व्यक्तिवादाचाच गडद ठसा मंडळाच्या कवितेवर उमटलेला आहे. सामूहिक सामाजिक-राजकीय संघर्षाच्याऐवजी व्यक्ती विरुद्ध समाज, यातल्या द्वंद्वात तत्कालीन संवेदनशील कवी अडकले होते. कविता या साहित्य प्रकाराविषयी 'एक कलाप्रकार' ही कल्पना हळूहळू रूढ होत असल्याचे, या काळात दिसून येते. त्यातूनच खंडकाव्य, गजल, रुबाई, सुनीत, जानपदगीत अशा वेगवेगळ्या रचनाप्रकारांना चालना मिळाली. 'सामाजिक' स्वरूपाचे खंडकाव्य ही रविकिरण मंडळाची निर्मिती आहे. 'सुधारक', 'विरहतरंग', 'नकुलालंकार' (माधव जूलियन), 'अभागी कमल', 'आंबराई' (गिरीश), 'जयमंगला', 'बंदीशाळा' (यशवंत) इत्यादी खंडकाव्ये लिहिली गेली.

१९३९ ते १९४७ हा कालखंड जगाच्या आणि भारताच्या दृष्टीने कठीण असा काळ होता. १ सप्टेंबर १९३९ ते २ सप्टेंबर १९४५ या काळात चाललेल्या दुसऱ्या महायुद्धात अंदाजे चार ते साडेचार कोटी माणसे मृत्यू पावली, लाखो माणसे बेघर आणि जन्माची जायबंदी झाली, अब्जावधी रुपयांच्या मालमत्तांचा चुराडा झाला, हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर टाकलेल्या अणुबॉम्बने आण्विक अस्त्रांची संहारक्षमता दाखवून दिली, अमेरिका आणि रशिया या विश्वसत्ता उदयास आल्या. याच काळात भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्याचा भाग म्हणून शांततामय आणि हिंसक अशी दोन्ही प्रकारची आंदोलने झाली. १९४२मधले 'क्विट इंडिया' आंदोलन, १९४३मधला बंगालमधला मानवनिर्मित भयंकर दुष्काळ, १९४६पासून सुरू झालेल्या सांप्रदायिक दंगली आणि भिन्नधर्मीयांचे हत्याकांड या ठळक गोष्टी होत्या. मर्ढेकरांच्या 'काही कविता'मधल्या कविता या काळात लिहिल्या गेल्या. कवीने काय करायचे असते? मर्ढेकरांनी स्वतःच प्रतिप्रश्न विचारला : 'प्रेमाचें लव्हाळे, सौंदर्य नव्हाळें शोधू?' आणि उत्तर दिले : 'आसपास, मुडद्यांची रास; यंत्रांतून आग; गोळ्यांचे पराग.' सांकेतिक काव्य आणि प्रत्यक्ष वास्तवाचीच दाहक जाणीव, यातला आत्यंतिक विरोध मर्ढेकर व्यक्त करतात :

वास्तवाच्या या जाणिवेने मर्ढेकरांना रविकिरण मंडळातील कवी, मंडळकालीन कवी आणि समवयस्क कवी, यांच्यापासून वेगळे केले. 'ऐशा टापूंत चौफे, नाहीं माहेर-सासर, कैचें गोत्र वा प्रवर, अनामिका' हे त्यांचे म्हणणे, कवितेविषयीदेखील तेवढेच समर्पक असे आहे. मर्ढेकरांइतकेच दुसरे महत्त्वाचे कवी शरच्चंद्र मुक्तिबोध हे होत.

नवी कविता म्हणजे उरात धगधग करणारा नवा सूर्य, अशी मुक्तिबोधांची कल्पना आहे. मात्र, हा सूर्य 'क्रुद्ध प्रचंड नवा मार्तंड' असून त्याचा 'महाप्रखर प्रकाश' कवीच्या उरात कोंडला आहे. मर्ढेकरांच्या कवितेची भाषा आणि मुक्तिबोधांच्या कवितेची भाषा यात पुष्कळच अंतर आहे. दोघेही समकालीन वास्तवात उभे राहून, एकूण मानवी जीवनाविषयीच्या अनुभवांची अभिव्यक्ती करतात; पण, त्यांच्या भूमिका वेगळ्या आहेत, दृष्टिकोन वेगळे आहेत. मर्ढेकर आणि मुक्तिबोध या दोघांच्याही कवितेत भांडवलशाहीतील अंतर्विरोधांचे भेदक चित्रण आहे. मर्ढेकरांच्या कवितेत मनुष्याची अगतिकता आणि असहायता व्यक्त होते, तर मुक्तिबोधांच्या कवितेत या अगतिक आणि असहाय माणसांतील लुप्त-सुप्त सूर्याचा शोध आहे.

या कवितेतील आशयही नवाच होता आणि अभिव्यक्तिची रीतीही नवीच होती. मुक्तिबोधांनी आपल्या अभिव्यक्तीसाठी प्रवाही असा मुक्तछंद वापरलेला आहे. विचार आणि भावना, जाणिवा आणि नेणिवा यांच्यानुसार हा मुक्तछंद वळतो, वाकतो, गतिमान होतो अथवा अवरुद्ध होतो. मर्ढेकरांनी पादाकुलक छंदाचा सर्जनशील वापर करून, पाहिजे तशी मोडतोड करून आपल्या जाणिवा-नेणिवांची अभिव्यक्ती केली, तर मुक्तिबोधांनी अनिल, वा.ना. देशपांडे यांनी प्रवर्तित केलेल्या मुक्तछंदाला विचारांच्या-भावनांच्या आवेगांची जोड दिली.

पुरुषोत्तम शिवराम रेगे यांचा 'साधना आणि इतर कविता' हा संग्रह १९३१मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर १९८४पर्यंत त्यांचे 'फुलोरा', 'हिमसेक', 'दोला', 'गंधरेखा', 'पुष्कळा', 'दुसरा पक्षी', 'स्वानंदबोध', 'प्रियाळ', 'अनीह' हे संग्रह प्रसिद्ध झाले. रेगे यांच्या कवितेचा मध्यवर्ती विषय सर्जनशक्ती आणि स्त्री हे त्या सर्जनशक्तीचेच रूप आहे. रेगे यांची शब्दकळा रंग, गंध, नाद या संवेदनांना रूप देणारी आहे. अनिल, ना. घ. देशपांडे यांच्याप्रमाणे रेगे हेही एक प्रयोगशील कवी आहेत. या कवींनी केशवसुत, बालकवी यांच्याकडून मात्रिक छंदांचा स्वीकार केला



Scanned with OKEN Scanner

आणि त्यांच्या विविध विभ्रमांचा शोध घेतला. सर्जनशक्ती हा त्यांच्या कवितेचा विषय आहेच, त्यांचे कविता लिहिणे हे सर्जनाचा शोध घेणेही असते. रेगे यांच्या कवितेत भाषेची जुनी किंवा नवी अनवट रूपे येतात. शब्दांच्या बाबतीत काहीएक अंतर्दृष्टी रेगे यांना लाभलेली दिसते.

१९४९ सालीच विंदा करंदीकर यांचा 'स्वेदगंगा' हा संग्रह आणि य.द. भावे यांचा 'आर्द्रा' हा संग्रह प्रकाशित झाला. त्याच वर्षी 'वश्या म्हणे' हा वसंत हजरनीस यांचा संग्रह प्रसिद्ध झाला. य. द. भावे आणि वसंत हजरनीस हे, मर्ढेकरांच्या जीवनदृष्टीशी जवळीक साधणारे, तर करंदीकर हे मुक्तिबोधांच्या - असे स्थूलमानाने म्हणता येईल. कारण, या नामावळीतले कवी कुणा एक-दोघा कवींच्या प्रभावाखाली होते, असे म्हणता येत नाही; मात्र, ते समकालीन वास्तवाचा अर्थ लावण्याच्या बाबतीत एकमेकांचे सहकारी होते. य. द. भावे हे मर्ढेकर, मुक्तिबोध, करंदीकर यांच्या पंक्तित बसू शकले असते; परंतु त्यांचा पिंड रवीकिरण मंडळकालीन रोमँटिसिझमने घडवला होता, त्यातून ते बाहेर पडू शकले नाहीत. मर्ढेकर आणि करंदीकर यांच्यातले नाते प्रयोगशीलता आणि चिंतनशीलता यात आहे; तसेच त्यांच्या समष्टीच्या आकलनाच्या संदर्भात मुक्तिबोधांशीही आहे. मर्ढेकरांच्या 'काही कविता'तील सामाजिक जाणीव साम्यवादाकडे झुकणारी आहे, असे करंदीकरांचे मत आहे. ती करंदीकर यांच्या कवितेतूनही व्यक्त झालेली आहे. करंदीकरांच्या प्रयोगशीलतेने मुक्तसुनीते, तालचित्रे, सूक्ते, विरूपिका असे रचनाबंध घडवले. पुरुषोत्तम शिवराम रेगे यांच्याप्रमाणे करंदीकरही कवितेच्या लिखित अथवा मुद्रित रूपाकडे बघतात. रेगे आणि करंदीकर यांच्या कवितेला असलेले आणखी एक परिमाण म्हणजे, चित्रकला आणि संगीत यांच्या अभिव्यक्तीच्या पद्धती कवितेत मुरवण्याचा प्रयत्न. भारतीय लघुचित्रांमध्ये रागमालाचित्रे आहेत, तसा करंदीकरांनी कवितेत केलेला प्रयोग म्हणजे तालचित्रे, वसंत बापट, मंगेश पाडगावकर या करंदीकर समकालीन कवींनी कविता लोकाभिमुख केली. पाडगावकरांच्या राजकीय उपहासिकांची दखल घेतली पाहिजे, तशीच त्यांच्या भावसंपन्न गीतांचीही. सदानंद रेगे यांची वाङ्मयीन-सांस्कृतिक संदर्भ असलेली कविता महत्त्वाची आहे.

१९६०च्या दशकातील एक महत्त्वाचे कवी म्हणून नारायण सुर्वे यांचा उल्लेख करावा लागतो. तीव्र समाजसन्मुखता हे सुर्वे यांच्या कवितेचे वैशिष्ट्य असून, महानगरातील सर्वसामान्यांच्या बोलीचा त्यांनी केलेला वापर लक्षणीय आहे.

जोमाच्या बाबतीत केशवसुतांशी आणि तत्त्वज्ञानाच्या संदर्भात मुक्तिबोधांशी नाते असलेल्या या कवितेने, समाजातील शोषित वर्गाच्या भावनांची आणि विचारांची कणखर शब्दांत अभिव्यक्ती केली. सुर्वे यांची कविता मध्यमवर्गीय काव्यभाषेहून आणि आशयाहून वेगळी आहे; तसेच सुर्वे यांच्या कवितेतले जगही मध्यमवर्गीय कवितेच्या चाकोरीबाहेरचे आहे. कामगार, नालबंद, नायकिणी, वेश्या, पोस्टर चिकटवणारी मुले, पोर्टर, शीगवाला अशी समाजाच्या निम्न स्तरावरची माणसे आणि त्यांच्या भाषा या कवितेत आढळतात.

वारकरी संतांची कविता आणि एकोणिसाव्या-विसाव्या शतकातील जागतिक महत्त्वाच्या कवींची कविता आत्मसात करून, दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी स्वतःची कविता घडवली आहे. चित्रे यांच्या कवितेचा पैस आणि आवाका बराच विस्तृत आहे आणि त्यांची काव्यनिर्मितीही विपुल आहे. कवितेची विविध रूपे, रचनेचे प्रकार त्यात आढळतात. चित्रे यांची बव्हंशी कविता मुक्तछंदात असली तरी, त्यात छंद-तत्त्व मुरलेले आहे. त्यांची शब्दांची निवड, ओळींची मांडणी, शब्दांचा नाद, ओळींमधला ताल, एका ओळीनंतरच्या दुसऱ्या ओळीने निर्माण होणारे आंदोलन, प्रतिमा, चित्रात्मकता, सांस्कृतिक वाङ्मयीन संदर्भ यांनी, त्यांच्या कवितेचा रूपबंध घडला आहे हे जाणवते. 'शक्तीची प्रार्थना', 'खंडोबा', 'महामंत्रोच्चार' यांसारख्या दीर्घ कवितांतही लय आणि गती ही तत्त्वे, त्यांच्या रचनेच्या अंगोपांगी कशी भिनलेली आहेत, हे लक्षात येते. त्यांची 'शक्तीची प्रार्थना' ही कविता संपृक्त आशय, भावनेची तीव्रता, अभिव्यक्तीचा छंदसदृश बंध, लय, गतिमानता आणि प्रतिमा यांच्या एकात्म संघटनामुळे या शतकातील एक श्रेष्ठ कविता ठरते.

चित्रे यांच्याप्रमाणे मराठी व इंग्रजी या दोन भाषांमध्ये कविता लिहिणारे अरुण कोलटकर त्यांच्या इंग्रजीतील 'जेजुरी' या दीर्घकवितेने विशेष प्रसिद्धीस आले. विविध नियत-अनियतकालिकांतून प्रकाशित झालेल्या त्यांच्या कवितांचा संग्रह १९७७ मध्ये आला. कोलटकरांची शब्दांची निवड आणि मांडणी विलक्षण आहे. भाषेची सहेतुक मोडतोड, जुन्या गाण्यांचा व म्हणींचा उपयोग, शब्दाचा परिचित अर्थातून निराळ्या अर्थाने केलेला उपयोग, ग्रांथिक भाषेऐवजी बोलभाषेचा वापर ही कोलटकरांच्या काव्यभाषेची वैशिष्ट्ये आहेत. कोलटकरांच्या कवितेतले विश्व दुःस्वप्नासारखे असून, त्याचे चित्रण ते अतिवास्तववादी शैलीत करतात. तिथल्या बिल्डिंगा झुलायला लागतात, पायगतीचे कांबळे झडप घालते, वर्तमानपत्राच्या रद्दीत पानोपानी साप असतात, खापरांना फेफरे भरते, इथली चक्की सगळे फस्त करून टाकते. त्यांच्या एका शब्दाच्या शेजारी दुसरा शब्द ठेवण्यातून अतिवास्तव पातळी लाभते. उदा. विटक्या टापपडसादांच्या पताका, कोरी विराट पावती, वाळलेल्या जिभांचा लुळा द्रोण, अनिरुद्ध जलमय बोटे, बिबटे संगीत, बेवारशी तृप्ती, टापांचे कथनकौशल्य, इत्यादी. बोलभाषेचा अकृत्रिम उपयोग आणि बाह्यतः कोणतीही गुंतागुंत नसलेली 'खेकडे', 'वामांगी' यांसारखी कविता अनेक अर्थस्तरांना सामावून घेतलेली असते.

या काळात प्रामुख्याने अनियतकालिकांतून लिहिणाऱ्या महत्त्वाच्या कवींमध्ये मनोहर ओक, भालचंद्र नेमाडे, वसंत दत्तात्रेय गुर्जर, सतीश काळसेकर, चंद्रकांत पाटील, तुलसी परब यांचा समावेश होतो. याच काळातील अन्य उल्लेखनीय कवी विलास सारंग, गुरुनाथ धुरी आणि वसंत आबाजी डहाके हे आहेत.

आशय आणि अभिव्यक्ती या बाबतीत पांढरपेशी मध्यमवर्गीय कवितेहून निराळी अशी कविता या काळात लिहिली जाऊ लागली. ती म्हणजे दलित अथवा आंबेडकरवादी कविता. बाबूराव बागूल, नामदेव ढसाळ, प्रकाश जाधव



Scanned with OKEN Scanner

यांच्यासारख्या काही कवींवर मार्क्सवादाचे स्पष्ट संस्कार आहेत हे खरे असले, तरी बव्हंश दलित कवितेने आंबेडकर-विचारातून प्रेरणा घेतलेली असल्याने तिला आंबेडकरवादी कविता, असे म्हणणे समर्पक होईल. धर्म, रूढी, राजकारण-समाजकारण, साहित्याची परंपरा नाकारणाऱ्या या चळवळीने आपल्या उग्र समाजभानाचा ज्वलंत आविष्कार केला तो पहिल्यांदा कवितेतूनच. दलित कवितेत शहरी आणि ग्रामीण वास्तवाचे प्रखर चित्र उमटले आहे. ग्रामीण भागातील अस्पृश्यता, घोर दारिद्र्य, अत्याचार, अज्ञान, अंधश्रद्धा यांनी पोळलेल्या माणसांचे चित्रण आणि मुंबईसारख्या महानगरातील बकाल झोपडपट्ट्यांतून जगणाऱ्या, कामाठीपुऱ्यासारख्या वस्तीत राहणाऱ्या, गिरण्या कारखान्यांत पिचणाऱ्या माणसांचे चित्रण असे दोन्ही जगाचे भेदक दृश्य, दलित कवितेत उमटले आहे. या कवितेत आक्रोश आहे तसाच विद्रोहही आहे. बाबूराव बागूल, केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, प्रकाश जाधव, वामन निंबाळकर, फ. मुं. शिंदे, दया पवार, यशवंत मनोहर, प्रल्हाद चेंदवणकर, त्र्यंबक सपकाळे, अर्जुन डांगळे, ज. वि. पवार, भीमसेन देठे, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार अशा अनेक कवींनी, उत्कट सामाजिक भान असलेली कविता लिहिली. भावना आणि विचार यांच्या अभिव्यक्तीवरच लक्ष केंद्रित केलेले असल्याने प्रयोगशीलतेला वाव नव्हता; परंतु ज्या जगण्याचे चित्रण कवितेत अपरिहार्य झालेले आहे त्या जगण्याची भाषाही स्वाभाविकच या कवितेला लाभली. त्या भाषेने आणि कवितेतील विचाराने मराठी कवितेला एक नवे परिमाण मिळाले यात शंका नाही; किंबहुना, दलित कवितेने, दलित साहित्याने एकंदरीत वाङ्मय व्यवहाराकडे, त्यामागच्या सामाजिक-राजकीय व्यवहाराकडे पाहण्याची सर्वस्वी नवी दृष्टी दिली.

केचे, ग्रेस, काजे, रामाणी, पोतदार, साटम इत्यादी कवींबरोबर त्या काळात प्रचलित कवितेच्या वाक्प्रचाराचा स्वीकार केलेली केशव मेश्राम यांची कविता १९६०-६५ या काळात बदलली व तिने सामाजिक विद्रोहाच्या भाषेचा अवलंब केला. यशवंत मनोहरांची कविता प्रायः मुक्तछंदातली विद्रोहाचा विचार मांडणारी कविता आहे. त्यांच्या कवितेच्या अभिव्यक्तीच्या पद्धतीचा मुक्तिबोधांच्या काव्याभिव्यक्तीशी संबंध जोडता येईल. वक्तृत्वप्रधान, ओजस्वी आणि वैचारिक गाभा असलेली कविता त्यांनी लिहिली. वामन निंबाळकरांच्या कवितेत ग्रामीण वास्तवाचे चित्रण आहे.

दया पवारांची कविता संयत विद्रोह व्यक्त करणारी आहे, तर त्र्यंबक सपकाळे आपल्या कवितेत स्वातंत्र्योत्तर काळातील वंचनेने उद्विग्न होऊन 'हे भारतमाते ! त्वां मला प्रेम-वात्सल्य केव्हा दिले' असा प्रश्न विचारतात. प्रल्हाद चेंदवणकरांनी रस्त्यारस्त्यावर दणाणत असलेला 'दलितांचा बिनधास्त आवाज' टिपला आहे.

सत्तरच्या दशकात शहरी आणि ग्रामीण स्त्रिया एका वैचारिक बैठकीवर आपल्या भावनांचा, विचारांचा आविष्कार करू लागल्या.

लिंगभेद हा पितृसत्ताक पुरुष-केंद्रित समाजव्यवस्थेतून निर्माण झालेला प्राथमिक आणि मूलभूत भेद आहे. या भेदांतूनच व्यक्तिगत आणि सामाजिक पातळीवरच्या संबंधांना सत्ता-संघर्षाचे रूप येते. स्त्री आणि पुरुष हा लिंगभेद असला; तरी 'स्त्रीत्व' आणि 'पुरुषत्व' हा लिंगभाव मानवनिर्मित, मुख्यतः पुरुष-निर्मित आहे. पुरुषकेंद्री समाजात निसर्गनिर्मित भेदाच्या आधारे शोषण केले जाते. अशा प्रकारचे एक वैचारिक भान आलेल्या स्त्रियांनी लिहिलेल्या कवितेला, साधारणपणे, 'स्त्रीवादी कविता' म्हटले जाते. प्रभा गणोरकर, रजनी परुळेकर, मलिका अमर शेख, नीरजा, अश्विनी धोंगडे, प्रज्ञा पवार, अनुराधा पाटील इत्यादी कवयित्रींच्या कवितांतून स्त्रीवादी जाणिवा व्यक्त झालेल्या आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीने वर्षानुवर्षे स्त्रीचे मानसिक व शारीरिक शोषण कसे केले आहे, याचा प्रखर उच्चार विशेषतः मलिका अमर शेख, रजनी परुळेकर, नीरजा, प्रज्ञा पवार यांच्या कवितांतून झालेला आहे.

ऐंशीच्या दशकात वसंत पाटणकर, द.भा. धामणस्कर, अशोक बागवे, निरंजन उजगरे, अशोक नायगावकर, शदर साटम, नारायण कुळकर्णी-कवठेकर, उत्तम कोळगावकर इत्यादींची कविता बहरात होती. १९९०नंतर कवींची एक नवी पिढी आली. अभिधा, अभिधानंतर, शब्दवेध इत्यादी अनियतकालिकांतून या पिढीची कविता प्रकाशित होऊ लागली आणि तिने स्वतःची ओळख निर्माण केली. या कवितेला जागतिकीकरणाचा, या अवस्थेतील आर्थिक, राजकीय, सामाजिक बदलांचा संदर्भ आहे. श्रीधर तिळवे, हेमंत दिवटे, मंगेश नारायणराव काळे, वर्जेश सोलंकी, प्रफुल्ल शिलेदार, प्रवीण दशरथ बांदेकर, वीरधवल परब, अजय कांडर, सलील वाघ, संजीव खांडेकर, सचिन केतकर, मनोज पाठक, दिनकर मनवर हे या पिढीतील प्रमुख कवी आहेत. काव्याशय आणि काव्यभाषा या दोन्ही दृष्टींनी या पिढीची कविता वेगळी आहे. तिचे नाते १९६०च्या दशकातील कोलटकर-चित्रे यांच्या कवितेशी असले तरी तिला स्वतःचा चेहरा आहे. निश्चित अशा कोणत्याही विचारसरणीशी न बांधलेली; पण प्रखर राजकीय भान असलेली ही कविता आहे. ऐंशी-नव्वदच्या दशकांच्या सीमेवरचे भुजंग मेश्राम आणि अरुण काळे यांच्या कवितांनी कोलटकर-चित्रे-ढसाळ यांच्या कवितेच्या पुढचा टप्पा गाठलेला आहे.

आताही अनेक कवींची आश्वासक कविता प्रकाशित होते आहे. शंभर-सव्वाशे वर्षांतल्या कवितेच्या या आढाव्यात सर्वांचा समावेश होऊ शकलेला नाही, याची लेखकाला जाणीव आहे.

(लोकराज्य जून-जुलै २०११ मधून पुनर्मुद्रित)

सरहद, पुणे आयोजित
अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे
१८ वे
अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५



Scanned with OKEN Scanner

**विशिष्ट प्रदेशात, विशिष्ट उच्चारांनी, म्हणी-वाक्प्रचारांनी समृद्ध असलेली, मर्यादित स्वरूपात बोलली जाणारी भाषा म्हणजे बोली होय. प्रमाण भाषा आणि बोली यांचे परस्पर अतूट नाते असते. बोलींच्या आधारेच प्रमाण भाषा निर्माण होत असते. प्रादेशिक, सामाजिक आणि सांस्कृतिक भेदांवर मात करत सर्व भाषिकांना समाजव्यवहार सुलभ व्हावा, या उद्देशाने प्रमाण भाषा निर्माण केली जाते.**

# संस्कृतीचे मूर्तिमंत दर्शन... बोली भाषा

**गिरीश मोरे**

कोणतीही भाषा तिच्या बोलीसह वाटचाल करीत असते. प्रादेशिक भिन्नतेमुळे, शिक्षणामुळे आणि समाजव्यवस्थेमुळे भाषा अवस्थांतरित होत असतात. लेखन, छपाई आणि सार्वत्रिक शिक्षणामुळे भाषेत सूत्रबद्धता येते. यातून प्रमाण भाषा आणि बोली भाषा असा भेद निर्माण झाला आहे. कोणत्याही देशातील, कोणत्याही समाजासाठी बोली भाषा ही सांस्कृतिक भांडार असते. बोलीकडे सांस्कृतिक स्रोत (रिसोर्स) म्हणून पाहिले जाते. त्यामुळे बोलींचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र अध्यासन केंद्रे उभारणे गरजेचे आहे. बोलीचे महत्त्व समजून घेण्यासाठी प्रमाण भाषा आणि बोली यांचे स्वरूप लक्षात घेतले पाहिजे.

## प्रमाण भाषा आणि बोलीचे स्वरूप

भौगोलिक आणि सामाजिक कारणांमुळे बनलेल्या भाषाभेदांना सामावून घेणारी एकसंघ भाषा म्हणजे प्रमाण भाषा. प्रमाण भाषा ही प्राधान्याने लेखनासाठी वापरली जाते. प्रमाण भाषा ही वेगवेगळ्या प्रादेशिक बोलींना सामावून घेत असते. जी भाषा विविध बोलींसह वाटचाल करत असते, तिला प्रमाण भाषा करण्याची गरज असते. शासकीय व्यवहार विशिष्ट बोलीत पार पाडणे कठीण असते. तसेच शिक्षण व्यवहारही एका विशिष्ट बोलीत पार पाडणे कठीण असते. त्यासाठी लेखनविषयक काही नियम तयार करून घ्यावे लागतात. प्रसारमाध्यमांचेही असेच असते. सर्व वाचकांना एकसारखे आकलन होणे गरजेचे असते. प्रमाण भाषा निर्माण करताना बोली भाषांचा आधार घेतला जातो. म्हणजे बोली भाषेतूनच प्रमाण भाषा निर्माण होत असते. समाजातील शिक्षित, साहित्यिक किंवा सत्ताधारी समूहाकडून प्रमाण भाषा निर्माण केली जाते. आरंभी कोकणी ही मराठीची बोली होती, कालांतराने तिला प्रमाण भाषेचा दर्जा मिळाला. साम्यभेद असणाऱ्या बोली वापरणारे लोक परस्परात भाषिक व्यवहार करताना प्रमाण भाषेत करतात.



विविध बोली भाषा बोलणाऱ्या व लिहिणाऱ्या लोकांसाठी तयार केलेले एकच भाषिक ठिकाण म्हणजे प्रमाण भाषा होय. मराठीच्या अनेक बोली आहेत. उदा. वऱ्हाडी, खानदेशी, डांगी, अहिराणी, कोकणी, मालवणी, चंदगडी. या बोली बोलणारे एकत्र आले तर त्यांच्यात सहजसंवाद होऊ शकणार नाही. त्या सर्वांसाठी एकच भाषा तयार झाली तर व्यवहार पार पडू शकतो. ही गरज लक्षात घेऊन प्रमाण भाषा निर्माण झाल्या आहेत. प्रशासन, राजकारण, शिक्षण आणि लेखन अशा व्यवहारात बोली भाषा ही प्रमाण भाषेचे नेतृत्व स्वीकारत असते. डॉ. ना. गो. कालेलकर यांनी प्रमाण भाषेला आदेशात्मक भाषिक रूप मानले आहे. प्रमाण भाषा आणि बोली भाषा यांची तुलना केली तर लक्षात येते की, समाजव्यवहारासाठी बोली भाषा मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. प्रत्यक्ष व्यवहारात प्रमाण भाषा न वापरता बोली भाषाच वापरली जाते. त्यामुळे बोली भाषेने जिवंत आणि स्वाभाविक रूप धारण केलेले असते. मराठीच्या बोलींचा अभ्यास सर्वप्रथम जॉर्ज ग्रिअर्सन याने 'लिंग्विस्टिक सर्वे ऑफ इंडिया' या पुस्तकातून केला. अकृत्रिमतेने प्रदेशनिष्ठ, जातिनिष्ठ, व्यावसायनिष्ठ आणि कुटुंबनिष्ठ बोलल्या जाणाऱ्या भाषेला बोली भाषा असे म्हटले जाते. बोली भाषेचे भौगोलिक परिक्षेत्र हे मर्यादित असते. प्रमाण भाषेला जिवंतपणा प्राप्त करून देण्यासाठी बोली भाषा पुढे येत असतात.

## भाषा आणि बोली भाषांचा सहसंबंध

भाषा ही प्राधान्याने बोलण्यासाठी असते. ती लिहिण्यासाठी नंतर झाली. तीन ते चार हजार वर्षांपासून आपण ती लिहीत आलो आहोत. अगोदर ती बोलीरूपातच होती. त्यामुळे भाषा म्हणजे बोलणे या दृष्टीने भाषेचा विचार करणे यात भाषेचे विज्ञान आहे. भाषा ही कालांतराने लिपीरूपात आणि लेखनरूपात आली असली, तरी ती आरंभी बोलीरूपातच होती. त्यामुळे भालचंद्र



Scanned with OKEN Scanner

नेमाडे म्हणतात त्याप्रमाणे, आजही १०० टक्के निरक्षर असलेले अनेक समाज पृथ्वीवर अस्तित्वात असून त्यांच्या बोलभाषा अत्यंत प्रभावी व इतर कोणत्याही प्रगत समाजांच्या भाषांइतक्याच सक्षम आहेत. (नेमाडे १९९८, पृ. ८) याचा अर्थ पृथ्वीवर १०० टक्के बोलणारे लोक आहेत म्हणजे १०० टक्के लोक लिहिणारे नाहीत. यावरून भाषा म्हणजे प्राय बोलीभाषाच होय, हे विधान स्वीकारावे लागते.

## बोलीचे भौगोलिक संदर्भ

कोणतीही बोली विशिष्ट प्रदेशात बोलली जाते. त्या त्या प्रदेशाचे गुणविशेष त्या बोलीत प्रतिबिंबित झालेले असतात. समुद्र आणि समुद्रकिनारा, डोंगराळ भाग, दऱ्याखोऱ्यांचा परिसर, सपाट भूप्रदेश, वाळवंट, उष्ण, थंड वा समशीतोष्ण प्रदेश, जंगले, अशा कितीतरी प्रादेशिक भिन्नता भारतात आढळतात. त्या प्रदेशांचा उच्चारावरही परिणाम होतो. त्यामुळे बोलीला वेगळेपणा मिळतो. प्रादेशिक आणि प्रशासकीय विभागानुसार काही बोली आहेत. उदा. कोकणी, मालवणी, अहिराणी, मराठवाडी, कोल्हापुरी, चंदगडी, वऱ्हाडी, पुणेरी, झाडीबोली. पुणेरी शब्दात 'घ्या नारळ' (जा आता घरी), 'सदाशिव पेठी' (कंजूस) 'प्रशाला' (शाळा) असे शब्द आढळतात. मालवणीत 'ए' स्वराऐवजी 'आ' स्वरांत येतो. उदा. तेणा (त्याने), बरा (बरे) याशिवाय 'माका', 'तुका' किंवा 'माकां', 'तुकां' असे शब्दही आढळतात. लातुरी बोलीत 'जाऊलालाव', 'करूलालाव', 'राह्यलाव', 'बसुलालाव' अशी रूपे आढळतात. जातिव्यवस्था हे भारत देशाचे एक वैशिष्ट्य आहे. भारतात विविध बोली निर्माण होण्यामागे जातिभिन्नता हेही एक कारण आहे. प्रत्येक जातीच्या आचार, विचार आणि प्रथांमध्ये भिन्नता आढळते. त्यानुसार शब्द निर्माण होतात आणि शब्दांचे उच्चारही बदलतात. जात आणि पोटजाती याचाही बोलीवर प्रभाव पडलेला असतो. उत्तर कोकणात बोलली जाणारी आगरी ही कोळी समाजाची बोली आहे. 'थापोल्या' (शेणाच्या गवऱ्या), 'पतान' (चप्पल), 'निवोद' (नैवेद्य), 'कवरा' (केवढा) हे शब्द आगरी बोलीचे वेगळेपण दर्शवितात.

## समाज जीवनाचे प्रतिबिंब

भारतात विविध जाती आहेत त्याप्रमाणे जातीनिहाय पारंपरिक व्यवसायही आहेत. याशिवाय इतरही व्यवसाय आहेत. त्या त्या व्यवसायात वापरले जाणारे शब्द वेगवेगळे असतात. त्यावरून व्यावसायनिष्ठ बोली तयार झाल्या आहेत. त्यामुळे बोलीला व्यवसायनिहाय संदर्भ असतात हे लक्षात येते. वैद्यक, बांधकाम, प्रसारमाध्यमे, कृषी अशा विविध क्षेत्रातील भाषिक व्यवहार हा नवनवीन शब्दांमधून चालतो. बांधकाम व्यवसायात 'ओळंबा', 'थापी', 'शिकंजा' असे किती तरी शब्द आढळतात. कृषी क्षेत्रात 'कासरा', 'जू', 'नांगरणी', 'कुळवणी', 'पेरणी', 'कोळपणी', 'खुरपणी', 'मळणी' असे अनेक शब्द आहेत.

बलुतेदारांच्या कामावरून बलुतेदारांची बोली निर्माण झाली आहे. उदा. चांभार (डोब, रापी, आरी, हस्ती, सळ, आंबुरा, निशाण, फरांडी), सुतार (वाकस, किकरू, पटासी, रंदा), लोहार (शेवटणे, भाता, ऐरण), सोनार (दाग, फुंकणी, चिमटा, बागेश्वरी), वारीक (साण, वाटी, वस्तरा, कातरी, धोकटी), महार (येसकरकी, काठी, तराळकी), कुंभार (आवा, चाक, धापटणी), मांग (फिरकी, रहाट, खिळ्या, पाते, कलबूत). यावरून बोलीला व्यवसायनिहाय संदर्भ असतात हे लक्षात येते.

## स्त्रीविषयक संदर्भ

पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रीच्या जीवनाला वेगळी दिशा मिळाली आहे. त्यातून निर्माण झालेल्या विशिष्ट बोलीकडे नेहमीच दुर्लक्ष केले जाते. स्त्रीवाचक आणि स्त्रीलिंगी बोली भाषा निर्माण झालेली आहे. प्रमाणभाषेत वापरले जात नाहीत असे कित्येक शब्द स्त्रीच्या ओठी असतात.

स्त्रीलिंगी क्रियापदे आणि विशेषणे यांचा मराठी भाषेत सुळसुळाट आहे. उदा. करते, खाते, पिते, बसते, लावण्यवती, रूपवती, रणरागिणी. मुलगी वयात येते या घटनेला बोलीभाषेत 'पदर येणे', 'शहाणी होणे' असे म्हटले जाते. 'कावळा शिवणे', विटाळशी होणे' असे म्हटले जाते. गर्भधारणेसाठी 'पोटुशी', 'गरोदर', 'गरवार' असे शब्द आढळतात. या बोलीला स्त्रियांची संकेत बोली असेही म्हणता येते.

**सरहद, पुणे** आयोजित
**अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे**

**९८ वे**

**अखिल भारतीय**
**मराठी साहित्य संमेलन, दिल्ली**
**२०२५**

काही म्हणी, वाक्प्रचार आणि शिव्या या स्त्रीकेंद्री आहेत. उदा. 'का गं बाई रोड तर म्हणे माहेरची ओढ', 'जावा तिथे दावा, सवती तिथे हेवा', 'दिवसभर चरते म्हणे मी एकादशी करते', 'नाव सगुणी करणी अवगुणी', 'नाकापर्यंत पदर, वेशीपर्यंत नजर'. यावरून बोलीतील स्त्रीविषयक संदर्भ लक्षात येतात.

## सांस्कृतिक भांडार

प्रमाण भाषेत संस्कतीच्या खुणा फारशा आढळत नाहीत. बोली भाषा मात्र सांस्कृतिक भांडार असतात. त्या त्या काळातील संस्कृतीच्या खुणा शोधण्यासाठी बोलीशिवाय दुसरा पर्याय नसतो. बोली भाषेतील प्रत्येक शब्दाला विशिष्ट संस्कृतीचा स्पर्श असतो. सांस्कृतिक संदर्भाशिवाय बोली असूच शकत नाही. श्रद्धा, परंपरा, प्रथा, रीतीरिवाज हे त्या त्या बोलीत सामावलेले असतात. सणवारांची नावे घेतली तरी संस्कृती जिवंत होते. गुढीपाडवा, दिवाळी, दसरा, पोळा, नागपंचमी, होळी, वटपौर्णिमा आणि राखीपौर्णिमा असे अनेक सण आपले पूर्वज साजरे करत होते. त्या सणांदिवशी होणारा भाषिक व्यवहार हा आपले सांस्कृतिक संचित आहे.

सणादिवशी होणारे विविध प्रकारचे विधी, खेळ, गाणी यांमधून बोली समोर येते. 'दिन दिन दिवाळी, गाई-म्हशी ओवाळी' असे गीत कानावर पडले की, दिवाळी सण जिवंत होतो. त्यामुळे बोलींचा अभ्यास आणि बोलीचे अस्तित्व तत्कालीन संस्कृतीचा अभ्यास असतो.



Scanned with OKEN Scanner

## समाजाचे जिवंत रूप

भाषा आणि समाज हे एकमेकांशी अगदी निकटतेने बांधलेले असतात. समाजातील बदलाबरोबरच भाषेतही बदल घडत असतात. भाषा म्हणजे समाज आणि समाज म्हणजे बोली यातील एकरूपता लक्षात घेतली पाहिजे. बोली ही इतकी जिवंत आहे. त्यामुळे ती निसर्गासम वाटचाल करीत आहे असे वाटते. समाजाच्या स्थिती-गतींना बोलीचे कोंदण असते. तत्कालीन पेहराव, अन्नपदार्थ, अलंकार, वस्तू आणि वास्तू यातून समाज समोर येत असतो. उत्खननात सापडलेल्या वस्तूंमधून त्यावेळचा समाज लक्षात येतो. 'लीळाचरित्र' या ग्रंथातील बोलीमधून तत्कालीन समाजाच्या धारणा कळतात. 'निबंध काढले' या शब्दांतून महानुभाव पंथीयांच्या काळात 'नियम सांगितले' असा आशय समोर येतो. कर्मठ समाजव्यवस्थेला तडे जात असल्याचे सामाजिक चित्र महानुभावांच्या बोलीतून लक्षात येते.

## माहिती आणि ज्ञानाचा स्रोत

सार्वत्रिक आणि सामूहिक शिक्षणप्रक्रियेमुळे एकूणच भाषा बदलत आहेत. भाषेत नवनवीन शब्दांची भर पडत आहे. असे असले तरी बोलीचे महत्त्व संपलेले नाही. सर्जनशील लेखकांच्या लेखनाचा सर्वोत्तम स्रोत म्हणून बोलीकडेच पाहावे लागते. दलित, ग्रामीण, आदिवासी, भटके विमुक्त, स्त्रीवादी, मुस्लीम साहित्यप्रवाहातील साहित्यकृतींमध्ये बोलीतील शब्द तुडुंब भरलेले आहेत.

लिखित साहित्य निर्माण होण्यापूर्वी मौखिक साहित्याला माहिती पुरवण्याचे काम बोली करीत होत्या. छापील लोकसाहित्य वाचले म्हणजे याची प्रचिती येते. 'हुमाण' हा मौखिक साहित्याचाच एक प्रकार आहे. मालवणी वा इतर अनेक बोलींमध्ये हुमाणे आढळतात. हुमाणे म्हणजे एकप्रकारचे शाब्दिक कोडे असते. त्यामुळे माहिती आणि ज्ञानाचा खजिना म्हणून बोलींकडे पाहता येते.

## बोलीविषयीचे गैरसमज

मुळात भाषेविषयी अनेक गैरसमज आहेत. त्यात बोलीविषयीचे गैरसमज अधिक आहेत. बोली ही गावंढळ असते किंवा ती अप्रतिष्ठितांची असते, असा अकारण समज पसरलेला आहे. बोली ही अशुद्ध आणि चुकीची असते असे आजच्या शिक्षित पिढीलाही वाटत आहे. उदा. मुलगा - पोरगा, होता - व्हता, आम्ही - हामी. यातील दुसऱ्या शब्दाकडे अशुद्ध म्हणून पाहिले जाते. वस्तुतः कोणतीच बोली ही शुद्ध वा अशुद्ध नसते. ती श्रेष्ठ वा कनिष्ठ - दुय्यम असत नाही. बोली ही विशिष्ट प्रदेशातील, विशिष्ट समूहाची संपर्क साधन असते. त्यामुळे बोलीविषयीचा गैरसमज दूर होणे गरजेचे आहे. पुस्तकातील प्रमाणभाषेत छापलेली भाषा म्हणजे उच्च, श्रेष्ठ, चांगली, शुद्ध भाषा असा गैरसमज पसरलेला आहे. भाषेविषयीचे अविज्ञान संपणे गरजेचे आहे.

## विज्ञाननिष्ठ भूमिका

मुळात आजच्या काळात प्रत्येकाने विज्ञाननिष्ठ असणे हे सर्वांसाठी हितावह आहे. त्यातही भाषेविषयी तर विज्ञाननिष्ठ असलेच पाहिजे. भाषा वा बोली या ईश्वरनिर्मित नाहीत, त्या मानवनिर्मित आहेत. त्या कालौघात बदलणाऱ्या असतात. भाषिक बदल हा अटळ असतो. शब्दांचे उच्चार किंवा शब्दांना मिळालेला अर्थ हाही बदलू शकतो. त्यामुळे कर्मठपणे बोलींकडे पाहिले, तर कोणतीच भाषा समृद्ध होणार नाही, हे सत्य स्वीकारले पाहिजे. म्हणजेच बोलीविषयी विज्ञाननिष्ठ भूमिका घेतली पाहिजे.

## व्यवहार आणि बोली भाषा

बोलींना सामावून घेणे म्हणजे बोली भाषेतील महत्त्वाचे शब्द भाषिक व्यवहारात आणणे. उदा. इवलुसा, छोटासा, लहानसा, बारीकसा हे शब्द परस्परपूरक आहेत. आज 'इवलुसा' हा शब्द बोलण्यातून हद्दपार झाला आहे. काटवट म्हणजे भाकर करण्याची लाकडी परात. स्वयंपाक घरातून लाकडी वस्तू हळूहळू निघून जात आहेत. त्यामुळे 'काटवट' हा शब्दही निघून गेला. चूल संपली तर 'चूल' हा शब्दही संपणार आहे. मात्र जे अस्तित्वात आहे ते नाकारण्यापेक्षा सामावून घेतले पाहिजे. 'प्याला' हे भांडे अस्तित्वात असूनही त्यासाठी 'ग्लास' हा शब्द वापरला जातो. काचेचा प्याला न म्हणता, स्टिलचा प्याला, चांदीचा प्याला, असे न म्हणता फक्त 'ग्लास' म्हटले जाते. म्हणजे प्याला हा शब्द फक्त 'एकच प्याला' नाटकापुरता वाचला जातो, तो सामावून घेतला जात नाही. इंग्रजी शब्दांना प्रतिष्ठेचे मानून बोलींना दूर करण्याची प्रवृत्ती संपणे गरजेचे आहे.

## बोलींचे कोश निर्माण व्हावेत

बोली नष्ट होत आहेत हे सत्य नाकारता येत नाही. त्या टिकवून ठेवण्याची धडपड करणे हेही सयुक्तिक नाही. त्याला एकमेव पर्याय आहे, तो म्हणजे बोलींचे शब्दकोश तयार करून घेणे. केवळ प्रादेशिक बोलींचे कोश न करता जातिनिहाय बोलींचे कोश तयार केले पाहिजेत. असे झाले तर बोली दस्तऐवज स्वरूपात संरक्षित राहतील. त्यातून सांप्रत आणि पुढील अनेक पिढ्यांसाठी बोलींचे भांडार उपलब्ध होईल. उदा. तृतीयपंथियांचा शब्दकोश, भटक्या विमुक्तांचा शब्दकोश, भिल्लांचा शब्दकोश, दखनी बोलीचा शब्दकोश.

## बोलींसाठी स्वतंत्र अध्ययन केंद्र

आजच्या काळात भाषेचे विद्यापीठ निर्माण होणे हे आवश्यक आहे. विद्यापीठात भाषेचे अधिविभाग आहेत. त्यांमधून बोलीचा सैद्धांतिक भाग संक्षिप्तपणे अभ्यासला जातो. बोलीची स्वतंत्र अभ्यासपत्रिका अभ्यासण्यास मिळत नाही. त्यासाठी प्रत्येक विद्यापीठात विद्यापीठ परिक्षेत्रातील बोलींचा अभ्यास आणि संशोधन करण्यासाठी स्वतंत्र अध्यासन केंद्रे निर्माण झाली पाहिजेत. यामुळे पुस्तकात न नोंदवलेल्या, कधीही अधोरिखित न झालेल्या कित्येक बोली भाषा सर्वांपुढे येतील. संस्कृतीच्या चांगल्या आणि वाईट घडामोडींच्या बोली या साक्षीदार असतात. त्यांचे संशोधन होण्यासाठी विविध विद्यापीठांमध्ये भाषांची अध्यासन केंद्रे उभारली पाहिजेत. भाषिकदृष्ट्या समृद्ध होण्यासाठी बोलींना ज्ञानरचनावादात आणणे आवश्यक आहे.

**(लेखक हे मराठी भाषेचे प्राध्यापक आहेत.)**



Scanned with OKEN Scanner

**वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी २० ते २४ जानेवारी २०२५ या चार दिवसांमध्ये विक्रमी गुंतवणुकीचे ६१ सामंजस्य करार केलेले आहेत. यामुळे राज्याच्या विकासाबरोबर होत असलेल्या रोजगार निर्मितीमुळे तरूणांमध्ये नवउमेद निर्माण होईल. स्वित्झर्लंडमधील दावोस येथे या वर्षी एकूण १५ लाख ७५ हजार कोटींचे सामंजस्य करार आणि या कराराची फलनिष्पती म्हणून १५ लाख ९८ हजार पदांची रोजगार निर्मिती होणार आहे.**

# रोजगार निर्मितीला चालना

**संजय डी. ओरके**

दावोस येथील ६१ सामंजस्य करारांमध्ये गुंतवणुकीचे ५४ आणि धोरणात्मक सहकार्याचे ७ करार झाले आहेत. दावोस हे आंतरराष्ट्रीय नेटवर्किंगचे केंद्र आहे. भारतीय कंपन्यांना करार करताना त्यांचे विदेशी गुंतवणुकदार आहेत. महाराष्ट्रात गुंतवणूक होणारी ९५ टक्के गुंतवणूक विदेशी आहे. कराराचे रूपांतर प्रत्यक्षात आणण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहेच आणि याही वर्षी अग्रेसरच राहणार आहे.

या ऐतिहासिक सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र आता डेटा सेंटरचे कॅपिटल होईल. डेटा हे नव्या युगाचे 'ऑईल' आहे. त्यामुळे या क्षेत्राची वाढ वेगाने होईल असे सांगितले. महाराष्ट्रासाठी गुंतवणुकीचे असे विक्रमी सामंजस्य करार झाले, याचा आनंद आहे. यातून भारताची आणि पर्यायाने महाराष्ट्राची ताकद वाढते आहे, हे स्पष्ट झाले आहे. अशा प्रकारे देशात होणाऱ्या सामंजस्य करारांचे यश हे ४० टक्क्यांपर्यंत असते; पण हेच प्रमाण महाराष्ट्राच्याबाबतीत सुमारे ६५ टक्के आहे. गतवर्षी दावोसमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळात चांगली सुरुवात झाली होती. त्यावेळी झालेल्या करारांची ९५ टक्क्यांपर्यंत अंमलबजावणी झाली आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत याही वर्षी विविध क्षेत्रात गुंतवणूक येत आहे. त्यातही एमएमआर हे मॅग्नेट समजले जाते. एमएमआरमध्ये सहा लाख कोटींची गुंतवणूक येत आहे. याशिवाय विदर्भ पाच लाख कोटी, उत्तर महाराष्ट्र ३० हजार कोटी, तर मराठवाड्याचे मॅन्युफॅक्चरिंग हब हे शक्तिस्थळ ठरू लागले आहे. ही सगळी गुंतवणूक थेट विदेशी गुंतवणूक, विदेशी संस्थात्मक गुंतवणूक असते. त्यामुळे देशाची अर्थव्यवस्थाही विस्तारित होत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.




दावोस दौरा संपल्यानंतर राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले की, मागील दोन वर्षांत साडे सात लाख कोटी सामंजस्य करार झाले होते. यात पहिल्या वर्षी एक लाख ३७ हजार कोटी, तर दुसऱ्या वर्षी तीन लाख ७० हजार कोटींचे करार करण्यात आले होते. उद्योजकांना जर वेळेत परवानग्या दिल्या, जागा उपलब्ध करून दिली, तर उद्योजक गुंतवणूक करून प्रकल्प उभारण्यास तयार असतात. रत्नागिरीमध्ये पुढील दोन चार महिन्यांमध्ये कोकाकोलाचे उत्पादन सुरू होत असून पुण्यातही महिंद्रा आणि महिंद्रा प्रकल्प सुरू होत असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर या संपूर्ण प्रक्रियेमध्ये जवळजवळ ३५ हजार कोटींचे प्रकल्प हे रत्नागिरीमध्ये येत असून त्याच्यामध्ये सेमीकंडक्टरचा एक प्रकल्प २० हजार युवा युवतींना रोजगार मिळवून देणारा आहे. धीरूभाई अंबानी डिफेन्स क्लस्टर हा जवळजवळ दहा ते १४ हजार कोटींचा प्रकल्प रत्नागिरीमध्ये येत असून याद्वारे अनेक लाखो बेरोजगारांना रोजगार मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये झालेल्या या कराराने भारताची पर्यायाने महाराष्ट्राची ताकद वाढणार आहे. महाराष्ट्र डेटा कॅपिटल सेंटरबरोबरच मॅन्युफॅक्चरिंग हब होईल. एकंदरीत पाहता देशाची अर्थव्यवस्था विस्तारित होण्यास खूप मोठा हातभार लागणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रात रोजगार निर्मितीची मोठी क्षमता असल्याने महाराष्ट्राने गुगलसोबत एक्सलन्स सेंटर स्थापन करण्याचा करार यापूर्वीच केला होता. त्याचप्रमाणे पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासासाठी



Scanned with OKEN Scanner

हरित ऊर्जा, हायड्रो ऊर्जा, सौरऊर्जा प्रकल्पांना प्राधान्य देण्यात आले. स्वच्छ ऊर्जेतून पर्यावरणाचे संवर्धनाचे लक्ष्यही साधले जाणार आहे.

## पायाभूत सुविधेसह रोजगार निर्मिती

पायाभूत सुविधेकरिता महाराष्ट्र शासन आणि एल मॉण्ट यांच्यात २ हजार कोटी रुपयांचा सामंजस्य करार झाला. या करारामुळे पायाभूत सुविधा क्षेत्रात ५ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. पायाभूत सुविधेसाठी ब्लॅकस्टोन आणि महाराष्ट्र शासन यांच्यात ४३ हजार कोटी रुपयांचा गुंतवणूक करार झाला. पायाभूत सुविधा क्षेत्रात एमएमआरडीए आणि हिरानंदानी ग्रुप यांच्यात ५१,६०० कोटींच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. या राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होतील. पायाभूत सुविधा क्षेत्रात सोटेफिन भारत आणि एमएमआरडीए यांच्यात ८,६४१ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा करार करण्यात आला. पायाभूत सुविधेच्या या दोन्ही करारांमुळे राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी या करारादरम्यान सांगितले. एमएमआरडीए आणि टेमासेक कॅपिटल यांनी पायाभूत सुविधा क्षेत्रात ४३ हजार कोटींच्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि टेमासेक कॅपिटलच्या प्रतिनिधींनी या करारावर स्वाक्षरी केली. सुमितोमो रिलिटी यांनी पायाभूत सुविधा क्षेत्रात ४३ हजार कोटी गुंतवणुकीसाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. या करारामुळे महाराष्ट्रातील पायाभूत विकासाला चालना मिळणार आहे. के. रहेजा कॉर्प प्रा. लि. यांनी पायाभूत सुविधा क्षेत्रात ४३ हजार कोटी गुंतवणुकीसाठी करारावर स्वाक्षरी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि के. रहेजा कॉर्प प्रा. लि.च्या प्रतिनिधींनी या करारावर स्वाक्षरी केली. ब्रुकफिल्ड यांनी पायाभूत सुविधा क्षेत्रात १,०३,२०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ब्रुकफिल्डच्या प्रतिनिधींनी या करारावर स्वाक्षरी केली. एमएमआरडीए आणि एमटीसी समूह यांच्याद्वारे पायाभूत सुविधा क्षेत्रात एक हजार कोटी रुपये गुंतवणुकीसाठी करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एमटीसी समूहाचे मनोज मेहता यांनी या करारावर स्वाक्षरी केली. या प्रकल्पामुळे एक हजार नवीन रोजगार संधी निर्माण होणार असून आहे.

## सामंजस्य करारांची सुरुवात

दावोसच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्र शासन आणि कल्याणी ग्रुप यांच्यात ५,२५० कोटी रुपयांचा करार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमित कल्याणी यांच्या दरम्यान झाला. या करारामुळे सैन्य दल, स्टील आणि इलेक्ट्रॉनिक व्हेईकल या क्षेत्रात फायदा होण्याबरोबरच ४ हजारांची रोजगार निर्मिती होणार आहे. दुसरा करार महाराष्ट्र सरकार आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्यामध्ये झाला. १६,५०० करोड इतकी गुंतवणूक असलेल्या या करारामुळे २,४५० इतकी रोजगार निर्मिती होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सतीश शेठ यांच्या उपस्थितीत संरक्षण क्षेत्रासंदर्भात हा करार झाला. तिसरा करार स्टील आणि धातू क्षेत्रासंदर्भात असून यामुळे ३,२०० रोजगार निर्मितीबरोबर १७ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. हा करार मुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि बालासोर अलॉयचे सतीश कौशिक यांच्यात झाला.

## पोलाद क्षेत्रामुळे चंद्रपूरचा विकास

महाराष्ट्र शासन आणि विराज प्रोफाईल प्रा.लि.यांच्यामध्ये करार करण्यात आला असून याद्वारे ३,५०० रोजगार निर्मिती होणार आहे. स्टिल आणि धातू क्षेत्रात १२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. ग्रेटा इनर्जी आणि महाराष्ट्र शासन यांच्या स्टिल आणि धातू उद्योगाकरिता १०,३१९ कोटी रुपयांचा गुंतवणुकीचा करार करण्यात आला. चंद्रपूर येथे होणाऱ्या या उद्योगामुळे तेथे ७ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. पोलाद क्षेत्रासाठी टॉरल इंडिया आणि महाराष्ट्र शासन यांच्या ५०० कोटी रुपयांचा करार झाल्यामुळे १,२०० रोजगार निर्मिती होणार आहे.

## माहिती तंत्रज्ञानाचे सर्वदूर जाळे

उद्योग विभागासोबतही ब्लॅकस्टोन पंचशील सोबत २५ हजार कोटी रुपयांचा माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात गुंतवणुकीचा करार करण्यात आला असून, याद्वारे १ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात निलसेन मीडिया आणि महाराष्ट्र शासन यांच्या ४५० कोटी रुपये गुंतवणुकीचा करार झाला. यामुळे या क्षेत्रात १,१०० रोजगार निर्मिती होणार आहे.

## हरित ऊर्जा निर्मिती

हरित ऊर्जा आणि सौर उपकरणे यासाठी महाराष्ट्र शासनाद्वारे वारी एनर्जीसोबत ३० हजार कोटी रुपयांचा करार या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये करण्यात आला. या करारामुळे ७,५०० इतकी रोजगार निर्मिती होणार आहे. हरित ऊर्जा क्षेत्रात एच-२ ई -पॉवर यांनी महाराष्ट्र शासनासोबत १०,७५० कोटी रुपयांचा गुंतवणूक करार केला आहे. या करारामुळे पुणे भागाच्या विकासाबरोबर १,८५० रोजगारांची निर्मिती होणार आहे. पॉवरिन ऊर्जा आणि महाराष्ट्र शासन यांच्या हरित ऊर्जासंदर्भात १५ हजार कोटी रुपयांचा गुंतवणुकीचा करार करण्यात आला. या करारामुळे ४ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. ओपन ओरिजिन इंडिया आणि महाराष्ट्र शासन यांच्यात हरित ऊर्जेसाठी १५ हजार कोटी रुपयांचा सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे १ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. युनायटेड फॉस्परस आणि महाराष्ट्र शासन यांच्या हरित ऊर्जेसंदर्भात ६,५०० कोटी रुपयांच्या करार करण्यात आला असून, याद्वारे १,३०० रोजगार निर्माण होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## हरित हायड्रोजनची निर्मिती

हरित हायड्रोजन आणि केमिकल्स क्षेत्रात झेडआर-२ या कंपनीसोबत शासनाने केलेल्या १७,५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीमुळे २३ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. हरित ऊर्जेकरिता महाराष्ट्र



Scanned with OKEN Scanner

शासन आणि रेनिसन्स सोलर आणि इलेक्ट्रॉनिक्स यांच्यात ५ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा करार करण्यात आला असून याद्वारे १,३०० रोजगार निर्माण होणार आहे. हरित ऊर्जेसाठी हायझिरो आणि महाराष्ट्र शासन यांच्यात १६ हजार कोटी रुपयांचा सामंजस्य करार दावोस येथे करण्यात आल्याने राज्यात १० हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

## सौर ऊर्जेकरिता प्राधान्य

सौर ऊर्जा क्षेत्रात एमएसएन होल्डिंग आणि महाराष्ट्र शासन यांच्यात १४ हजार




६५२ कोटी रुपयांचा करार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सत्यनारायण नुवाल यांच्यात झाल्यामुळे या क्षेत्रात ८,७६० रोजगार निर्मिती होणार आहे.

## संरक्षण क्षेत्रामुळे महाराष्ट्र सुरक्षित

संरक्षण क्षेत्रात टेम्बोच्या शाबिर मर्चंट आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात १ हजार कोटी रुपयाचा गुंतवणूक करार झाला असून यामुळे रायगड भागात ३०० रोजगार निर्माण होणार आहे. एल अॅण्ड टी आणि महाराष्ट्र शासन यांच्यात तळेगाव येथे संरक्षण क्षेत्राकरिता १० हजार कोटी रुपयांचा करार करण्यात आला. यामुळे २,५०० रोजगार निर्मिती होणार आहे. इकॉनिमिक एक्सप्लोसिव्ह सोलर डिफेन्स आणि महाराष्ट्र शासन यांच्यात १२,७८० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीने एअरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्राकरिता २,३२५ रोजगार निर्मिती होणार आहे.

## डेटा सेंटर नव्हे 'डेटा हब'

सिडको व उद्योग विभाग आणि ब्लॅकस्टोन पंचशिल रिॲलिटी या कंपनीने डेटा सेंटरमध्ये २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली. या गुंतवणुकीमुळे ५०० रोजगार निर्मिती होणार आहे. मेझान आणि महाराष्ट्र शासन यांच्यात डेटा सेंटर संदर्भात ७१,७९५ कोटी रुपयांची गुंतवणूक करार झाला. या करारामुळे राज्यात ८३,१०० रोजगार निर्मिती होणार आहे.

## इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रामुळे कोकणही पुढे

रत्नागिरी भागाकरिता महाराष्ट्र शासन आणि व्हिट सेमिकॉन यांच्यात इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राकरिता २४,४३७ कोटी रुपयांचा गुंतवणूक करार करण्यात आला. करारामुळे राज्यात ३३,६०० रोजगार निर्मिती होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जेन्सोलचे व्यवस्थापकीय संचालक अनमोल सिंग जग्गी यांच्यात इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात ४ हजार कोटी रुपयांचा करार झाला. या करारामुळे ५०० रोजगार निर्मिती होणार आहे. दावोस येथे इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात वर्धमान लिथियम आणि महाराष्ट्र शासन यांच्या ४२,५३५ कोटी रुपये गुंतवणुकीचा करार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वर्धमान लिथियमचे व्यवस्थापकीय संचालक सुनील जोशी यांच्यात करार करण्यात आला. यामुळे राज्यात ५ हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

## टोमोटिव्ह आणि ईव्हीमध्ये भरभराट

महाराष्ट्र शासन आणि ब्ल्यू इनर्जी मोटर्स यांच्या ३,५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीमुळे ४ हजार रोजगार निर्मिती होण्याबरोबर टोमोटिव्ह आणि इलेक्ट्रॉनिक व्हेईकल क्षेत्रात मोठे बदल होणार आहेत. ऑटोमोटिव्ह आणि ई.व्ही. क्षेत्राकरिता सिएट आणि महाराष्ट्र शासन यांच्यात ५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा करार करण्यात आला असून, यामुळे ५०० रोजगार निर्माण होणार आहे. आलेक्ट्रा ईव्ही आणि महाराष्ट्र शासन यांच्यात ३ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा करार झाला असल्याने यामुळे ऑटोमोटिव्ह आणि ईव्ही क्षेत्रात १ हजार रोजगार निर्माण होतील.

## बाह्य मनोरंजन

बूक माय शो आणि सिडको यांच्यातील सामंजस्य करारामुळे ५०० रोजगार निर्मिती आणि १,७०० कोटींच्या गुंतवणुकीमुळे बाह्य मनोरंजन क्षेत्रात क्रांती होणार आहे.

## दळणवळणाला चालना

दळणवळण क्षेत्राला गती मिळावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि बी.के. गोयंका यांच्या उपस्थितीत सिडको आणि वेलस्पून वर्ल्ड यांच्या ८,५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा करार करण्यात आला. यामुळे १७,३०० रोजगार निर्मिती होणार आहे.

## शिक्षणाला बळकटी

शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि इरूलर्निंग सोल्युशन्स यांच्यामध्ये २० हजार कोटी रुपयांचा करार करण्यात आला. यामुळे २० हजार रोजगार निर्मिती होईल.



Scanned with OKEN Scanner

## कापड उद्योगाला भरारी

इंडोरामा आणि महाराष्ट्र शासन यांच्यात कापड उद्योग क्षेत्राकरिता ३१,२०० कोटी रुपयांचा करार झाल्याने या क्षेत्राकरिता ४ हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

## अन्न व पेय उद्योग

महाराष्ट्र शासन आणि ए.बी. इनबेव यांच्यात अन्न व पेय उद्योगात ७५० कोटी रुपयांच्या गुंतवणकीसाठी दावोस येथे सामंजस्य करार करण्यात आला. अन्न व पेय उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र शासन आणि सिलोन बेव्हजेर यांच्यात १,०३९ कोटी रुपयांचा गुंतवणूक करार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिष्टमंडळासमवेत झाला. या करारामुळे ४५० रोजगार निर्मिती होणार आहे.

## ड्रोन निर्मिती

ड्रोन तयार करण्यासाठी एमएमआरडीए आणि प्रिम सोल्युशन्स यांच्यात ३०० कोटी रुपयांचा सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे ३०० रोजगार निर्मिती होणार आहे. इव्हरस्टोर आणि महाराष्ट्र शासन यांच्यात ८,६०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा करार करण्यात आला.

## सायबर सुरक्षा

महाराष्ट्र शासन आणि गुरुकुल यांच्यात सायबर सुरक्षा क्षेत्रातील ५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि गुरुकुलचे सह-संस्थापक निलेश ढेरंगे यांनी या करारावर स्वाक्षरी केली.

## सामरिक सामंजस्य करार

फ्लुईड कन्ट्रोल कंपनीने ४२५ कोटी गुंतवणुकीसाठी सामरिक सामंजस्य करार केले. या प्रकल्पामुळे १०० नवीन रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत. कोलेड इलेक्ट्रॉनिक्स कंपनीने १७० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याबाबत सामरिक करार केले. या प्रकल्पामुळे १,५०० नवीन रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत. स्कायरूट कंपनीने ५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी सामरिक करार केले. या प्रकल्पामुळे ८०० नवीन रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत. रीग्रीन कंपनीने १,५०४ कोटी गुंतवणुकीसाठी सामरिक करार केले. या प्रकल्पामुळे ८०० नवीन रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत.

## सामाजिक क्षेत्रातही पुढे

महाराष्ट्र शासन आणि रूरल इन्हान्सर्स यांच्यात १० हजार कोटी रुपयांचा गुंतवणूक करार झाला. हा १० हजार कोटी रुपयांचा सार्वभौम निधी हा रुग्णालयासारख्या सामाजिक क्षेत्राकरिता वापरण्यात येणार आहे.

## अन्य सामंजस्य करार

जेएसडब्ल्यू या स्टिल, नवीनीकरणीय ऊर्जा, पायाभूत सुविधा, सिमेंट, लिथियम आयन बॅटरी, सौर वेफर आदी क्षेत्रांकरिता ३ लाख कोटी रुपये गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे गडचिरोली जिल्ह्याबरोबरच छत्रपती संभाजीनगर आणि नागपूरचा विकास तर होणारच आणि १० हजार रोजगार निर्मिती होणार आहे. यामुळे महाराष्ट्राच्या औद्योगिक वातावरणाला मोठा बूस्ट मिळणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केले. अवनी पॉवर बॅटरीसोबत शासनाचा १०,५२१ कोटी रुपयांच्या सामंजस्य करारामुळे ५ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. बिसलेरी इंटरनॅशनल आणि महाराष्ट्र शासन यांच्या २५० कोटी रुपयांचा गुंतवणूक करार झाला असून यामुळे ६०० रोजगार निर्माण होतील. टाटा ग्रुप आणि महाराष्ट्र शासन यांच्यात वेगवेगळ्या बाबींसाठी ३० हजार कोटी रुपयांचा करार करण्यात आला. रिलायन्स इंडस्ट्रिज आणि महाराष्ट्र शासन यांच्यात पेट्रोकेमिकल्स, पॉलिस्टर, नवीनीकरण ऊर्जा बायोऊर्जा, हरित हायड्रोजन, हरित ऊर्जा, औद्योगिक विकास, डेटा सेंटर, दूरसंचार, आदरातिथ्य आणि अचल संपत्ती व्यवसायात ३ लाख ५ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा करार करण्यात आला. या ऐतिहासिक करारामुळे या क्षेत्रात ३ लाख रोजगारांच्या संधी निर्माण होणार असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारत ५ ट्रीलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत असल्याचे प्रतिपादन या करारावेळी केले. महाराष्ट्र शासन आणि रॉनी स्क्रूवाला यांनी १०० कोटी गुंतवणुकीसाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि रॉनी स्क्रूवाला यांनी या करारावर स्वाक्षरी केली.

सर्व क्षेत्रांमध्ये एकूण ६१ परिवर्तनकारी सामंजस्य करारांवर स्वाक्षरी झाली, ज्यातून १५,७०,६०४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या करारांमुळे १५,९५,९६० नवीन रोजगार संधी निर्माण होणार आहेत. दावोसने खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या यशाच्या पुढील अध्यायाची पायरी चढवली असल्याचे या परिषदेत दिसून आले आहे.



**विभागीय संपर्क अधिकारी**



Scanned with OKEN Scanner

**राज्य मंत्रिमंडळाच्या २, ७, २८ जानेवारी आणि ४, ११ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत महसूल, वित्त, सार्वजनिक बांधकाम, सामान्य प्रशासन, नगरविकास, जलसंपदा, मृद् व जलसंधारण, मदत व पुनर्वसन आदी विभागांचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...**



# कल्याणकारी निर्णय

## जमीन महसूल संहितेत सुधारणा

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २२० मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. या सुधारणांमुळे शासकीय थकबाकीपोटी लिलाव होऊन सरकारजमा झालेल्या सुमारे ४,८४९ एकर आकारीपड जमिनी शेतकऱ्यांना परत दिल्या जाणार आहेत. यामुळे छोट्या आणि अल्प भूधारक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. याबाबतचे सुधारणा विधेयक मांडण्यास मंजुरी देण्यात आली. तगाई किंवा तत्सम थकबाकी न भरल्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २२० नुसार अशा जमिनींचा लिलाव होऊन त्या आकारीपड म्हणून शासनजमा करण्यात येतात. अशा जमिनी थकबाकीची देय रक्कम आणि त्यावरील व्याज १२ वर्षांच्या आत भरणा केल्यास मूळ खातेदारांना परत करण्याची तरतूद कायद्यात आहे. तथापि १२ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यावर अशा जमिनी मूळ मालकांना परत करण्याची तरतूद नव्हती.

आता अशा जमिनी प्रचलित बाजारमूल्याच्या २५% रक्कम वसूल करून मूळ खातेदारांना किंवा त्यांच्या वारसांना परत करण्याची तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६च्या कलम २२० मध्ये करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. तसे विधेयक विधानमंडळाच्या आगामी अधिवेशनात सादर करण्यात येईल.

## फास्ट-टॅगद्वारेच पथकर

राज्यातील पथकर वसुली नाक्यांवर १ एप्रिल २०२५ पासून सर्व वाहनांचा पथकर फास्ट-टॅगद्वारेच भरावा लागणार आहे. या निर्णयानुसार सध्याच्या सार्वजनिक खासगी सहभाग धोरण २०१४ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.




फास्ट-टॅगच्या माध्यमातून पथकर वसुली झाल्यास पथकर वसुलीत अधिक सुसूत्रता, पारदर्शकता येणार आहे. पथकर नाक्यांवर वाहनांचा खोळंबा कमी होणार आहे. यातून वेळेची, इंधनाची बचत होणार आहे. फास्ट-टॅगशिवाय अन्य कोणत्याही माध्यमातून पथकर भरायचा झाल्यास किंवा फास्ट-टॅग सुरू नसेल किंवा टॅगशिवाय वाहनाने फास्ट-टॅगच्या मार्गिकेत प्रवेश केल्यास दुप्पट पथकर भरावा लागणार आहे.

राज्यात सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १३ आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ९ रस्ते प्रकल्पांवर पथकर वसुली सुरू आहे. या ठिकाणी तसेच भविष्यात पथकर वसूल करावा लागणाऱ्या प्रकल्पांसाठी हा निर्णय लागू राहणार आहे.

## महाराष्ट्र शासन कार्यनियमावली

प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ आणि गतिमान करणारी सुधारित महाराष्ट्र शासन कार्यनियमावली प्रसिद्ध करण्यास मान्यता देण्यात आली. या सुधारणांमध्ये मंत्रिमंडळापुढे आणावयाची प्रकरणे, मुख्यमंत्री; तसेच राज्यपाल महोदय यांच्या मान्यतेसाठी सादर करावयाची प्रकरणे, मंत्रिपरिषद व मंत्रिमंडळाची कार्यपद्धती आदी बाबींसंदर्भात तरतुदीचा समावेश आहे. अशी पहिली कार्यनियमावली १९७५ ला तयार करण्यात आली होती. त्यानंतर तिसऱ्यांदा अशी सुधारित कार्यनियमावली तयार करण्यात आली आहे. सुधारित कार्यनियमावली राज्यपाल महोदयांच्या मान्यतेनंतर शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल.

## अटल सेतूवर सध्याच्याच सवलतीच्या दराने पथकर

अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूवर सध्या सुरू असलेल्या सवलतीच्या दरानेच आणखी एक वर्षभर पथकर आकारणी करण्यास मान्यता देण्यात आली. अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूच्या वापराकरिता यापूर्वी ४ जानेवारी २०२४ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत एमएमआरडीएने प्रस्तावित केलेल्या दराच्या ५० टक्के सवलतीच्या दराने पथकर (कमीत कमी २५० रुपये इतका) आकारणीचा निर्णय घेण्यात आला होता. या दराचा एक वर्षानंतर आढावा घेण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. त्यानुसार मंत्रिमंडळ बैठकीत आणखी एक वर्षभर म्हणजेच ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सध्या सुरू असलेल्या



Scanned with OKEN Scanner

सवलतीच्या दरानेच पथकर आकारणीस मान्यता देण्यात आली.

### अभय योजनेस मुदतवाढ

शासकीय भोगवटादार वर्ग-२च्या जमिनी वर्ग-१मध्ये रूपांतरणासाठी सवलतीच्या दराने अधिमूल्य आकारण्याच्या अभय योजनेस वर्षभराची मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली. कृषिक, निवासी, वाणिज्यिक किंवा औद्योगिक प्रयोजनासाठी दिलेल्या शासकीय जमिनींचे किंवा भाडेपट्ट्याने दिलेल्या वर्ग-२ जमिनींचे वर्ग-१ मध्ये रूपांतरण करण्यासाठी सवलतीच्या दराने अधिमूल्य भरण्यासाठीची मुदत संपली आहे. मात्र राज्यात अशी रूपांतरणाची खूप प्रकरणे प्रलंबित असल्याने या योजनेस मुदतवाढ देण्याबाबत वारंवार मागणी करण्यात येत होती. त्यामुळे या सवलतीच्या दराने अधिमूल्य भरण्याच्या योजनेस आणखी एक वर्षाची मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. यानुसार यापूर्वी प्रलंबित असलेल्या प्रकरणांना; तसेच ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत दाखल होणाऱ्या अर्जांसाठी ही योजना लागू राहणार आहे. याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

### टेमघर प्रकल्पाच्या खर्चास मान्यता

पुणे जिल्ह्यातील टेमघर प्रकल्पाचे (ता. मुळशी) मजबुतीकरण व गळती रोखण्याच्या कामांकरिता ३१५ कोटी ५ लाख रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. टेमघर धरणातून पुणे शहराला दरवर्षी ३.४०९ अघफू पाणी पिण्यासाठी उपलब्ध केले जाते. तसेच मुळशी तालुक्यातील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याद्वारे १ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. हा प्रकल्प पुणे शहराच्या वरच्या बाजूस आहे. या प्रकल्पाला गळती लागल्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. यामुळे धरणाच्या; तसेच पुणे शहराच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. तसा अहवाल विविध समित्यांनी दिला आहे. त्यांच्या शिफारशींचा विचार करता धरणाची गळती रोखण्यासाठी तातडीने उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे. हे काम केल्याने गळती थांबणार असून त्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठीही पाणी उपलब्ध होणार आहे.

### कोयना जलाशयातील बुडीत बंधारे बांधण्यासाठी तरतूद

सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर व जावळी तालुक्यातील कोयना जलाशयामध्ये बुडीत होणारे २५ बंधारे बांधण्यासाठी १७० कोटी रुपयांची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली. कोयना जलाशय



परिसरातील हे २५ बंधारे बुडीत क्षेत्रात येतात. या जलाशयाची पाणी पातळी फेब्रुवारी ते मे या महिन्यांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात कमी होते. त्यामुळे या परिसरातील स्थानिक रहिवाशांना पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याची समस्या भेडसावते. ही समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना म्हणून या बंधाऱ्यांचे बांधकाम करण्यात येणार आहे.

### देहरजी मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारित खर्चास मान्यता

पालघर जिल्ह्यातील मौजे सुकसाळे (ता. विक्रमगड) येथील देहरजी मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या २ हजार ५९९ कोटी १५ लाख रुपयांच्या खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. हा अतिरिक्त खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण-एमएमआरडीए करणार आहे. हा प्रकल्प पाणीपुरवठा प्रकल्प म्हणून राबवण्यात येत आहे. या धरण प्रकल्पाबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या दरम्यान २३ सप्टेंबर २०२२ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

### जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या खर्चास मान्यता

पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती व पुरंदर तालुक्यातील सिंचनासाठीच्या जनाई, शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रूपांतर करण्याच्या कामाकरिता व त्यासाठीच्या ४३८ कोटी ४७ लाख ८७ हजार ४८३ रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

### महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नियम २०१९ मध्ये दुरुस्ती

महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नियम २०१९ मध्ये दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयानुसार प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून मुख्यमंत्री समितीचे सदस्य मंत्री व अशासकीय सदस्य यांचे नामनिर्देशन करतील.



महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन नियम २०१९ च्या नियम-३ मध्ये राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची रचना निश्चित करण्यात आली आहे. ही रचना सुधारित करण्यास मान्यता देण्यात आली. या रचनेनुसार राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामध्ये अध्यक्ष आणि नऊ सदस्य असतील. त्यामध्ये मुख्यमंत्री हे पदसिद्ध अध्यक्ष, उपमुख्यमंत्री पदसिद्ध सदस्य असतील, तर अन्य पदसिद्ध सदस्य पदाकरिता मुख्यमंत्री प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून इतर मंत्र्यांना नामनिर्देशित करतील. तसेच अध्यक्ष आपत्ती जोखीम कमी करण्याचे ज्ञान आणि अनुभव असलेल्या व्यक्तींना अशासकीय सदस्य म्हणून नामनिर्देशित करतील. याशिवाय राज्य कार्यकारी समितीचे अध्यक्ष पदसिद्ध सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा या समितीत समावेश राहील.

**टीम लोकराज्य**



Scanned with OKEN Scanner





Scanned with OKEN Scanner


R.N.I.No. 14140


आज़ादी का अमृत महोत्सव | महाराष्ट्र शासन | G20

# लोकराज्य

## अधिकृत–विश्वासार्ह–वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.

### अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता** : उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR


प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**दयानंद कांबळे**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१


लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा. लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन. एम. जोशी मार्ग, मुंबई – ४०० ०११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह


Scanned with OKEN Scanner